४ इत्यादि कल्पनेची अनुपपत्ति आहे. असा अर्थ. ते स्पष्ट करीतो - 'तेथें' त्याच्याहुन अतिरिक्त अंतःकरणनामक आश्रयी
पडत नाही. असा संबंध. प्रमाणाच्या अभाव असल्यामुळे. असा हेतु. पण 'ज्ञानादिकें आश्रय आहेत त्यांना गुणत्व असल्यामुळे आत्म्य
गंधादिगुणाप्रमाणे' अशी आश्रयाची सिद्धि होते व आश्रयान्तराचें निरूपण करितां येत नसल्यामुळे अंतःकरणत्वानें धर्मी
इष्ट आहे. तसें आत्म्यांत प्रतीत होणाऱ्या कर्तृत्वादिकाच्या भिन्नत्वाने, भेद पडलेल्या आत्म्याच्यांत भेद हेतुत्वाने व उत्क्रान्त्यादि
कार्याहेतुत्वाने तें इष्ट आहे? अशा शंका मनुष्यपर्यायाने निरसन करीतो - 'ज्ञानसुख' इत्यादि. अंतःकरणाच्या आश्रयत्व अंगीके
वीजसांगतो - 'विज्ञानक्रिया' सुखादिकांना विज्ञानशब्द वाच्य अंतःकरणाच्ये परिणामत्व असल्यामुळे तदाश्रयत्व आहे असा शंकेचा अर्थ.
मानलेल्यांची आत्माश्रयत्वानेही उपपत्ति होत असल्यामुळे परिशेषावरुन अंतःकरणाची सिद्धि होत नाही. असा समाधान ग्रं
थाच्या अभिसंधि. कर्तृत्वादिकांना आत्मधर्मत्व असल्यामुळे त्यांच्या भिन्नत्वाने तें कल्पना नाही असें सांगतो - 'अग्नीचा जसा'
लोहपिंडाच्या योगाने जसा अग्नीत दीर्घत्वादिकांचा आरोप होतो असा दृष्टान्ताचा अर्थ. जीव धर्म आत्म्याचा भेद स्वाभाविक असल्या
मुळे त्याच्या हेतुत्वानेही अंतःकरणाची कल्पना नाही. असें सांगतो - 'मुखाचा जसा' एका मुखाचा जसा बिंब प्रतिबिंबत्वाने
भेद आदर्शाच्या निमित्ताने असतो तसा येथें नाही असा अर्थ. आत्म्याचा उत्क्रान्त्यादिकांची असिद्धि असल्यामुळे त्याच्या हेतुत्वानेही
त्याची कल्पना नाही असें सांगतो - 'चंद्राचा जसें' जगाच्या अनुरोधाने जशी चंद्रांत गत्यादिकांची सिद्धि होते तशी येथें
आत्म्यांत असंगत्वामुळे उत्क्रान्त्यादिकांची सिद्धि होत नाही. पण एक शरीर नष्ट झाले असतां कर्म योगाने दुसऱ्या शरी
रांत प्रवेश करितो. अशी ही शंका घेतां येणार नाही. कारण कृत सुकृत दुष्कृताच्या अनुरोधाने शरीर निष्पन्न झाले
असतां तेथें वृत्तिसंक्रमण होतो असा अर्थ. परंतु हें प्रसिद्ध असल्यामुळे त्याच्याशी अभेदामुळे अंतःकरणाची सिद्धिच आहे

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥

तोत्तर परिणामविशेष अनिदं चित् आत्म्याहून बुद्धीनं पृथक् काढून वेदान्तवाद्यांकडून अं-
तःकरण मन बुद्धि अहंप्रत्ययी असा विज्ञान शक्तिविशेषाचा आश्रय करून तो लक्ष्या-

॥ विवरण ॥

रूप नसलेल्या आरोपाचा उपाधिभूत किंचित् आहे ही ख्यात नाहीं. पण तें बुद्धि आहे? असें असेल तर नाहीं
कारण "बुद्धिरुपलब्धिर्ज्ञानमित्यनर्थान्तरम्" [न्यायसू. १।१।१५] असें अक्षपाद कथनसूत्र आहे. पण बु-
द्धि जाणत न आत्मा उपलब्ध होतो? असें असेल तर नाहीं कारण प्रतिघातुच्या अर्थानें धर्मीभेद प्रसंग येतो.
म्हणून वर्जन केलेलें अंतःकरण नाहीं- असें त्यावर सांगतात- 'तोत्तर परिणामविशेष' हा आशय- बु-

॥ विवरणव्याख्यान ॥

~~प्रसिद्ध आहे~~? अशी शंका घेतात- 'पण तें' बुद्धीला ज्ञानपर्यायत्वानें अक्षपादांनी सांगितलें असल्यामुळे अंतःकरणाची
सिद्धि होत नाही असें सांगतो- 'नाहि कारण'. जर अक्षपादांच्या सूत्रावरून बुद्धि व ज्ञानांचें एकत्व मानतोस तर पा
मता
तंजलांच्या अनुसार त्यांच्यांत भेद कां असणार नाहीं? अशी शंका देतात- 'पण बुद्धि' ज्ञानाच्या परिणामित्वानें बुद्धि
प्रसिद्ध त्याला (अंतःकरणाला)
प्रसिद्ध असल्यामुळे बुद्धि व ज्ञानांत एकत्व नाहीं असा अर्थ. उपलब्धीला आत्मधर्मत्व असल्यामुळेही ज्ञानपर्यायत्व
चित
नाहीं असें सांगतात- 'आत्मा उपलब्ध होतो'? उपलब्धि तर बुद्धींत प्रतिबिंबित चैतन्य आहे. नव्हें तर आत्मरूप आहे. असा अर्थ.
काय हें अनुभवाच्या अनुसरून सांगितलें जातें किंवा युक्तीला? पहिला पक्ष नाहीं कारण तसें उपलब्ध होत नाहीं. दुसरा पक्षही
नाहीं कारण तशा प्रकारच्या युक्तीचा अभाव आहे. असा आशयानें सांगतो- 'नाहीं' केवळ ज्ञान उपलब्धि व बुद्धींत भेदाचा
अभाव च नाहीं परंतु ज्ञान व उपलब्धींत आश्रयभेदही नाहीं असें सांगतो- 'कारण' काय त्यांच्यांत भिन्नत्वमात्र आश्रयभेद
का साधक आहे? किंवा नैकट्य धर्म विशेषित? पहिल्या पक्षी दाह दाहक भेदानें अग्नीतही भेदप्रसंग येतो. दुसऱ्या पक्षी विशेषाची
असिद्धि आहे असा अर्थ. किंवा 'मी उपलब्ध होतो मी जाणतो' अशा रीतीनें एकाश्रयत्वाची प्रतिपत्ति असताही जर
धर्मिभेद आहे तर अतिप्रसंग येतो असें सांगतो- 'कारण प्रतिघातुच्या', 'वेदान्तवाद्यांकडून' येथें सूचित अंतःक-
रणाला साधक वाक्याचें उदाहरण देतात- 'हा आशय'. बुद्धि व ज्ञानाला पर्यायत्व आहे असें जें सांगितलें तें असंगत

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ विवरण ॥

हे "गुणेनात्मगुणेन चैव आराग्रमात्रो ह्यवरोऽपि दृष्टः" [श्वे. ५।८] या श्रुतींत परिणामगुणवत्तेने बुद्धि द्रव्य आहे असें कळते. तसें "यदा पञ्चावतिष्ठन्ते ज्ञानानि मनसा सह। बुद्धिश्च न विचेष्टति ...परमात्मानमश्नुते" [ ] या श्रुतींत चेष्टेच्या आश्रयत्वानें बुद्धि द्रव्य आहे असें कळते. तसें "विज्ञानं यज्ञं तनुते" [तै. २।५] या श्रुतींत आनंदमय आत्म्याचा पृथक् सांगितलें असल्यामुळे, विज्ञान व बुद्धि अशा अनर्थान्तरत्वामुळें, बुद्धि क्रियाश्रयत्वानें द्रव्य आहे असें कळते. तसें "विज्ञानेन वा ऋग्वेदं विजानाति" [ ] "मनसा ह्येव पश्यति" [बृ. १।५।३] व

॥ विवरण व्याख्यान ॥

आहे असें सांगतात- 'बुद्धेर्गुणेनात्म' बुद्धि द्रव्य आहे या विषयीं हेतु सांगतात- 'परिणामगुणवत्तेन' बुद्धि द्रव्य आहे, तिला परिणामवत्त्व असल्यामुळें मात्र द्रव्याप्रमाणें' हेतूची असिद्धि ही नाहीं असें सांगतात- 'बुद्धेः गुणेन' आरे शब्दानें मात्रा= तोत्राला (चुतारीला) असलेली को आणखी शब्दानें सांगितलें जातें, तिच्या अग्राप्रमाणें परिमाण ज्याचें आहे तो आराग्रमात्र अवर=जीव. आत्मा= महत्त्वपरिमाणगुणानें महान् असणारा बुद्धीतील परिणामगुणानें आराग्रमात्र दिसतो असा श्रुतीचा अर्थ. क्रियावत्त्वामुळेंही बुद्धीचा द्रव्यत्व व मनाहून अतिरिक्तत्वही सांगतात- 'तसें' ज्यांच्याकडून जाणल्या जातें तीं ज्ञानें=इंद्रियें असा अर्थ. इंद्रियांच्या व मनबुद्धींच्या अचलनावस्थेंत परमात्मप्राप्ति सांगितली असल्यामुळें बुद्धीचा चलनत्व निश्चित होतें असें सांगतात- 'यदा' विशेष प्रतिशोधाला शोधाच्या अनुज्ञापर्यवसायित्व असल्यामुळें असा अर्थ. क्रियावत्त्वाविषयीं दुसऱ्या श्रुतीचें उदाहरण सांगतात- 'तसें विज्ञानम्' या वाक्यांत जीवाचा क्रियावत्त्व सांगितलें बुद्धीचें कां नाहीं? अशी आशंका असतां सांगतात- 'आनंदमय' "अन्योऽन्तर आत्माऽऽनंदमयः" या वाक्यांत असा अर्थ. पण येथें विज्ञानाचें द्रव्यत्व सांगितलें आहे बुद्धीचें कां नाहीं? अशी आशंका असतां सांगतात- 'विज्ञान व बुद्धि' ज्यांच्याकडून जाणलें जातें तें विज्ञान= बुद्धि असा अर्थ. बुद्धि व मनांत वृत्तिभेदामुळें भेद असला तरी स्वरूपानें भेद नाहीं व तसें असतां अंतःकरणाचा अपलाप कसा? अशी आशंका असतां सांगतात- 'तसें विज्ञानेन' ज्ञानोत्पत्तीस मनाला साधारण करणत्व असल्यामुळें व बुद्धीलाही तद्रूपत्व सांगितलें असल्यामुळें त्या दोघांत स्वरूपभेद नाहीं असा अर्थ. आतां जें सांगितलें कीं मन करण असून बुद्धि कर्ता आहे त्यामुळें त्यांच्यांत भेद आहे. तेथें करणत्व व कर्तृत्व समान आहे असें सांगतात-'

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ विवरण ॥

अशरीरीतीनें करण पक्षपाती अशा विज्ञान व मनाला एकत्व असल्यामुळे, व मनाला "कामः संकल्पः" [बृ. १।५।३] इ-
त्यादि वृत्तिमत्वाचें श्रवण असल्यामुळें एक अंतःकरण विज्ञान व क्रियाशक्तिमान् मन आदि शब्दांचें वाच्य श्रुतींत विज्ञा-
न करून प्रसिद्ध आहे. तसें "बुद्धेर्गुणेनात्मगुणेन चैव" [श्वे. ५।८] "सधीः स्वप्नो भूत्वेमं लोकं संचरति" [बृ. ४।३।७]
"विज्ञानमयो मनोमयः" [ ] इत्यादि श्रुतींत आत्म्याच्या अवच्छेदकत्वानें स्वगुणारोपाचें व गमना-
गमनादिकांचें निमित्तत्वही त्याला कळतें. तसें "कस्मिन्न्वहमुत्क्रान्त उत्क्रान्तो भविष्यामि" [प्र. ६।३] या श्रुतींत
उत्क्रान्त्यादिकांविषयीं उपाधि अशा प्राणालाही अंतःकरणाशीं संबंध कळतो. म्हणून एकेकाचे दोन उपाधींचा उपयोग आहे व
त्यामुळें वर्णन केलेलें अंतःकरण श्रुतिविज्ञान करून सिद्ध होतें. पण अर्थवादांतील लिंगांना त्यामान्याची अपेक्षा आहे? खरें
आहे. निरंश असंग अशा आत्म्याला आकाशाप्रमाणें उपाधिवांचून गमनपरिच्छेदादिकांची अनुपपत्तीच

॥ विवरण व्याख्यान ॥

'कमनाचा कामः' 'कामः संकल्पः' असा उपक्रम करून 'सर्वं मनः' इत्यन्तानें वृत्तिमत्वाचें श्रवण असल्यामुळें असा अर्थ. 'बु-
द्धीचा आत्म्याच्या अवच्छेदकत्वानें स्वधर्मांच्या आरोपाचें निमित्तत्व नाहीं असें जे मानितात त्यावर सांगतात- 'तसें बुद्धेर्गुणेन'
जसें अंतःकरण विरुद्ध होतें तसें स्वगुणांच्या आरोपादिकांचें निमित्तत्व त्याला कळतें असा संबंध. 'ध्यायतीव लेलायतीव'- बुद्धि
सह रहातो तो सधीः = बुद्धीशीं एकत्वाध्यास ज्याला प्राप्त झालेला असा अर्थ. 'स्वप्नो भूत्वा' = स्वप्नाच्या द्रष्टृत्वाच्या अवस्थेला प्राप्त
झालेला असा अर्थ. 'इमं' = या जागृत्तलक्षण. 'विज्ञानमयः' = विज्ञानोपाधिक असा अर्थ. पण बुद्धीचें उपाधित्व दिसेल
कसें? 'कस्मिन्न्वहं' इत्यादि वाक्यांत प्राणाचा उपाधित्व कळतें असें आक्षेप असतांना सांगतात- 'तसें कस्मिन्न्वहं' प्र-
'श्नावतरण' प्राणादापारास अंतःकरणाधीनत्व असल्यामुळें त्यानें अं शब्द नाहीं असा अर्थ. पण स्मार्तत्त्वानें प्राणा-
णांचें उपाधित्व कां म्हणत नाहीं? त्यावर सांगतात- 'करणोपाधिनाही' (भाष्यांत्याने आक्षेप) "सधीः स्वप्नो भूत्वा"
येथें अंतःकरणाला गमनादि उपाधित्व व येथें प्राणाला. अशरीरीतीनें निरपेक्ष उपाधिभेदत्वा अंगीकार केल्यास जीवभेदाचा प्रसंग
येतो. असा अर्थ. पण अन्यपर वाक्यस्थ लिंगांना स्वातंत्र्यानें अर्थसाधकत्व नाहीं? अशी शंका घेतो 'पण अर्थवादांतील' उत्क्रान्त्यादिकांना औ-
पाधिकत्व साधकत्वाला स्वतः प्रसक्त नाहीं असा अर्थ. म्हणूनच अपेक्षा आहे त्याचा अंगीकार केला तर 'खरें' म्हणून त्याला कोण जाणें त्यावर सांगतात
'निरंश'

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥

जाता व परिस्पंदशक्तीने प्राण बोलल्या जाता. त्यानें स्फटिक मण्यांत जशी जपाकुसुमाच्या निमित्तानें
लाली तसें आत्म्याला अंतःकरणाच्या उपरागाच्या निमित्तानें मिथ्याच अहंकर्तृत्व येते.

॥ विवरण ॥

त्यापुढे. आतां अति प्रसंग पुरे. पण आत्म्याच्या ठिकाणी क्रिया व परिणाम इत्यादिकां असणार नाहीत. निरवयव सर्वगत व
असंग अशा त्याला परिणामाची अनुपपत्ति असल्यामुळे व परिणामी अंतःकरणाच्या संनिधानामुळे प्रतिभासाची अन्यथा
सिद्धि होते म्हणून, असें सदृष्टान्त सांगतात- 'त्यानें स्फटिक' स्फटिक लौहित्याला मिथ्यात्व आहे कारण त्याच्या प्रतीति
व सत्तेच्या कारणाच्या अभाव आहे, असा भाव. दोन्हींच्या (प्रतीति व सत्तेच्या) अभावाला उत्तर ग्रंथानें सांगतात.

॥ विवरणव्याख्यान ॥

निरंशत्व मुखादि प्रकारानें अपरिणामाला हेतु आहे. सर्वगतत्व गमनादिकांच्या अभावाला. असंगत्व धर्मांतराच्या असंब-
धाला. असा विभाग जाणावा. निरंशत्वादिकांविषयीं विवाद होईल तरी काळ श्रुत्यादिकांनी त्यांची सिद्धि होते. असें सांगतात-'
आतां अति प्रसंग'. पण 'करितो जाणतो भोजन करितो' इत्यादि अनुभवाच्या विरोधामुळे न्यायाचे उत्थान होईल काय?
अशा आशंकेनें बोलतो- 'पण आत्म्याच्या'. काय अनुभवाला विवक्षितांचें साधकत्व आहे? किंवा युक्तिमात्राला?
पहिला पक्ष नाही कारण 'मी मनुष्य आहे' इत्यादि प्रत्ययाला देहादिकांच्या आत्मतासाधकत्व प्राप्त होतें. दुसरा पक्षही नाही.
कारण वास्तव कर्तृत्वादिकाला साधक न्यायाचा अभाव आहे तो असतां हे प्रतीतकीने परमार्थ दुर्वार आहे; असें अभिप्राय
करून सांगतात- 'निरवयव'. मग 'करितो' इत्यादि प्रत्ययांची काय गति? अशी आशंका असतां सांगतात- 'व परिणामी'
व अन्यथासिद्ध प्रत्ययाला असाधकत्व आहे असा 'च' शब्दाचा अर्थ. 'मिथ्या कर्तृत्वादि मिथ्या आहे. त्याच्या प्रतीति व सत्तेला
(व्याख्यानांत)
कारणशून्यत्व असल्यामुळे स्फटिक लौहित्य प्रमाणें' असें सांगितले असतां दृष्टान्ताला साध्यवैकल्य आहे? अशी आशंका अ-
सतां सांगतात- 'स्फटिक लौहित्याला' परमार्थ त्यानें कल्पित लौहित्याच्या प्रतीति व सत्तेला जें कारण त्याचा अभाव असल्या-
मुळे असा अर्थ. पण कारणाभावाची असिद्धि आहे? अशी आशंका असतां सांगतात- 'या दोन्हींच्या'
पण 'स्फटिकांत लाली' या वाक्यांत शुद्ध स्फटिकांत प्रतीयमान लालीचें अधिष्ठान कसें सांगितलें आहे?

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥

१३८५ २०।२८
पण स्फटिकांत लौहित्य मिथ्यात्व कसें? सांगतो— जर स्फटिकाने परत फिरविलेले नेत्ररश्मी जपाकुसुमाप्रत जातील तर विशिष्ट सन्निवेश असल्यामुळेच लौहित्यग्रहण करतील. रूपमात्रनिष्ठ चाक्षुष प्रत्यक्ष तर द्रव्यावांचून होत नाही. तसेंच आश्रयावांचून प्रतिबिंबित रूपमात्र

विवरण

तेथे ४०।८
पण स्फटिकेंच्य अख्यातिवादी— तें स्फटिकगत मिथ्या लौहित्य भासत नाही. परंतु जपाकुसुमगतच गृह्यमाण स्फटिकाहून अविविक्त असतें? अशी शंका घेतो— 'पण स्फटिकांत' असें म्हटें असें सांगतात— 'सांगतो जर'. पण दोषवशामुळे इंद्रियाच्या कुसुमाशी संयोगाचा अभाव असल्यामुळे त्याच्या संन्निवेशाचें ग्रहण नाहीं? यावर नाही असें सांगतात— 'रूपमात्रनिष्ठ' संयुक्तसमवायामुळे किंवा संयोगामुळे गुणांचें ग्रहण असतां द्रव्य-

॥ विवरणव्याख्यान ॥

२२८।११
अशी आपांका असतां स्फटिकांत लौहित्याचा प्रतिभास असिद्ध आहे असें सांगतो— 'तेथे अख्यातिवादी तें स्फटिकगत'. सर्व प्रत्ययांच्या याथार्थ्यामुळे मिथ्या लौहित्याचा प्रतिभास नाही असा अर्थ. प्रतिभासाची गति विचारली असतां सांगतो— 'परंतु जपाकुसुमगतच' जपाकुसुमगत लौहित्य स्वरूपाने गृह्यमाण असा अर्थ. 'स्फटिकाहून अविविक्त'= स्फटिकाहून विलक्षण धर्मिनिष्ठतेनें अस्फुरित असा अर्थ. स्फटिकाच्या ग्रहणाकरितां प्रवृत्त झालेले नयनरश्मी स्फटिकाकडून परत फिरविले जातात व प्रतिहत झालेले असें ते द्रव्याचें ग्रहण करून शोकरूप फळ विच्छिन्न करण्याकरितां असमर्थ परत फिरून कुसुमापासीच लौहित्याचें ग्रहण करितात. परंतु ते कुसुमानिष्ठतेने कळवें नसतां 'लौह स्फटिक' असा व्यवहार होतो असा अर्थ. पण वाचनाच्या कुसुमाशी संयोग झाला असतां त्याशी समवेततेनें लौहित्याचा प्रतिभास होत नाही आणि यामध्ये आम्ही हेतु पहात नाही असें सांगतात— 'असें नाही' प्रतिबंधवशात मुळे अग्रहण होतें? अशी शंका घेतो 'पण दोष' 'त्याच्या संन्निवेशाचें'= त्याच्या कुसुमाच्या निष्ठतेचें असा अर्थ. पण संयुक्तसमवायादि संबंधामुळे रूपाचें ग्रहण मुळे आहे? अशी आशंका असतां सांगतात— 'संयुक्तसमवायामुळे' नैयायिकादिकांच्या मताला अनुसरून 'समवाय' असें म्हटलें; तादात्म्यवादी मताला अनुसरून 'संयोगामुळे' असें म्हटलें. इंद्रियांचा संबंध जसा रूपाशी तसा द्रव्याशीही

१६

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥

कोठें पुढीं उपलब्ध नाही. पण पद्मरागादि मण्यांची जशी जन्मजात तशी जपाकुसुमादिका-
चीही प्रभा असते. तिच्या व्याप्तत्वामुळे स्फटिकही लोहिताकारच भासतो? तथापि स्वतः अ-
लोहित मिथ्याच लोहित असें ग्राह्य होतें. पण प्रभाच लोहित भासते स्फटिक नव्हे? मग स्फटिकांत

॥ विवरण ॥

ही संयुक्त आहे असा भाव. येथें अन्यथाख्यातिवादी प्रतिबिंबित रूप मात्र स्फटिकाशी ऐक्यरूपानें भासते असें
म्हणतो तें बरोबर नाही असें सांगतात - 'तसेंच आश्रयावांचून प्रतिबिंबित रूपमात्र कोठें पुढीं' मग स्फटिक देशी
लौहित्य सद्रूपच स्फटिकाहून अतिरिक्त, किंवा स्फटिकाशी ऐक्यरूपानें ग्रहण केल्याजसें? अशी शंका घेतात - 'पण पद्मरागादि'
तरमग अन्यथाख्यातींत संसर्गाला मिथ्यात्व येते असें सांगतात - 'तथापि स्वतः' अख्यातिवादी शंका घेतो 'पण प्रभाच'
मग स्फटिकाचें ग्रहण असतां संयुक्त समवाय या कारणांच्या एकत्वामुळे किंवा अप्रतिबद्ध संयोगामुळे त्याच्या रूपाचेंही

॥ विवरणव्याख्यान ॥

अविशेष असल्यामुळे त्याचेंही ग्रहण होईल असा अर्थ. पण 'आश्रयावांचून' येथें लौहित्याचें स्फटिकांत प्रतिबिंबितत्व निराकरण
केलें तें अनुपपन्न आहे कारण अख्यातिवाद्यांनी तसें प्रतिबिंब मानलेलें नाही? अशी आशंका असतां त्याचें व्यावर्तक शंका सांगतात.
- 'येथें अन्यथाख्यातिवादी' गुणीला सोडून गुणाचें अन्यत्र गमन उपलब्ध होत नसल्यामुळें असें नाही असा परिहार करितात -
'हें बरोबर नाहीं' साश्रय लौहित्याचें प्रतिबिंब किंवा अविवेक आहे? अशी शंका घेतो - 'मग स्फटिकदेशी' अथवा पण
प्रभेच्या व्याप्तीमुळे लोहिततेने स्फटिकाचा प्रतिभास कसा? गगनाच्या व्याप्ततेनें तर घटादिक गगनाप्रमाणें भासत नाहीत?
अशी आशंका असतां तात्पर्य सांगतो - 'मग स्फटिकदेशी' 'तथापि मिथ्यात्वलोहित' असें जे व्याख्यानांत म्हटलें तें अयुक्त आहे
कारण अख्यातिमतांत अविवेक मानलेला आहे? अशी आशंका असतां हें अन्यथाख्यातींत दूषण सांगितलें आहे असें सांगतात -
'तरमग तन्यथाख्यातींत' पण स्फटिकांत लौहित्याचें प्रतिभान नाही असें कसें म्हटलें जातें? कारण अन्यथाख्यातींत मानलेंच आहे?
अशी आशंका असतां सांगतात - 'अख्यातिवादी' पण लौहित्य प्रभेच्या भानमात्रानें शौक्ल्याच्या भानाची प्रसक्ति कशी? त्यावर
सांगतात - 'मग स्फटिकाचें' पण प्रभेनें शौक्ल्याचें अपसारण अनुपपन्न आहे कारण विरोधाचा अभाव आहे? अशी आशंका असतां प्रभे-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥

शौक्ल्यही प्रकाशित होईल? पण तें प्रभेने अपसारित आहे? असें असेल तर मग नीरूप
चाक्षुष कसा होईल? रूपीद्रव्य संयोगामुळेही नाही कारण वायूलाही तयात्व प्रसंग येतो.
प्रभेच्या निमित्ताने तेथें लौहित्य उत्पन्न होते असेंही म्हणतां येणार नाही. कारण उत्तरकाळी

॥ विवरण ॥

ग्रहण होईल? असें सांगतात- 'भगस्फटिकांतशौक्ल्यही' पण विरोधीगुण अशा प्रभेने विरोधीगुण अशा
शौक्ल्याचे अपसारण किंवा त्याचा प्रतिबंध केला आहे? अशी शंका घेतो- 'पण तें प्रभेनें' अपसारणांत दोष
सांगतात- 'भगतो नीरूप' प्रतिबंधक तर (गुणाच्या) गुण द्वारा विरोधी असल्यामुळे द्रव्यासही समान आहे. असा अर्थ. पण
रूपहीनही द्रव्य रूपी प्रभेच्या संयोगामुळे चाक्षुष होईल? अशी आशंका असतां सांगतात- 'रूपीद्रव्य' काय
रूपीद्रव्याच्या संयोगमात्राने त्याला चाक्षुषत्व येते? किंवा तेथें गुणान्तर उत्पन्न होते? असा विकल्प करून प-
हिल्या पक्षांत दोष दाखवितात- 'कारण वायूलाही'. मग शौक्ल्याला दूर करून लौहित्य तेथें उत्पन्न होतें असें म्हणजे
रूपवत्तेने स्फटिक चाक्षुष होतो? त्यावर नाही असें सांगतात- 'प्रभेच्या निमित्ताने' ... 'कारण उत्तरकाळी'

॥ विवरण व्याख्यान ॥

त्या) गुणद्वयविरोध सांगतो- 'पण विरोधिगुण' पण प्रभेने शौक्ल्याचे अपसारण असतां स्फटिकांत पुनः शौक्ल्याचे उपलभ्यमान असें होईल?
अशी आशंका असतां सांगतो- 'किंवा त्याला' अपसारण व प्रतिबंध शंकेत साधारण दूषण सांगितले अशी शंका येईल. परंतु तें उपपन्न
होत नाही. कारण प्रतिबंध पक्षांत तनिर्विकल्पत्वाच्या अभाव आहे अशी आशंका असतां सांगतात- 'अपसारणांत' प्रतिबंध पक्षांत दूषण सांग-
तात- 'प्रतिबंधक तर' गुणगुणीत भेद नसल्यामुळे गुणाचा प्रतिबंध असतां त्याच्या द्वारा द्रव्याचाही प्रतिबंध मानला पाहिजे असा अर्थ. रूपसं-
बंधाला चाक्षुषत्वाचे प्रयोजकत्व असल्यामुळे स्फटिक नाही प्रभा द्वारा रूपसंबंधामुळे चाक्षुषत्व आहे? अशी शंका घेतो- 'पण
रूपहीनही' विकल्पपूर्वक उत्तराला सुरुवात करितात- 'काय रूपी' पहिल्या विकल्पाचे उत्तर सांगितले असतां दुसऱ्या विकल्पांत आशंका स्पष्ट
करितो- 'मग शौक्ल्याला' निर्दिष्टत्या उपाय असतांही नैमित्तिकाची स्थिती दिसते असल्यामुळे कुसुमाच्या उपाय असतांही
तेथें लौहित्य उपलब्ध होईल असें सांगतात- 'त्यावर नाही' पण नैमित्तिकाच्या मिथ्यात्व साधनाच्या उपक्रमामुळे उप-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥

ही तशा रूपाच्या प्रसंग येतो. हें प्रभेला मान्य करून दृष्टान्त देतो. वस्तुतः तर जशी पद्मरागादि मण्या-
ची प्रभा निराश्रय ही समोर उपलब्ध होते, तशी जपाकुसुमादिकाची होत नाही. म्हणून अ-
शरीरतेने स्फटिकमण्यांत जसा उपाधीचा उपराग (=प्रतिबिंबद्वारानें मिथ्या संबंध) आहे, तसा चैतन्य आत्म्यांत-

'होत नाही' येथपर्यंतच्या ॥ विवरण ॥

'इहप्रभेवा' इत्यादि ग्रंथ स्पष्ट आहे. व त्यामुळे उपरक्त (मिथ्या संबंधित) अहंकाराच्या निमित्तानें कर्तृत्वादिकाचा आरोप
आहे असें सांगतात - 'म्हणून अशरीरतेनें'. पण अहंकाराच्या धर्मांच्या आत्म्यांत आरोपमात्र केला जातो? किंवा
मिथ्या धर्मान्तर उत्पन्न होतें? पहिल्या पक्षीं तर दृष्टान्त लागू होत नाही. व अन्यथाख्यातिप्रसंग येतो. दुसऱ्या पक्षीं
सत्य व मिथ्या अशा कांहीं (धर्मां) द्वयांचा अवभास होईल? सांगतो - स्वधर्मसहितच अहंकाराला आत्म्यांत अध्यस्त केलें.
मिथ्यात्व असल्यामुळें अन्यथाख्याति प्रसंग येत नाही. व दुसऱ्याच्या संबंधामुळें दुसऱ्यांत मिथ्या धर्मांचा अवभास

॥ विवरणव्याख्यान ॥

रागाच्या मिथ्यात्वसाधनाचा उपसंहार कसा? अशी आशंका असतां - उपरागाच्या उपसंहारानें कर्तृत्वादिकाच्या आरोपाच्या उपसंहार
केला जातो असें सांगतात - 'व त्यामुळें'. सांगितलेल्या अर्थावर आक्षेप घेतो - 'पण अहंकाराच्या' इत्यादि. तर मिथ्या वोहील
उत्पन्न होत असल्यामुळें दृष्टान्त व दार्ष्टान्तिकांत वैषम्य आहे असें सांगतो - 'पहिल्या पक्षीं' - भी माझे अन्यच्या मतांत धर्मान्तराची उत्पत्ति आ-
नहीं तु मते मतात सर्वत्र आरोपवाद मानले असल्यामुळें दृष्टान्ताची सिद्धि आहे? अशी आशंका घेऊन असतां दुसरें दूषण सांगतो - 'व अन्य-
थाख्याति' दुसऱ्या पक्षाला दूषित करितो - 'दुसऱ्या पक्षीं' अहंकारगत सत्य कर्तृत्व व आत्मगत मिथ्या कर्तृत्व असा अर्थ त्वद्ध-
यान्याप्रतिभासाचा प्रसंग येतो असा अर्थ. दोन्हीही पक्षांत सांगितलेल्या दोषांचा संस्पर्श येत नाही असें सांगतात - 'सांगतो'
सांगितलेल्या अन्यथाख्याति प्रसंगाचा निरास करितात - 'स्वधर्मसहितच' अन्यथाख्याति मतांत अन्यत्र सत्य रूप्या-
दिकाच्या संसर्ग भासला आवश्यक आहे. येथें तर धर्मविशिष्ट अहंकाराच्या आरोप मानला असल्यामुळें अन्यथाख्या-
तिनाही असा अर्थ. मग दृष्टान्ताची असिद्धि आहे. कारण सर्वें धर्म व धर्मीच्या अध्यस्तत्त्वाचा अंगीकार नाही? अशी आशं-
का असतां सांगतात - 'व दुसऱ्याच्या' दुसऱ्या पक्षाचा अंगीकार केला असतांही दोषाचा संबंध येत नाही असें भा-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अहंकाराचा उपराग (आत्माध्यस्त अहंकारांत आत्म्याचा प्रतिबिंब द्वारानें त्याच्याशी संबंध) आहे.
म्हणून संमिश्र-
उभयरूपत्वामुळे ग्रन्थिप्रमाणे दुणावा अहंकारग्रन्थि म्हटला जातो. त्यांत उपरक्तांच्या
जडरूपत्व असल्यामुळे त्याच्याबळानें उपरागाच्या साक्षात्स्वभाव होत नाही. चिद्रूपाच्या पुनः

॥ विवरण ॥

होतो एतद्यांत हा दृष्टान्त आहे. किंवा कर्तृ(त्व) इत्यादि असतांही धर्मांच्या एकत्वपत्तीनें धर्मांच्या भेदाच्या अन-
वकाश आहे असा अविरोध आहे. "पर्णं भिद्यते हृदयग्रन्थि" [मुं. २।२।८] इत्यादिकांत हृदयग्रंथि अ-
कशामुळे म्हणून संमिश्र
ल्यांत अन्यी हेतु आहे असे कळते. तो अहंकाराचा ग्रन्थि म्हटला जातो? त्यावर सांगतात- "त्यामुळे" पण "आत्मा
आपल्यांत उपरक्त अहंकार असलेला त्याच्या धर्मी दिसावा असा विरोध नाही उपरक्तत्व सामर्थ्यामुळे अहंकार
स्फटिकादिकाप्रमाणें"? त्यावर सांगतात "त्यांत उपरक्तांच्या" जाड्य व चैतन्यें अनवभासकत्व व अवभासकत्व
क्रमानें दिसत आहेत. उपरक्तत्व व अनुपरक्तत्व नाहीत असा अर्थ. पण उपरक्त विषयक ज्ञानव्यापार शून्यत्वामुळे

॥ विवरण व्याख्यान ॥

असें सांगतात- "किंवा" "धर्मींच्या" = अहंकार व आत्म्यांच्या. पण हृदयग्रंथीचा ज्ञाननिवर्त्यत्वाच्या अनुपपत्तीनें अनर्थ-
हेतुत्व कळत असल्यामुळे अहंकाराच्या उपरागभिन्न दिसतानें कर्तृत्व आहे असें अभिसंधान करून अहंकाराला ग्रंथित्व सांगि-
तलें तें कोणत्या कारणामुळे? अशी आशंका घेऊन त्या विषयीं शंका काढिते असल्यास त्याचे व्याप्ति बोधक सांगतात- "पण भिद्यते" आत्म्याच्या अंतःकरणाच्या
उपरागविषयी आक्षेप घेतो- "पण आत्मा" भासकत्व असतां (स्वरूपानें) उपरक्तत्वाची अनुपपत्ति आहे असा आशय.
उपरक्तत्व (अनवभासकत्वाविषयी) अपूर्व आहे असें सांगतात- "त्यावर सांगतात- त्यांत" = (अनवभासकत्वाविषयी)
जाड्य (प्रयोजक असून इतराला (= उपरक्तत्वाला) नव्हे येथें काय विनिगमक आहे? त्यावर सांगतात- "जाड्य व
चैतन्यें". उपरक्ताला अवभासकत्व प्रयोजक असला अनुपरक्ताचा भासकत्व प्रयोजकत्व ह्मटलें पाहिजे. तेंतर युक्त
त्याची (भासकत्वाची)
होत नाही. कारण चैतन्याच्या संबंधाला अभाव असतां सासिद्ध प्राप्त होते असा अर्थ. चैतन्याच्या भासकत्व प्रयोजकत्वा-
विषयीं आक्षेप घेतो- "पण उपरक्त" काय ज्ञानव्यापारद्वारा त्याला भासकत्व आहे किंवा अव्यवधानानें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥

उपरागे'ते उपरक्त विषयक व्यापार रहित असले तरी (उपरक्त) त्याच्या बळाने प्रकाशित होतो. त्याने (या) वस्तु (=अहंकार) गावरून अहंकार इदंमंश (स्फुरण) त्याजोतो. व्यवहारावरुन नव्हे. व्यवहारावरून तर अन्याउ-

॥ विवरण ॥

चैतन्याचाहि जडाहून अविशेष आहे? त्यावर सांगतात- 'चिद्रूपाचा पुनः उपराग' अव्यवधानाने चित्ताच्या संसर्गेच प्रतिभासाला हेतु आहे. ज्ञान व्यापार नाही असा भाव. पण साक्षी स्वरूपाप्रमाणे विज्ञानरूपी क्रियेच्या अव्यवधानावरून अहंकाराची सिद्धि असता त्याला इदंमंशत्व कशाने? त्यावर सांगतात- 'त्याने (या) लक्षणावरून' ६१/१८ अर्थ (=वस्तु) स्वभावावरून असा अर्थ. अर्थावरून चित्स्वरूपता अनिदंमंशता असून चैतन्य कर्मता इदंमंशता होय ज्ञानक्रिया अव्यवधानाने नव्हे असा अर्थ. व्यवहारावरून तर कशाधिकार त्याला इदंमंशता आहे?

॥ विवरणव्याख्यान ॥

परिहारापूर्वी कोरस्याच्या भंग होतो. दुसऱ्या पक्षीं भासकत्वाचा असंभव आहे. स्वप्रकाशत्वामुळे भासकत्व आहे? अशी शंका येते. ती येणार नाही. कारण स्वसत्तेंत दुसऱ्या प्रकाशाच्या निरपेक्षतेने प्रकाशमानत्व स्वप्रकाशत्व होय. वस्तु असतांना त्याच्यापासून दुसऱ्याची प्रसिद्धि कशी? असा अर्थ. व्याख्यानाला अपेक्षित हेतु सांगतात- 'अव्यवधानाने' व्यापाराच्या अभावाच्या अपराधाने प्रतिभासाचा अभाव उपलब्ध होता नसल्यामुळे व्यापाराला अप्रयोजकत्व आहे असा अर्थ. चित्संसर्गाला हेतु सांगतात- 'अव्यवधानाने' चैतन्यावर अध्यस्तत्वामुळे व्यवधान नाही असा अर्थ. पण अहंकाराला इदंमंशत्व असल्यामुळे त्याची व्यवधानाने सिद्धि आहे अशी शंका घेतो- 'पण साक्षी' कार्यैकगतीने इदंमंशत्व (हेतु) आहे किंवा व्यवस्थावरून? प्रसाधिकरणकरून पहिल्यापैकी अन्यथासिद्धि सांगतात- 'त्यावर सांगतात' 'लक्षणावरून' असें म्हटले असतां ज्ञानक्रियान्वयाव्यतिरेक लक्षणाने इदंमंशत्व सांगितले अशी शंका येईल म्हणून सांगतात- 'अर्थस्वभावावरून' हा अर्थस्वभाव कोणता कोणाने इदंमंशत्व म्हटले जाते त्यापासून वैधर्म्याने अनिदंमंशत्व म्हटले जाते? त्यावर सांगतात- 'अर्थावरून चित्स्वरूपता' 'चैतन्य कर्मता'- चित्स्वरूपता 'इदंमंशता' येथे अर्थावरून असा अनुवाद. विनिगमनाला हेतु अज्ञानाविषयी आशंका असतां सांगतात- 'ज्ञानक्रिया अव्यवधानाने' ते पुढे व्यतिरेकाचा अभाव असल्यामुळे ज्ञानक्रियांच्या अव्यवधानाला प्रयोजकत्व नाही असा अर्थ. दुसऱ्या पक्षी असिद्धि आहे असे 'व्यवहारावरून नव्हे' या व्याख्यानांत सांगितले असा अर्थ. नित्य आत्मपक्षाच्या व्यवहारतः इदंमंशाला प्रयोजक आहे? अशी शंका दाखवितो- 'व्यवहारावरून तर'

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥

परागामुळे अनिदमात्मयाला मिथ्या अहंकर्तृत्व येते व त्यामुळे तद्रूप झालेल्या त्याच्या व्यापाराने व्यापार करणाऱ्या त्याच व्यापारपूर्वक ज्याचा परिच्छेद होतो तोच इदमात्मक विषय होय. [म्ह] म्हणूनच अहं हा मिश्र अनिदमात्मक अवभास आहे असा कोणीही विभ्रम आहे. दिसते हो की [२९।१८] लक्षणावरून त्या व्यवहाराला योग्य असतांही त्याला ग्राह्य होत

॥ विवरण ॥

ते सांगतात - 'व्यवहार करून नंतर ज्याच्या उपरागामुळे' 'ज्याच्या' = अहंकाराच्या, 'तद्रूप झालेल्या' = अहंकाराच्या स्वरूपतेला प्राप्त झालेल्या; 'त्याच्या व्यापाराने' = अहंकाराच्या व्यापाराने वृत्तीच्या व्यवधानाने मिथ्याच शरीरेंद्रियादि-धर्मांची इदं अशी प्रतीति भासिता होय. अव्यवधानाने सिद्धीय अनिदंप्रतीति भासिता होय असा भाव. पण अज्ञानाने व्यवहित अहंकार आहे; तेणें त्याच्या इदंतेने अवभास भाव कसा? त्यावर सांगतात - [म्ह] 'म्हणूनच' = (व्यवहारावरून) अनिदंतेने प्रतिभासाकडेच = अज्ञानमात्र व्यवधानामुळेच असा अर्थ. पण वस्तु स्वरूपावरून 'तुं' - 'हें' अर्थ व्याप्त असतां तसा पूर्ज- [६१२ येथे तर विचार असतातू अप्रतियाच्य व्यवहार होतो.] भासाच्या अभाव मुळींच नाही? त्यावर सांगतात 'दिसते हो की' पण ते अविचार केला तरी मुग्ध व्यवहार होत नाहीं?

॥ विवरणव्याख्यान ॥

अनुभवाच्या विरोधामुळे तसें नाही असें सांगतात - 'ते सांगतात' संक्षिप्त केल्या अर्थात निर्णयकाच्या अथवा विषयी आशंका नसतां सांगतात - 'वृत्तीच्या' अनुभवाचा विषय कधी आहे असा अर्थ. इंद्रियसन्निकर्षज ज्ञान वृत्तिशब्दाचा अर्थ आहे. वृत्तिशब्दाचा यथाश्रुत अर्थ ग्रहण करून [अहंकारा] शब्दाच्या व्यवधानाने सिद्धि विषयी आक्षेप घेतला 'पण अज्ञानाने' सांगितले त्या व्यापारद्वारा अवभास मानल्याच्या [म्ह] म्हणून [२३।१८] अज्ञाने परामर्शाच्या शंकेचा निरास करितात 'अनिदंतेने' ते तरी कसे? त्यावर सांगतात - 'अज्ञानदार' अज्ञान [पृ २३।१८] मात्राच्या व्यवधानामुळे अनिदंता प्रतिभास आहे त्यामुळे ही शंका अयुक्त आहे असा अर्थ. अज्ञानमात्र व्यवहितत्व इदंताव भा-सावर प्रयोजक असेल तर अहंकाराच्या ठिकाणी तसा अवभास होईल व तसा तर उपलब्ध होत नाही म्हणून दुसरे प्रयोजक आहे असा अर्थ. व्यवहाराच्या अभावाविषयी आक्षेप घेतला - 'पण वस्तु' इत्यादिकाने त्याची सिद्धि सांगतात 'त्यावर सांगतात दिसते हो की'

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥

नाहीं. जसें अंकुरादि फलपर्यंत वृक्षविकार मृत्परिणामाच्या परंपरेने निष्पन्न होत असला तरी घटवलीकाप्रमाणे मृण्मय व्यवहाराला प्राप्त होत नाही. व्युत्पन्नमती तर त्या व्यवहाराला ही अति-स्पष्ट मानीत नव्हते. निपुणतर अवलोकन करून रूपकपरीक्षकाप्रमाणे अलंकाराचा निरूपण करणाऱ्यास तो संमिश्र इदंरूप आहे असें सांगितलें.

२१।२३ जे पुन: दर्पण जलादिकांत मुखचंद्रादि प्रतिबिंबाचें उदाहरण आहे तें अहंकाराच्या अनिदमंशा जसें बिंबाहून प्रतिबिंब तसा ब्रह्माहून वस्त्वन्तर नाही. परंतु तें तो आहे. पृथगवभास व विप-र्यय स्वरूपता मात्र मिथ्या आहे असें दाखविण्याकरितां आहे. पण तें तो कसा?

॥ विवरण ॥

म्हणून हा दृष्टान्त योग्य नाही? त्यावर सांगतात- 'व्युत्पन्नमतींतर' 'त्या व्यवहाराला' = लक्षणावरून योग्य लौकिक व्यवहाराला. "निपुणतर निपुणतर" इत्यादि ग्रंथ स्पष्टार्थ आहे.

पण जर स्फटिक उदाहरणानंतर आत्म्यांत अनात्म्याचा अध्यास सिद्ध होतो तर वेदान्तविहित दर्पणजलादि उदाहरणाने कांहीं प्रयोजन नाही? त्यावर सांगतात- 'जे पुन:' पण प्रत्यङ्मुखता व भेदावभासा च्या योगाने बिंबाहून प्रतिबिंब वस्त्वन्तर आहे (प्रत्यक्ष) एकत्वाकरितां प्रमाणावाचून तें च तें कसें? अशी शंका घेतो- 'पण

॥ विवरणव्याख्यान ॥

दृष्टान्ताविषयीं आक्षेप घेतो- 'पण तें च' समाधान करितात- "व्युत्पन्नमतींतर"

प्रतिबिंबोदाहरणाचें स्वारस्य सांगण्याकरितां त्यावर आक्षेपाला अवतारणीक करितात- 'पण जर स्फटिकीं'

'असें' शब्दानें सूचित केलेल्या अनुपपत्तीला सांगतो- 'पण प्रत्यङ्मुखता' प्रतिबिंबाचा प्रत्यङ्मुखत्व असून बिंब बिंबत्वाच्याहून विपरीतपणा आहे. असा लोकव्यवहारावरून भेद आहे तसा अनुभवावरून ही आहे. असा अर्थ. पण एकलक्षणत्व व बिंब असल्यामुळें अभेदाचें अभिधान कसें? कारण (आस्वादमती) गाय असे एकस्वलक्षण कडून असतांही खंडादिकांत (एकत्व सूणाच्या) भेददर्शन होतें अशी आशंका असल्यास (प्रत्यक्षविरोध) जाति विषयत्वामुळें तेथें भेददर्शन असो येथें तर वैपरीत्य

॥ व्याख्यान ॥

383 त्यांची एकस्वलक्षणता कळत असल्यामुळें. तो असा - जसा बहिःस्थित देवदत्त ज्या स्वलक्षणाने कळतो. त्या स्वलक्षणानें गृहांतःप्रविष्टही कळतो. तसा दर्पणतलस्थित होऊं कळतो. तेंव्हा वस्त्वन्तरत्व असतां सुकर होत नाहीं. पुन्हा अर्थस्वरूपावरून वस्त्वन्तरत्व असतां आदर्शन्य विवसन्निधि असतांच त्या आकाराने गर्भित परिणत झाला असें म्हणावें लागेल. कारण

॥ विवरण ॥

तें असें कसें? व्यक्तीच्या प्रत्यभिज्ञानामुळें असा परिहार करितात - 'त्यांची एकस्वलक्षणता'. पण आणीडे वरून होणारा भेद प्रतिभास प्रत्यभिज्ञेने कसा बाधित केला जातो? त्यावर सांगतात - 'तें त्यात' तें = एकस्वलक्षणावरून कळणारें ऐक्य. पण व्यक्तिगत ऐक्य व भेदावभासांत कशानें कार्य बाधित करण्यास योग्य आहे? असा संशय असतां व्यक्तिभेद तेथें उपपत्ति शून्य त्यामुळें बाधित केला जातो असें सांगतात - 'पुनः अर्थस्वरूपावरून' आदर्शांचे अवयवच. कुसन्यायानें त्या आकाराने परिणत झाले असें म्हणावें लागेल. कारण कुसन्यायानें व्यक्तीच्या

॥ विवरणव्याख्यान ॥

असें सांगतात - 'व्यक्तीच्या'. पण प्रतीतिप्रमाणाच्या अनुसार भेद व अभेद यांचा परमार्थत्व आहे? अशी शंका घेतो - 'पण आणीडे वरून'. विरुद्ध धर्मामुळें यांच्या प्रामाण्याची अनुपपत्ति आहे म्हणून एकाचा अप्रामाण्य म्हटलें पाहिजे असें सांगतात - 'त्यावर सांगतात'. पण अन्तरसाचा अप्रामाण्य असतांही भेद प्रतिभासाचा अप्रामाण्य व इतराचा प्रामाण्य यांविषयीं आमची मती निश्चय पावत नाहीं अशी शंका घेतो - 'पण व्यक्तिगत'. असंभावित विषयत्वामुळें भेदप्रतिभासाचा अप्रामाण्य व इतराचा प्रामाण्य घटतें असें सांगतात - 'व्यक्तिभेद'. पण आदर्शांचा मुखाकार परिणाम असतां त्याच्या व्याप्तीने मुखाकाराची उपलब्धि होईल (तरी कुठलीही होत नाही) तेंव्हा 'अर्थस्वरूपावरून' येथें कशाच्या अनुपपत्तीने 'त्या आकाराने गर्भित' असें म्हटलें हें कळत नाहीं? त्यावर सांगतात - 'आदर्शांचे अवयवच' अवश्य परिणाम मानलाच असल्यामुळें व्याप्तिकामीची उपलब्धी आहे असा अर्थ. त्याविषयीं हेतु सांगतात - 'कारण कुसन्यायानें' दर्पणगत मुखव्यक्तीच्या उत्पत्तीकरितां कारणाच्या अभाव असल्यामुळें अवश्य परिणाम म्हटलें पाहिजे असा अर्थ. उपायान्तराचा अभाव असिद्ध आहे? अशी शंका घेतो -

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥

विरुद्ध परिणामत्वामुळें व यद्दृच्छसंबंधाच्या अभावामुळें प्रतिमुद्राप्रमाणें बिंबाचीहि तत्वाची अ-
नुपपत्ति आहे; व तसें असतां बिंबसन्निधीने लब्धपरिणति आदर्श बिंबाच्या अपाय असतांही तसाच
राहील. असें तर मानतां येणार नाहीं कीं – संवेष्टित कट, निमित्ताने त्याचा प्रसारण परिणाम प्राप्त

॥ विवरण ॥

नाहीं असे
उत्पत्तीच्या उपायाचा अभाव आहे, असा भाव. पण ही मुद्राने चिन्हित प्रतिमुद्रा आहे? परिणाम नव्हे? त्यावर सांगतात -
'विरुद्ध परिणामत्वामुळे'. मग परिणाम असो? त्यावर नाहीं असें सांगतात- 'व तसें असतां' पण सदा पुरवदिसतें न?
असें नाहीं कारण दर्पणाला बघून निरीक्षण केलें असतां पूर्वी सन्मुख दिसत नाहीं. पण निमित्तकारणाच्या अपाय अ-
सतांही कार्य नाहीं असें होतें. जसा वैशेषिकादिकांच्या अपेक्षाबुद्धीच्या नाश झाला असतांही द्वित्वादिकांचा विनाश होतो.
व हस्तसंयोगाचा अपाय असतां कटविवरणाचा अपाय होतो? त्यावर नाहीं असें सांगतात- 'असें तर मानतां येणार'.

॥ विवरणव्याख्यान ॥

'पण ही' लौकिक प्रतिमुद्रेशी वैलक्षण्यामुळे याला प्रतिमुद्रात्व नाहीं असें सांगतात- 'त्यावर नाहीं असें सांगतात- असमाविरुद्ध'. जशी
परिणामाची मुद्रा असते तशी परिणामाची प्रतिमुद्रा असते. असें तर वैपरीत्य आहे, असा अर्थ. सर्वथा प्रतिबिंब राहील हें इष्ट आहे?
अशी शंका घेतो- 'पण सदा'. जेव्हां दर्पण पहातो तेव्हां प्रतिबिंब ही दिसते असा अर्थ. सदा दर्शन असिद्ध आहे असें सांगतात-
'असें नाहीं कारण'. पण निमित्ताच्या अपाय असतां नैमित्तिकाचा अपाय अन्यत्र दिसत असल्यामुळे बिंबाच्या अपाय असतां प्रतिबिं-
बाची निवृत्ति संभवते. त्यामुळे त्याच्या उपलब्धीचा संभव कसा? अशी शंका घेतो- 'पण निमित्त'. अपेक्षाबुद्धीला निमित्त करून
उत्पन्न झालेल्या द्वित्वादिकांच्या अपेक्षाबुद्धीचा विनाश झाला असतां नाश वैशेषिक मानतात. व तसें असतां दर्पणांत अभिव्य-
क्त प्रतिबिंबाच्या बिंबाची निवृत्ति झाली असतां नाश युक्त आहे. असा अर्थ. 'संवेष्टित कट' येथे 'संवेष्टित होतो' या आणीने प्रसरण
निरासविनाशि आहे. नउत्तरांत तु मन्दाकारणाने तें अर्थान्तर आहे असा विभाग आहे. व 'हस्तसंयोग' हें दृष्टपक्षांतील दृष्टीकरण
आहे. पण निमित्ताचा अपाय असतां नैमित्तिकाचा अपाय होतो? अशी आशंका असतां संवेष्टनाच्या उत्पत्तिकारिता निमित्तसा-
रुणा
पेक्ष नें अनुपपन्न आहे. कारण शंकेचा परिहार होत नाहीं? अशी आशंका असतां प्रसारणाच्या विरुद्ध संवेष्टन संस्काराने तीची

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥

झाला असतां तें निमित्त नाहीसें झाले असतो जसा दाक्षणीन्यसंवेष्टित होतो तसें येथेंही होईल.

कारण चिरकाळ संवेष्टनानें केवळ संस्कार येथें पुनः संवेष्टनाला निमित्त आहे. तसेंच संस्काराच्या २२।१०
च्या निमित्ता-
क्षय होई पर्यंत प्रसारणाच्या अनुवृत्ति असतांनाही पुनः संवेष्टन होईल. याप्रमाणें चिरकाळ जलक असे.

॥ विवरण ॥

कारण सर्वत्र जसा अग्निसंयुक्त द्रुत ताम्रादिकांत तसा पुष्कळ कारणानें विरुद्ध कार्याचा उदय झाल्यामुळेंच पूर्व कार्याचा विनाश होतो. वैशेषिकांना सरतो (पूर्व कार्य विनाश) प्राप्त होतात आहे. कारण त्यांच्या द्वित्वादिकांना वस्तुसहभावित्व आहे असा भाव. पण संस्कारजन्य कार्यान्तराच्या उदयामुळें पूर्व कार्याचा विनाश होतो, निमित्त कारणाच्या अपायामुळे नाहीं हें कशावरून? त्यावर सांगतात- 'तसेंच' निमित्ताच्या अपायमात्रानें जर निवरणाचा अपाय होतो. तर संस्काराच्या सम्भव असतांही संवेष्टित होईल असा भाव? म्हणजे येथें ही पूर्व संस्थानाच्या चिरकाळ संस्थान संस्कारवशामुळे विरुद्ध कार्याचा.

॥ विवरणव्याख्यान ॥

निवृत्ति सांगितली असल्यामुळे त्याचा अनुरूपत्व नाहीं असा परिहार करितात- 'कारण सर्वत्र' पुष्कळ कारणाने विरुद्ध कार्याचा उदय झाला असतां पूर्व कार्याचा विनाश होतो असा संबंध) पण अग्निसंयोगापासून उत्पन्न झाले ल्या द्रवभावाचा अग्नीच्या नाशानंतर असतां अभाव दृष्ट आहे अशी आशंका असतां तेथें ही त्याच्या विरुद्ध काठिन्याच्या उदयामुळे त्याचा निरास होतो असें सांगतात- 'जसा अग्नि' अपेक्षाबु-द्धीच्या नाश झाला असतां द्वित्वादिकांचा नाश होतो असें जें सांगितले त्यावर सांगतात- 'वैशेषिकांना तर' द्वित्वादिकांचा वस्तु-सहभावित्व असतां अपेक्षाबुद्धीच्या अनुविधायित्व असणार नाहीं? अशीही शंका घेतां येणार नाहीं कारण वस्तुसहभावित्व असतांही अपेक्षाबुद्धि अनुविधायित्वा प्रमाणें त्याची उपपत्ति होते. पण वस्तुद्वित्वानें आक्रांत असतां विशेषामुळे तेथें द्वित्वाची अनुपपत्ति आहे? अशीही शंका घेतां येणार नाहीं. कारण हें स्वतंत्र प्रमाणें त्याचा संभव आहे असा भाव. तेथें नैर्णयिक हेतूच्या अभावाची शंका घेतो 'पण संस्कार' पण संस्काराच्या अभावें असतां संवेष्टन असो तथापि विरुद्ध कार्याचा उदय झाला असतां पूर्व कार्याचा विनाश
कार्यान्तराने पु
असो? अशी आशंका असतां सांगतात- 'निमित्ताच्या' (त्या अर्थी होत नाहीं त्या अर्थी विरुद्ध सं... निवरणाचा उपाय होतो असा
भाव) प्रकृतांतही प्रतिबिंबाच्या विपरीत कार्यानें त्याचा विनाश असो अशी शंका घेतो- 'म्हणजे येथेंही' असतांना संस्थान पूर्वे सं-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥

तेव्हा बिंबनिमित्ताने त्याच्या आकाराने परिणत झालेला आदर्शी त्याचा अपाय झाला असताही आ-
परन्तु तसा उपलब्ध होत नाही
सुष्यपर्यंत तसाच स्थित होईल, 'जोपुनः', कमलमुकुलाच्या विकास परिणामाला हेतु दीर्घ-
काळ अनुवृत्तही सूर्यतेज निवृत्त झाले असतां त्याच काळी त्याचा पुनः मुकुलीभाव होतो. तो.

॥ विवरण ॥

उदय झाला असता प्रतिबिंबाच्या अपाय होतो? असें असेल तर नाही, कारण इतका दर्पणमात्रांत चिरकाळ अव-
स्थित मुकुलपरिणामाचा संस्कार असतांही बिंबापायमात्राने प्रतिबिंबाची निवृत्ती दिसते असें सांगतात- 'या
प्रमाणे'. पण चिरकाळ अवस्थित विकास परिणामाच्या संस्काराच्या प्रत्यय असतांही सूर्यकिरण नाहीसे झाले असतां
जसा कमळाच्या विकासाचा नाश होतो. तसा बिंबाच्या अपाय झाला असतां चिरकाळ अवस्थित प्रतिबिंबाच्या
अपाय होईल? यावर नाही असें सांगतात- 'जोपुनः'. पण निमित्तकारणाच्या अपायानंतर येथेही निश्चित आहे. तो

॥ विवरणव्याख्यान ॥

स्थान झाल्याचा अर्थ आहे. काय सर्वत्र निरुपद्रव कार्यामुळे प्रतिबिंबाची निवृत्ति होते? किंवा क्वचित् असा विकल्प करून स्पष्ट-
त्वाला निमित्त निमित्तास- 'नदीकारण' ह्या समासविशेषणाने समस्त संस्काराच्या अभाव विवक्षित आहे. दुसऱ्या पक्षींही प्रति
बिंबाच्या निवृत्तीच्या निमित्ताच्या (समस्तकारणाच्या कारणीभूत) अभाव असल्यामुळे त्याची उपलब्धि होईल असा अर्थ. नि
मित्ताचा अपाय असतां नैमित्तिकाच्या अपायाकरितां दुसऱ्या दृष्टान्ताची शंका घेतो- 'पण चिरकाळ' पण येथेही मुकुलाच्या
संस्कारामुळे मुकुलत्वाला उदय झाला असतो. विकासाच्या अपाय होतो. किरणाच्या अपायमात्राने नाही म्हणून दृष्टान्त विषम आहे?
अशी आशंका असतां सांगतो- 'चिरकाळ' वसंतकाळी नादेयमाळा रात्रीपेक्षा दीर्घकाळ असत्यामुळे विकास संस्काराचे
चिरकाळ अस्तित्व जाणावे. दृष्टान्ताच्या असंमतीने उत्तर सांगतात- 'यावर नाही' निर्णायक कारणाच्या अभावाच्या अ-
भिप्रायाने शंका घेतो- 'पण (निमित्त)'. निमित्तकारणानेही तसें मानले असता वैपरीत्य कां असणार नाही
असें सांगतो- 'निमित्तकारणाचे' निमित्ताच्या अपायामुळे नैमित्तिकाचा अपाय असतां दुसऱ्या कारणांनीही मुकु-
लन उपलब्ध होईल. पण तसें होत नाही असें सांगतात-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥

पृथ्वीच्या कमळमुकुळाला हेतु, (अंश्या) पार्थिव व जलावयव त्यांचा संनिवेश आहे. कारण त्यांच्या उपरम झा
ल्या असतां जीर्णाच्या पुनः मुकुलता उपलब्ध होत नाही. आदर्शांत तर तसा पूर्वरूपपरिणामाला

॥ विवरण ॥

पार्थिवादि अवयवजन्य मुकुळता नाही. त्यावर सांगतात- 'कारणत्वांच्या', मग आदर्शांतही मुखाच्या विपरीत कार्य-
परिणामाला हेतु कल्पित करावा? यावर नाही असें सांगतात- 'आदर्शांत तर'. कारण शिलींच्या कर्माच्या अपेक्षेनें
आदर्शतलाचा जन्म होतो असा भाव. पुनः बिंबाचे संनिधान असतांही दर्पण द्रव्याचा मुखाकार करण्यास हात-
चे दादि बहुप्रयत्न दिसतो. तसें स्पर्शविषयाच्या अभावही आहे (म्हणून नाही प्रतिबिंब परिणाम नव्हे) अवय-
वांचें व्यवधान असता त्याला वास्तुत्वही येणार नाही. असाहीयेथें विशेष जाणावा. येथे प्रयोग असा- दर्पणा-

॥ विवरणव्याख्यान ॥

'त्यावर सांगतात' मग मुखाच्या विपरीत कार्यान्तर दिसत असल्यामुळे त्याच्याविषयीं उत्पत्तीकरिता कारणान्तराची कल्पना
करावी अशी शंका घेतो- 'मग आदर्शांतही'. ते कार्यान्तर अन्यथा उपपन्न आहे असें सांगतात- 'यावर नाही', दर्पण सदा
समतल असते. मुखाकार प्रतिभास तर दुसऱ्या रीतीने होतो असा समाधानाचा अभिसंधि. पूर्वरूप परिणाम ज्याचा
झाला आहे अशा हेतुमुळे आदर्शाच्या सद्भाव असल्यामुळे त्याच्या हेतूचा अपजनक काय? अशी आशंका असतां सांगतात- 'कारण
शिलींच्या' प्रतिबिंबाच्या दर्पणपरिणामत्वाच्या अभावाविषयी दुसरा हेतु सांगतात- 'पुनः बिंबाचे' (दूर) म्हणून स्पर्श दर्पण
परिणाम त्याचा अंगीकार असतो प्रतिबिंबालाही स्पर्श प्रत्यक्षत्व येईल परंतु तसें नाही असें सांगतात- 'तसें स्पर्श' काष्ठ अव
यवांच्या व्यवहितत्वामुळे स्पर्श प्रत्यक्षत्व नाही अशी आशंका असतां सांगतात- 'अवयवांचें' दर्पणावयवांना स्व-
च्छत्व असल्यामुळे नयनरश्मि प्रतिबंधकत्व नाही कारण स्फटिकांतरितांचीही उपलब्धि होते? अशी आशंका असतां
(दर्पणगति)
दर्पणादिकांत मुख सत्ता नाही कोणत्याने (त्यात) वास्तु येईल अशा आशयाने सांगतात- 'येथें प्रयोग असा'. दर्पणस्थ मुखरूप-
संस्थान दर्पणादिकांच्या संसर्गितेने उत्पत्तीला अयोग्य आहे. त्याच्या उत्पत्तीला कारण शून्यत्व असल्यामुळे, जेजे उत्पत्ति-
कारणरहित असते ते ते उत्पत्तीला अयोग्य असते जसें शशविषाण, म्हणून येथल्या साध्याला असंभावित

॥ व्याख्यान ॥

हेतु नाहीं. पणतरी व स्वतन्त्र नसे. तेंच ते इतर सहनवेळ जात नाहीं कारण मिथ्यारूप असा-
ही शुक्तिरजतांच्या सत्य रजताशी एकरूपतेनें अवभासहि दिसतो? असें नाहीं. तयत्तरबाधदि.

॥ विवरण ॥

दिक्कांत पुरव व्यवहारांतर नाहीं त्याच्या जन्माचा कारण शून्यत्व असल्यामुळे शशमस्तकशृंगाप्रमाणें. मग शुक्तिका-
रजताप्रमाणें मिथ्या त्याची उपपत्ति होत असल्यामुळे पुरुषाशी एकत्व नाहीं? अशी शंका घेतो- 'पणतरी' पण
प्रत्यभिज्ञा त्या भागानें एकत्व कळतें? त्यावर नाहीं असें सांगतो 'कारणमिथ्यारूप'. 'भासे रजत' अशी मिथ्यारूपसां-
तही प्रत्यभिज्ञा दिसते असा अर्थ. उत्तर सांगतात- 'असें नसे.' तेथें हें रजत नव्हे असें बाधस्वरूपच बा-
धित केलें जातें. 'येथें रजत नसो परंतु तें हें रजत' असें देशाभावाच्या बाधानें सत्यरजताशी एकतेनें प्रत्यभिज्ञान

॥ विवरणव्याख्यान ॥

विषयत्वानें अप्रामाण्य असल्यामुळे [illegible] त्यांनी सिद्धि होते असा अर्थ. परस्पर
असता आहे
प्रतियोगींत अन्यतरांत्या निषेध झाला असतां अन्यतरत्व अवस्थान होते. अशा न्यायावरून भेदाचा निषेध अर्थसिद्ध
असल्यामुळे 'तें येथें' हें सहन केलें जात नाहीं' हें अयुक्त आहे. अशी आशंका असतां मिथ्यात्वाचाही संभव असल्या-
मुळे भेद सिद्ध होत नाहीं असें सांगतो- 'मग शुक्तिका' एकत्वाकरितां प्रमाण असतांही एकत्व नाहीं हें व्याहत आहे. अशी
शंका घेतात- 'पण प्रत्यभिज्ञा त्या' प्रत्यभिज्ञेची अन्यथा उपपत्ति होत असल्यामुळे असें नाहीं असें सांगतो - 'त्यावर नाहीं'
'एकरूपतेने अवभास' येथें समान स्वभावभास मात्र सांगितला अशी शंका येईल त्यावर सांगतो - 'भासे हें' रजतसंसर्गाचा
बाध
आहे रजताचा नाहीं म्हणून (व्याख्यानांतील) उत्तरवाक्य सत्व आहे? त्यावर सांगतात- 'उत्तर सांगतात' उत्तराचा
प्रकार सांगतात- 'तेथें' 'जे याकाळपर्यंत रजत कळलें होतें तें रजत नव्हे' असें रजतस्वरूपच निषेध्यमान दिसते असा अर्थ
'जें तें रजत तें हें नव्हे' अशा संसर्ग बाधाची आशंका असतां सांगतात- 'येथें रजत' संसर्गमात्राचा बाध असतां देशान्तरीं सत्
रजत' अशी प्रत्यभिज्ञा होईल. परंतु तशी उपलब्धि होत नाही म्हणून संसर्गीचाही बाध आहे असा अर्थ. 'येथें तो बाध दिसत नाहीं'
येथें बाध्याचा अभाव सांगितला तो कसा? कारण 'येथें पुरुष नाहीं' असा बाध दिसतो? अशी आशंका असतां स्वरूपाच्या बाधा-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥

मतभमल्यामुळे मिथ्याभाव आहे. येथें तो बाध दिसत नाहीं. जे पुनः दर्पण दूर गेलें असतां प्रतिबिंब दिसत नाही तो बाध नव्हे कारण दर्पणांतही तसा प्रसंग येईल.

॥ विवरण ॥

होत नाही म्हणून आधिष्ठानें त्या बाध्यामुळे रजतातील प्रत्यभिज्ञा विभ्रम आहे असा अर्थ. येथें तर हें मुख नव्हे असें स्वरूपानें बाधित केलें जात नाहीं. परंतु येथें मुख नाहीं माझें च हे मुख असी प्रत्यभिज्ञा होते. तीतर बाधित केली जात नाहीं. व्यत्यय तरतां असतां तर येथें मुख नाहीं असा बाध होणार नाही. असा अर्थ. पण स्वमुखावयवांना अचाक्षुषत्व असल्यामुळे प्रत्यक्ष प्रत्यभिज्ञा कशी नाही. कांहीं अवयवांच्या दर्शनावरूनही लोकाप्रमाणें अवयवीच्या चाक्षुषत्वाची उपपत्ति होते.

पण 'तत्त्वमसि' वाक्य 'त्वं' पदार्थाच्या बाधाला निमित्त आहे. कारण संसारीच्या विनाशावरून मोक्षाची

॥ विवरणव्याख्यान ॥

या प्रमाणें सांगितला (संसर्गाचा नाही) असें सांगतात 'येथें तर' रजताच्या प्रत्यभिज्ञेहून वैलक्षण्य सांगतात 'तीतर' सांगितले-ला अर्थाचा व्यतिरेक मुखानें उपपादन करितात 'व्यत्ययान्तरत्व' ग्रीवास्थ मुखाहून दर्पणस्थ मुखाचा अन्यत्व असतां दर्पणांत मुख नाही असा संसर्गाचा निषेध होणार नाही असा अर्थ. मुखाच्या प्रत्यभिज्ञेवर आक्षेप घेतो 'पण स्वमुखावयवांना' पूर्वानुभव संस्कार सहित इंद्रियार्थ संप्रयोगाला प्रत्यभिज्ञा कारणत्व असल्यामुळे येथें तर नेत्राचा मुखावयवाशी संसर्ग नसल्यामुळे प्रत्यक्ष प्रत्यभिज्ञा कशी? असा अर्थ. कारण सकळ अवयवांना अचाक्षुषत्व आहे! कित्येक कांहीं अवयवांची पाहिला पहिजे नाहीं असें सांगतात 'कांही कांहीं' दुसऱ्या पक्षाला दृष्टांत करितात 'लोकाप्रमाणें' त्यासही लक्षण कांही अवयवांच्या दर्शनावरून अवयवी पुरुषाला चाक्षुषत्व आहे. जसें घराला, आंतील अवयव दिसत नसतांही चाक्षुषत्व आहे तसें असा अर्थ

पूर्वी प्रतिबिंबाचा बाध होत नाही असें सांगितले असतां पुढें येथें पूर्वपक्षांत त्वंपदार्थ बाधाचें समर्थन केलें जाते. परंतु ते उपपन्न होत नाही. कारण 'तत्त्वमसि' वाक्याला त्याचे बाधकत्व नाहीं. येथें जीवात्म्याचा बाध सांगितला जातो! असेंही म्हणता येणार नाहीं. कारण वाक्याला अभेद बोधकत्व आहे! असें आशंका असतां त्याविषयी सांगतो 'पण तत्त्वमसि' बाधाच्या निमित्ताविषयीं हेतु सांगतो 'कारण' 'मोक्षाची' ब्रह्मभावाची. किंबहुना त्याच्या अभेदाच्या असंभवामुळे बा-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

(जीवाचें) व्याख्यान ॥

पण 'तत्त्वमसि' वाक्यावरून बाध दिसतो ? असें नाहीं तेथें तत्त्वं अशी बिंबस्थानीय ब्रह्मस्वरूपता प्रतिबिंबस्थानीय जीवाला उपदेशिली जाते. अन्यथा 'तत्त्वमसि' (= तें तूं आहेस) असें असणार नाहीं. परंतु 'अतत्त्वमसि (= तूं नाहीस)' असें होईल. 'रजत नाहीं' याप्रमाणें. पुनः 'नेक्षेतोद्यन्तमादित्यं नास्तं यन्तं कदाचन। नोपसृष्टं न वारिस्थं न मध्यं नभसो गतम्॥'

॥ विवरण ॥

अनुपपत्ति आहे. म्हणून हा दृष्टान्त ठरणें घडत नाहीं ? अशी शंका येते – 'पण तत्त्वमसि' 'सोऽयं देवदत्तः' या वाक्याप्रमाणें हें तादात्म्यपर आहे. पदार्थांच्या बाधपर नाहीं असा परिहार करितात – 'असें नाहीं' 'पुनः' इत्यादि वाक्य स्पष्टार्थ आहे. 'न वारिस्थं' अशा रीतीनें येथें आदित्याच्या वारिस्थतेचा आश्रय केला जातो. येथें अख्यानि-

॥ विवरण व्याख्यान ॥

रूपाला त्याचे बाधकत्व निरसित केलें असतां 'ब्रह्मरूपता' बोधित केली जाते असें कसें सांगितलें जातें ? अशी आशंका असतां सांगतात – 'सोऽहं' त्यावेळचे देशादि वैशिष्ट्याच्या परित्यागानें जसें 'सोऽहं' इत्यादि वाक्याला देवदत्ताच्या स्वरूपपरत्व आहे; त्याप्रमाणें वाक्यांशाच्या परित्यागानें चित्तादात्म्यपरत्वामुळें याला ही बाधकत्व नाहीं असा अर्थ. पण तादात्म्यपरत्व कशावरून ? त्यावर सांगतात – 'पदार्थांच्या' सामानाधिकरण्याच्या विरोधामुळें याला बाधपरत्व नाहीं. 'जो तूं संसारी तें ब्रह्म आहे' असें वाक्यांत सामानाधिकरण्य आहे ? असेंही म्हणतां येणार नाहीं कारण 'जो हा स्थाणू तो पुरुष' येथें स्थाणुपुरुषाला अन्योन्यात्मकतेच्या अयोग्यतेमुळें सामानाधिकरण्य भाव ऐक्यावबोधकत्व नसतो. येथें तरकाल्पनिक विरुद्धांशाच्या परित्यागानें चिदेकरूप वस्तु आदित्य संभवतें असें ह्यामुळें बाधविषयत्व नाहीं असा अर्थ. पण 'नेक्षेत' येथें बिंबप्रतिबिंबांचें ऐक्य निर्दिष्ट केलें जात नाहीं कारण उगवणाऱ्या आदित्यरूपादिकाच्या ईक्षणादिकाचा प्रतिषेध केला असतां अशी आशंका असतां सांगतात – 'न वारिस्थं' 'आदित्यं वारिस्थं नेक्षेत' येथें गगनवर्ति आदित्याचा वारिस्थ प्रतिबिंबाला संनिकर्ष असल्यामुळें त्यांचें ऐक्य आहे असा अर्थ. पण 'जो तर येथें' येथें दर्पणगतदेवानें प्रतिबिंबब्रह्म (प्रतिबिंबाचें ग्रहण) नाहीं ? असें सांगितलें तें अनुभवविरुद्ध आहे ? अशी आशंका असतां सांगतात – येथें अख्यानि-

व्याख्यान

असा शास्त्रीयही व्यवहार प्रतिबिंबाचे बिंबाशी पारमार्थिकच एकरूपत्व दाखवितो. आंतरमा-
नत्वकीं – समोर जाण्यास प्रवृत्त झालेल्या नयनरश्मींकडून भिन्नदेशस्थ बिंबाचे ग्रहण केलें जात
होऊन प्रत्यङ्मुख असा
नाहीं; परंतु दर्पणानें परत केल्यामुळे परावृत्त झालेल्या त्यांचेकडून स्वदेशस्थच बिंब ग्रहण
केलें जाते. त्याचे अनुभवच निराकरण करितो. म्हणून भाष्यही अधिक प्रयत्न करीत नाहीं.
ग्रीवापरिच्छिन्न एक एकस्वभाव भिन्नदेशद्वयीं सर्वस्वरूपाने भासणारे दोन्ही ठिकाणी पाह-

॥ विवरण ॥

वादी - बिंबाहून अन्यत्वाने दर्पणगत प्रतिबिंब नामक आत्मा जर नाहीं, परंतु बिंबच दर्पणाहून अपृथक् मुखा-
कृतिनें होते असें म्हणतात त्यांचा अनुवाद करितात - 'जोत्तर' स्पष्ट आपल्याकडे मुख असल्याप्रमाणें (भासणाऱ्या,
दर्पणाच्या आंत प्रविष्ट असल्यासारख्या दुसऱ्या पुरुषाप्रमाणे आपल्यास निरीक्षण करणाऱ्यासारख्या, या
अशा प्रकारच्या दिसणाऱ्या मुखाळा, तें अस्तित्व नाहीं असें बोलणारा आहेस काय? असें म्हणतात - 'त्याचें
अनुभवच' पण अतिद्व्याच्या एकेकाळी संपूर्णरूपाने देशद्वयवर्तित्व लोकांत कोठेंही दृष्ट नाहीं अशी शंका घेतो - 'पण'

॥ विवरण व्याख्यान ॥

'वादी' अविविक्त ज्ञानवादि वाचामुळे संसर्ग प्रत्ययाच्या अभावाची सिद्धि होते असा अर्थ. प्रतिभासाची गति सांगतो - 'पु-
रंतु' ग्रीवास्थत्वाने अग्रहणामुळे तसा प्रतिभास होतो असें सांगतो - 'बिंबच' अनुभवाशी विरुद्ध आहे असें व्याख्यानांत
सांगितले. त्याविषयीं अनुभव दाखवितात - 'स्पष्ट आपल्याकडे'. 'ग्रीवापरिच्छिन्न' येथें असंभावित विषयत्वाने अभेद-
प्रत्ययाचा प्रामाण्याची अनुपपत्ति आहे असें सांगितले. तें अनुपपन्न आहे कारण क्रमाने एकाचा देशद्वयवर्तिता संभवते.
अशी शंका प्रसंगी सांगतो - 'पण भूत' एकाचा एककाळी संपूर्ण स्वरूपानें देशद्वयवर्तित्व जातींत दृष्ट आहे. त्याची
व्यावृत्ति करितो - 'द्रव्याचा'. गगनाच्या व्यावृत्तीकरितां 'मूर्त' असें म्हटले. वंशादिकांचा अवयवशः देशद्वयवर्तित्व दृष्ट
आहे. त्याकरितां सांगतो - 'संपूर्ण'. क्रमवर्तित्वाची व्यावृत्ति करितात - 'एकेकाळी'. कारण येथें बिंब व प्रतिबिंबांत
भिन्नत्व व भिन्नदेशत्व साधण्याची इच्छा आहे किंवा प्रतिभासाची गति विचारली जाते? असा विकल्प करून पहिल्या-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥

मार्थिक कसें होईल? आहो भेदावभास पारमार्थिक म्हणत नाही. परंतु एकत्व म्हणतो. भेद तर मायाविजृम्भित आहे. मायेंत तर असंभवनीय नामक कांही नाही कारण ती असंभवनीयभासविण्यांत चतुर आहे.

॥ विवरण ॥

परिच्छिन्न एक? एक एकदेशास्थत मुख आहे भ्रमामुळे भिन्नव भिन्नदेशास्थ भासते असें सांगतात- 'आहो' म्हणजे एकांत एकदेशवस्तूंत भेद भिन्नदेशत्व लक्षणवस्तु कायशी आहे? त्यावर सांगतात- 'भेदतर?' पण मायेने-ही प्रमाणविरुद्ध कसें भासेल? त्यावर सांगतात- 'मायेंत तर?' पण भेदावभास अविद्याविजृम्भित कसा? कारण ज्या अर्थी वर निरूपाला प्राप्त आहे त्याही स्पष्ट अवभासमान होत. जळांत खाली विस्तारित प्रतीत होतो. तेथें तर अज्ञान नसते. सांगतो- अध्यासहेतु अज्ञान विषयाला आवरक नाही. असें पूर्वी सांगितलेच. त्यांत सो-

॥ विवरणव्याख्यान ॥

च निरास करितात- 'एक?' कारण भ्रान्तिज्ञ प्रत्यक्षज्ञान होत असल्यामुळे दुसऱ्याला दूषित करितात- 'भ्रमामुळे?' भेदतर मायेने व्यवस्थित होय असें सांगतात- 'पुन: हो?' पण माया विरुद्ध असल्याला धरविणास समर्थ नाही. अन्यथा मुक्तांनाही बंधन करील अशी शंका घेतो- 'पण मायेने हो?' मुक्तांत अविद्येचा अभाव असल्यामुळे अविद्यानिमित्त बंधाचा संभव नाही. अविद्या असतांना तर अकल्पितही संभावित केल्या जाते. जसें सूर्य किरणाच्या ठिकाणी मृगजळाच्या लहरी. त्याप्रमाणे अशा आशयाने सांगतात- 'त्यावर सांगतात?' पण भेदावभासाला अविद्यानिमित्तत्व नाही. कारण तिचा अभाव असतांही त्याला भाव असतो अशी शंका घेतो- 'पण भेदावभास?' विकल्पाला संभव असतो तर नसल्यामुळे असें नाही असें सांगतात- 'सांगतो?' काय विषयस्वरूप अज्ञानाच्या अभाव विवक्षित आहे किंवा अज्ञानाचा? असा विकल्प करून पहिल्याला दूषित करितात- 'अध्यासहेतु?' स्वत: आवृतरूप न व्हावे असल्यामुळे अनात्म्याला आवरक असणे नाही. असें प्रमाणाने काढल्यामुळे येथें सांगितले असल्यामुळे दुसऱ्याला दूषित करितात- 'त्यांत?' अज्ञानाच्या अभावसंबन्ध बाहेर कारण

आत्मसंबंधि असे ध्याने कळते असें सांगतात —

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ विवरण ॥

पाधिक भ्रमांत उपाधीच्य आत्मसंबंधी अविद्यापरिणामाविषयी पुष्कळ कारण आहे. तसे अधिष्ठानाचें याथार्थ्य ज्ञान सोपाधिक भ्रमांत अध्यासाच्या विरोधी नसते. परंतु निरुपाधिक भ्रमांत असते असें जाणावें.

पण अहं कर्ता इत्यादि अध्यासाला सोपाधिक भ्रमत्व असतां, तत्वज्ञानानें अध्यासाची निवृत्ति होणार नाहीं. परंतु

॥ विवरणव्याख्यान ॥

'आत्मसंबंधी' जिच्या सत्यपरिणाम प्रसंगाचे निवारण करितात - 'औपाधिक' अन्तःकरणादि उपाधिच्या योगानें उपाधीगत अविद्या संबंधकत्व आहे. दोष दूषित चित्तानें संपृक्त हें अंशाप्रमाणें असा अर्थ. पण अधिष्ठानाच्या याथार्थ्य ज्ञानाला अध्यासविरोधित्व असल्यामुळे तें असता हे अध्यास कसा? मग काय सर्वत्र तत्वज्ञानाला अध्यासविरोधित्व आहे किंवा क्वचित्? दोन्ही पक्ष नाही कारण तत्वज्ञान असतां ही सोपाधिक भ्रम दिसतो असें सांगतात - 'तसें अधिष्ठानाचें' मग कोठें ज्ञानाला अध्यासविरोधित्व आहे? असें विचारले असतां दुसऱ्या पक्षाच्या अंगीकाराने उत्तर सांगतात - 'परंतु' येथें हें अभिप्रेत आहे - ऊर्ध्वाग्र वृक्षाच्या अज्ञानाला भ्रमहेतुत्व आश्रयिले जात नाही. परंतु ऊर्ध्वाग्र वृक्षाच्या व जलप्रतिबिंबित वृक्षाच्या ऐक्याविच्छिन्न आत्मा तो ला (अज्ञानाला) भ्रमहेतुत्व आहे. त्यामुळे त्यांच्या ऐक्याने अवच्छिन्न आत्म्याच्या अपरोक्षज्ञानाचा अभाव असल्यामुळे अज्ञानाची अनिवृत्ति आहे. त्याच्या अभाव हो जल लक्षण प्रतिबिंबाच्या उपाधीच्या प्रतिबंधामुळे आहे. तेथें प्रतिबंधाची निवृत्ति झाली असतां अपरोक्षज्ञानाने अज्ञानादिकाची निवृत्ति होते.

पण तत्वज्ञान असतां अध्यास निवृत्त होत नाही ही शंका उत्पन्न होत नाही कारण "सविता एको द्रष्टा" [छां.७।३।३२] "तस्मात्तत्सर्वमभवत्" [बृ.१।४।१०] इत्यादि श्रुति तत्वज्ञान असतां पुन्हा तेच श्रवण होते? अशी आशंका असतां सांगतो - 'पण येथें' कारण तत्वज्ञान असतांही अध्यासाची अनुवृत्ति दिसते असें येथें जाणावें. मग त्याची निवृत्ति कशी? असें विचारले असतां उपाधीच्या निवृत्तीने औपाधिकाची निवृत्ति होते व उपाधिनिवृत्ति कर्माधीन असल्यामुळे तत्वज्ञानाचें वैयर्थ्य आहे? अशा आशयाने सांगतो - 'परंतु' पण तत्वज्ञानाच्या वैयर्थ्याची शंका घेत असतां लौकिक प्रतिबिंबाचे उदाहरण

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥

पण प्रतिबिंबाची बिंबाशी एकता कळली असतांही त्याच्यातील भेदादि मिथ्यावभास असतो. तसा जीवाची ब्रह्माशी एकता कळली तरी भेदादि मिथ्यावभास निवृत्त होण्यास योग्य नाही.? सांगतो- देवदत्ताच्या अचेतनांशास च प्रतिबिंबत्व असल्यामुळे सचेतनांशास च प्रतिबिंबत्व असतांही प्रतिबिंब हेतूच्या श्यामादि धर्माप्रमाणे त्याला जाड्यानेही आक्रम्यत्व असल्यामुळे ते प्रतिबिंब अचेतनत्वामुळे

उपाधि भ्रमनिवृत्तीने होईल? अशी शंका घेतो- 'पण प्रतिबिंबाची.' शंकित दोषाच्या परिहार करण्याकरितां प्रथम दुसऱ्या शंकेची निवृत्त करितात- 'कोणत्या?' 'जीव जर प्रतिबिंब आहे तर बिंबात्मतेला जाणण्याकरितां समर्थ नाही त्याला प्रतिबिंबत्व असल्यामुळे जळ पात्रगत देवदत्ताच्या प्रतिबिंबाप्रमाणे' या शंकेचा नियम करितात- 'देवदत्ताच्या' अचेतनत्व प्रयुक्त येथे अनवगति आहे. प्रतिबिंबत्व प्रयुक्त नाही कारण घटादि कांततेस दिसते असा भाव. पण शरीरच अचेतन आहे असे लोकायत (= चार्वाक) म्हणतो त्यावर सांगतात- 'सचेतनांशास च प्रतिबिंबत्व असतांही' दर्पणाच्या जाड्यामुळे प्रतिबिं-

॥ विवरणव्याख्यान ॥

जीवात्मे ज्ञातृत्व अनुपपन्न होऊन कसे जाते? अशी आशंका असतां सांगतात- 'शंकित दोषाच्या' पण दुसरी शंका कळली असतांही ची निवृत्ति केल्याशिवाय तीच शंका कशी? असे विचारतो- 'कोणत्या?' तिला सांगतात- 'जीव जर' जीवाला तत्त्वज्ञानाची अनुपपत्ति असल्यामुळे त्याने अविद्येची निवृत्ति कशी? असा हेतूचा अर्थ. प्रतिबिंबत्व अज्ञानाला प्रधान करून नाही असे सांगतात- 'अचेतनत्व' 'मायोक्त्या' तेथे अचेतनत्व व प्रतिबिंबत्व असतां अचेतनत्वाला प्रयोजकत्व कसे निश्चित केले जाते? त्यावर सांगतात- 'अचेतनत्व' शरीराच्या चेतनत्वाने त्याच्या प्रतिबिंबालाही चेतनत्व असल्यामुळे अचेतनाला प्रयोजकत्व कसे? असे विचारतो- 'पण शरीरस्य' शरीराला चेतनत्व अंगीकार करून दूषण सांगतात- 'त्यावर सांगतात' पण चेतनाच्या प्रतिबिंबाला अंगीकार असतांही व्याख्यानांत 'जाड्याने आक्रम्यत्व असल्यामुळे' असे जसे ठरते त्यावर सांगतात- 'दर्पणाच्या' जसे बिंबाला स्वच्छत्व असतांही उपाधि दोषामुळे प्रतिबिंबात अन्यथात्व येते. या प्रमाणे बिंबाला चेतनत्व असतांही उपाधि दोषामुळे प्रतिबिंबाला जडत्व आहे असा अर्थ. प्रतिबिंबाला चेतनत्व आणि दृष्ट आहे. असे सांगतात ———

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥

२३।१३

बिंबाशी आपली एकरूपता जाणत नाही. तसाच अनुभव येतो कीं बिंबाच्या चेष्टेवाचून प्रतिबिंब चेष्टा करीत नाही. वज्याबात् आपतन्त किंवा परम भ्रान्ती इत्पन्न झाली ती त्याच्यातील सम्यक ज्ञानानें

॥ विवरण ॥

धाकुळे बिंबस्वभाव जाड्यामुळे असा अर्थ. देवदत्ताच्या प्रतिबिंबाच्या अचेतनत्वाविषयीं दुसरा हेतु सांगतात – 'तमात्य' त्या-लाही चेतनत्व असतां कदाचित् स्वातंत्र्यामुळे बिंबाच्या चेष्टेवाचूनही प्रतिबिंब चेष्टा करील असा भाव. पण बिंब देवदत्ताला च भ्रमनिवर्तक तत्वज्ञानाप्रयत्न इष्ट आहे याप्रमाणे बिंबत्वामुळे व स्वाभाव भ्रमानेरासी तत्वज्ञानाप्रयत्न शाहेंबी नाही असें सांगतात – 'वज्याबात्' बिंबत्वकृत तत्वज्ञानाप्रयत्न नाही. परंतु भ्रान्तत्वकृत आहे. तेही अज्ञत्वकृत आहे. तेही

~~जीवितत्वेनैवोक्त आहे~~

॥ विवरणव्याख्यान ॥

'बिंबस्वभावजाड्यामुळे' स्पष्टीकरणानें शरीराला अचेतनत्व असल्यामुळे प्रतिबिंबालाही अचेतनत्व आहे असा अर्थ. प्रतिबिंबाला बिंब स्वरू-पतेच्या ज्ञानाच्या अज्ञानाविषयीं अनुभवाचा उपन्यास 'तसाच अनुभव आहे की' यांत्यांत आला असतो परंतु तो उपपन्न होत नाही कारण हा अनुभवत्याला असाधक आहे अशी आशंका असतां तापुढें सांगतात – 'देवदत्ताच्या' प्रतिबिंबाला बिंबाधीन चेष्टत्व पाहाने अचेतनत्व कसें कारण चेतनाचाही अन्याधीन व्यापार दिसतो त्यावर सांगतात – 'त्यालाही चेतनत्व' नियमानें अन्या-धीन चेष्टत्व अचेतनत्वाला प्रयोजक आहे चेतनत्व असतां तर कदाचित् स्वतःही चेष्टा करील असा अर्थ. पण लौकिक प्रतिबिं-बाच्या अज्ञत्व समर्थनाचा प्रस्तुतत्व असल्यामुळे 'ज्याडात्म आपतन्त' याने परगत ज्ञानानें परगत भ्रांतीच्या आनिवासाचे अभिधान असं-गत आहे अशी आशंका असतां व्याख्यानानें निर्णय शंका सांगतात – 'पण बिंब' पण व्याख्यानांत बिंबाच्या तत्वज्ञानाप्रयत्नाच्या प्रभावाविषयी हेतूचा उपन्यास नाही त्यावर सांगतात – 'बिंबत्वकृत' पण भ्रान्तत्व जर तत्वज्ञाना प्रयोजक आहे तर तेंही तें येथें न आहे त्यावर सांगतात – 'तेही अज्ञत्वकृत' ज्याडात्म अज्ञान असतें त्याला भ्रान्तत्व असतें तर त्याचा हेतु अज्ञाना प्रयत्नही तें येथें च कल्पिलें जातें त्यावर सांगतात – 'तेही जीवत्व' सर्वज्ञत्वादि रूपानें अज्ञानाप्रयत्न विरुद्ध असल्यामुळे त्याच्या विपरीत जीवाला अ-ज्ञत्व आहे असा अर्थ. हें व्याख्यानांतील व्याख्यानकरून सांगितलें. वस्तुतः तर भिन्नत्व तेंच अज्ञान आहे. असा आशय. ब्रह्म भेदानें असून जीव तर त्याच्या विपरीत आहे असा अंगीकार केला तर अज्ञत्व ~~नसल्याचें~~ कारण ~~[illegible]~~ शब्द नाही कारण ब्रह्म नाही सर्वज्ञत्वाच्या अभाव आहे अशी शंका नष्ट होते

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

निवृत्त होते. जों तर देवदत्त 23195 प्रतिबिंबाचें आपल्याहून अभिन्नत्व जाणतो तों त्याच्यातील दोषानें

॥ विवरण ॥

जीवत्व निमित्तक आहे असा भाव. पण ब्रह्म आपली जीवलक्षण प्रतिबिंबात्मता जाणते? किंवा नाही? जर नाही तर सर्वज्ञ-
त्वाची हानि होते? जर जाणते तर ब्रह्म स्वतः तच संसार प्राप्त होईल. नाही असे त्यावर सांगतात 'जों तर देवदत्त' देवदत्त तर आपल्याला, ६५१८
जलपात्रांत अल्पत्वादि गुण जाणत असूनही तत्व ज्ञानानें प्रतिबिंबगत दोषत्वामुळें शोक करीत नाही. त्याप्रमाणें ब्रह्मही प्रति-
बिंबरूपा स्वात्मा जीवांत संसार पहात असूनही तत्व ज्ञानित्वामुळें शोक करीत नाही. तत्वज्ञान व संसरण तर स्वच्छत्व
श्यामत्वादिकाप्रमाणें इतरेतरांत स्थित होत नाही असा भाव. पण एकत्वें ज्ञान असलें तरी तेथें देह विभ्रम निवृत्त होत नाही? खरें.

॥ विवरणव्याख्यान ॥

येतो 'पण ब्रह्म' इत्यादि पक्षी कल्पावा सर्वज्ञत्वाचा असंभव असल्यामुळें अज्ञत्व तेथें दोषावें शक्य आहे. परिशेषपक्षीं स्वतःत संसार दोषी
त्यानें प्राप्त होईल ब्रह्माला तत्वाचें अज्ञत्वचि इष्ट असा आशय. पहिल्या पक्षाचा आश्रय करून त्यानें प्रयुक्त दोषाचा अभाव सांगतात 'त्यावर
नाहीं'? पण 'जों तर देवदत्त' येथें बिंबाला प्रतिबिंबात्मतेचें ज्ञान असलें तरी दोषाचा संस्पर्श होत नाहीं असें सांगितलें तें अनुपपन्न आहे
२२०/७
कारण प्रतिबिंबस्वरूपता जाणतो व त्याच्यातील दोषानें लिप्त होत नाही हें व्याहत आहे? त्यावर सांगतात 'देवदत्त तर' पण ब्रह्माला
तत्वज्ञानित्वानें संसारित्व नाही तर त्याच्या अभेदामुळें जीवालाही तत्वज्ञानित्वानें संसरणाच्या अभावाचा प्रसंग येतो. विपर्ययांत ब्रह्मा-
लाही संसरण दिसेल? अशी आशंका असतां सांगतात 'तत्वज्ञान व संसरण तर' बिंब व प्रतिबिंबांत अभेद असतांही स्वच्छत्व-
दिकांचा जसा उपाधिभेदामुळें संकर होत नाही. त्याप्रमाणें संसरणादिकांचाही होत नाही. असा अर्थ. जीवाला प्रतिबिंबत्व असतांही
तत्वज्ञानाचा संभवत असल्यामुळें व बिंबाला त्याचा असंभव असल्यामुळें जीवाला तत्वज्ञानानें संसार निवृत्ति श्रुतिप्रमाण सिद्ध होते. असें
सांगितलें. तेथें श्रुतीला न्यायाच्या विरोधाची आशंका घेतो 'पण एकत्वें' विगतस्कोममानस (एकात्मतेचें ज्ञान) भेदभ्रमाला
निवर्तक नाहीं त्याला परोक्ष ज्ञानत्व असल्यामुळें बिंब व प्रतिबिंबांच्या ऐक्यज्ञानाप्रमाणें असा अर्थ. लोकांत तत्वज्ञानानें भेद-
अ
भ्रमाच्या निवृत्तीचा अंगीकार करीत नाही 'खरें आहे' या दृष्टान्तानें व लोकांतही भेदाची अनिवृत्ति आहे असें तर म्हणतां येणार
नाहीं असें सांगतात —

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

संस्पर्शाला प्राप्त होत नाहीं. ज्ञानमात्रामुळें प्रतिबिंबाची निवृत्तिही होत नाहीं. कारण त्याला हेतु अशा दर्पणादिकाला पारमार्थिकत्व आहे. जीवः पुनः प्रतिबिंबकल्प चिद्रूप आपणा सर्वांस २३।१८

॥ विवरण ॥

आहे. ते बिंब किंवा प्रतिबिंब म्हणत नाहीं. परंतु उपाधीच्या अज्ञानाने जन्यत्वामुळें ज्ञानानें अनिवर्त्यत्व म्हणत आहे असें सांगतात – 'ज्ञानमात्रामुळे' पण तसें जीवाला ही उपाधीच्या अज्ञानानें आक्रान्तत्व संभवत असल्यामुळे भ्रान्ति, सम्यक् ज्ञाना अयत्व नाहीं व तदाश्रयत्व असल्या प्रतिबिंबता असणार नाहीं. यावर नाहीं असें सांगतात – 'जीवः पुनः' ६५।१८ प्रतिबिंब

कारण "रूपं रूपं प्रतिरूपो बभूव" [कठ: २।५।९] "एकधा बहुधा चैव दृश्यते जलचंद्रवत्" [ब्रह्मबिंदु १२] "अत एव-

॥ विवरणव्याख्यान ॥

'तें बिंब किंवा प्रतिबिंब' एकमेकांपासून असल्या भेदभ्रमाचे अनिवर्तन बिंब किंवा प्रतिबिंब निमित्तक नाही असा अर्थ. त्या बिंबयींहेतु निमित्ताला असलें सांगतात – 'परंतु उपाधीच्या' बिंबादि भेदभ्रमाला दर्पणादि उपाधि जनितत्व असल्यामुळें व त्या उपाधीला अज्ञान मूलत्व असल्यामुळें बिंबभेदभ्रमाला ज्ञान निवर्त्यत्व नाहीं. त्यामुळे भेदभ्रम निवर्तकत्वाविषयीं अयोग्यत्व उपाधि आहे. असा अभिप्राय सांगतात – 'उपाधीच्या' याला (अज्ञानमूलत्वाभावात्) साधन व्यापकत्व त्यात नाहीं कारण सत्याधीनत्व अहंकारादिकाला अज्ञान मूलत्व आहे. त्यामुळे ज्ञानाने अज्ञान निवृत्तीने औपाधिक भ्रमाची निवृत्ति संभवते. असा अभिप्राय. पण जीवात (प्रतिबिंबत्वाने) भ्रान्त्यादिकांना असंभव असल्यामुळे (शास्त्रप्रोक्त) त्याची निवृत्ति दुरापास्त आहे. या शंकेवर बोलतो – 'पण तसें जीवाला ही' विपक्षांत बाधक सांगतो – 'व तदाश्रयत्व' दोन्हीही प्रमाण विरुद्ध आहेत असें सांगतात – 'यावर नाहीं' जीवाच्या प्रतिबिंबत्वाविषयीं प्रमाण सांगतात – 'रूपम्' 'रूपं रूपं प्रतिरूपः' जें दिसतें तें रूप शरीरादि अंतःकरणापर्यंत त्यांत प्रतिरूप म्हणजे प्रतिबिंब बनून राहता झाला. याविषयी श्रुति पुढे स्मृतिही आहे असें सांगतात – 'एकधा' स्वतः एकरूपत्वानें व्यवस्थित असतांही उपाधीच्या भेदामुळे जलपात्रभेदानें ज्याप्रमाणे चंद्र त्याप्रमाणे नाना असल्यासारखा दिसतो. असा अर्थ. श्रुतिस्मृति तात्पर्याला जाणणारे सूत्रकार व्यासही याच प्रमाणें सूत्र रचते झाले असें सांगतात – 'अत एव' आत्मा निर्विशेष आहे म्हणून सूर्यकादि उपमा उपाधीमुळे आहे. "यथा ह्ययं ज्योतिरात्मा विवस्वानपो भिन्ना"

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ विवरण॥

चोपमासूर्यकादिवत् [ब्र.सू. ३।२।५।१८] अशारीतीनें श्रुतिस्मृतिसूत्रांनीं जीवाच्या प्रतिबिंबत्वाचा स्वीकार केला आहे. सूर्याप्रमाणें अमूर्त असलेल्या आकाशाच्या जळांत प्रतिबिंबाप्रमाणें अमूर्त ब्रह्माच्याही प्रतिबिंबाचा संभव आहे. जानुमात्र प्रमाण असलेल्या जळांत दूरविस्तार आकाश दिसतें. म्हणून जळांत आकाशाचें अभ्रादि प्रतिबिंबयुक्त दिसतें असें म्हणणें अशक्य आहे. म्हणून त्याचें प्रतिबिंबत्व व चिद्रूपत्व शास्त्रावरून कळणारें व प्रत्यक्षावरून कळणारें, निराकरण करणें शक्य नाहीं असा भाव.

पण घटाकाशाप्रमाणें उपाधीनें अवच्छिन्न जीव कां असणार नाहीं? नाहीं कारण तसें असतां सामान्यविशेषांच्या योगानें उपाधीकडून अंतःकरणवर्ति ब्रह्माला सर्व स्वरूपानें जीवभावानें अवच्छिन्नत्व असल्यामुळें अनवच्छिन्न ब्रह्म.

॥ विवरणव्याख्यान॥

इत्यादि म्हणजे घेतले असा अर्थ. पण मूर्त वदनादिकांचें प्रतिबिंब दिसत असल्यामुळें ते बरें होवो. अमूर्तत्व असल्यामुळें त्याला प्रतिबिंबभाव नाहीं. न त्यामुळें श्रुत्यादिकांना अन्यार्थत्व आहे? अशी शंका असतां सांगतात- 'अमूर्तही'. आकाश आकाशातें दिसतें? त्यावर सांगतात- 'साभ्र'. साभ्र नक्षत्र आकाशाचा जळांत उपाय असल्यामुळें तें प्रतिबिंब आहे असा अर्थ. पण ते अभ्रादिकांचें प्रतिबिंब आहे गगनाचें नाहीं? त्यावर सांगतात- 'जानुमात्र' अशारीतीनें जीवाच्या प्रतिबिंबत्वाचा अभाव झाल्याने चिद्रूपत्वानें त्याचें भ्रान्त्यादिकांच्या आश्रयत्वाचें समर्थन करीतात- 'चिद्रूपत्व' "अत्रायं पुरुषः स्वयंज्योतिः" [बृ. ४।३।९] इत्यादि आगम 'शास्त्र' शब्दाचा अर्थ आहे. 'गंधाचें अवघ्राण करीतो' अशारीतीनें गंधाच्या घ्राणविषयक अनुभव 'प्रत्यक्ष' शब्दाचा अर्थ आहे.

पण 'प्रतिबिंबकल्प' अशा विशेषणाच्यानिर्देशामुळें जीवाचें अवच्छेदत्व दूषित होतें तें कशामुळें? अशी शंका घेता- 'पण घटाकाशाप्रमाणें'? सर्वगत गगनाला घटाचा अवच्छेद असता जसा घटाकाश त्याचा व्यपदेश होतो. तसा उपाधीनें अवच्छिन्न असलेल्या जीवत्वव्यपदेश आहे असा अर्थ. दृष्टान्तदार्ष्टान्तिकाच्या वैषम्यानें उत्तर सांगतात- 'नाहीं कारण'. 'सामान्यविशेषांच्या योगानें'- अनुवृत्त व्यावृत्त लक्षण रूपानें व्यवस्थित असा भूतेंद्रिय लक्षण उपाधींच्या योगानें जीवभावानें ब्रह्माला सर्व स्वरूपानें अवच्छिन्नत्व असल्यामुळें अशी योजना. 'लोहस्येव'च्या-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ विवरण ॥

अंगाच्या बाहेरच अवस्थान प्रसंगयेतो. तेथें सर्वगतत्व सर्वनियंतृत्वादि ब्रह्माचा येत नाही. कारण अनवच्छिन्न प्रदेशांत अनवच्छिन्नात्म्याहि द्विगुणीकृत वृत्तीचा प्रयोग आहे. पण एकरूपापेक्षेने तें सर्व आहे बहिःस्थित ब्रह्माचें सेवन नाहीं असें समजतां येत नाहीं. कारण 'यो विज्ञाने तिष्ठन्' [बृ. ३।७।२२] इत्यादिकांत जीवरूपातील ब्रह्माचें जीवसंनिधानानें विकारान्तरांत अवस्थान श्रुत आहे. प्रतिबिंबपक्षांतर जलगत सावकाश आकाश अन्तःस्थ प्रतिबिंबाकाशादि संत असल्यामुळें ऐकीकडील दोनदा वृत्तीची उपपत्ति होते त्यामुळें जीवावच्छेदांत ब्रह्माचेंही नियंतृत्वादिरूपानें अवस्थान उपपन्न होतें. म्हणून प्रतिबिंबपक्षच श्रेयस्कर आहे.

मिथ्याज्ञान व तत्वज्ञानाश्रयत्वही तेथें प्रत्यक्ष आहे असें सांगतात-

॥ विवरणव्याख्यान ॥

त्यांचा स्वीकार केला असतां दोष सांगतात- 'तेथें' पण सर्वगतत्वादिकांच्या अनुपपत्तीनें अंतरही अवस्थान आश्रयिलें जातें? असें ही म्हणतां येणार नाहीं असें सांगतात- 'कारण अनवच्छिन्न' सर्वगत ब्रह्माची उपाधीच्या अवच्छेदाकरितां त्यांत प्रथम एक वृत्ति. पुनः त्या अन्तःकरणाच्या अवच्छिन्नातही नियंतृत्वादि सिद्ध्यर्थ दुसरी वृत्ति आश्रयणीय आहे. परंतु ही तेथें उपलब्ध नाही. म्हणून द्विगुणीकृत्य वृत्तीची अनुपपत्ति आहे. कारण गगनाच्या तर वृत्तीच्या अवच्छिन्नात अंगीकार नाही म्हणून वैषम्य आहे असा भाव. गगनाप्रमाणेच अनवच्छिन्नाची अवच्छिन्नांत वृत्ति ग्रहण केली जात नाही. व सर्वगतत्वादिकांचीही अनुपपत्ति नाही. कारण त्यांना निर्मात्र विषयत्व आहे? अशी शंका येतो- 'पण एकरूपापेक्षेनें'? जगतजन्मादि कारण ब्रह्म आहे व त्याचाच नियंतृत्वादिकांचें श्रवण असल्यामुळें असें नाही असें सांगतात- 'नाहीं का वण'? पण अंतःकरणांत प्रतिबिंबित जीवात्म्यानियंतृत्वानें ब्रह्माचें तेथें अवस्थान असल्यामुळें प्राप्त झालेल्या द्विगुणीकृत्य वृत्तीची अनुपपत्ति दुसऱ्या मतांतही समान आहे? अशी आशंका असतां सांगतात- 'प्रतिबिंबपक्षांतर'

पण जी वाक्यनिरूपण असतां श्रवणादि विधीचें वैयर्थ्य येतें कारण ब्रह्माचें चैतन्य स्वतःच स्वप्रकाश आहे? अशी आशंका असतां विपर्यय व त्याच्या हेतुच्या निवर्तक वृत्तीच्या उत्पादनार्थ श्रवणादिकांचें व्याख्यान आहे असें सांगतात- 'मिथ्याज्ञान' 'आपके रूप मानतो' असंरूप अज्ञानाचा प्रयोग असल्यामुळें कर्तृत्वादिज्ञान भ्रामक ज्ञान आहे. अशी शंका येईल त्यावर सांगतात

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥

२३।१८ २३।१८
प्रत्यक्ष आहे. तो अंतःकरणजाड्याने अस्फुट दिसत नाही. तोंतर अहंकर्तृत्व आपले रूप मानतो.
निर्विकल्प ब्रह्माशी आपली एकरूपता जाणीत नाही. म्हणून त्या रूपाचे ज्ञान असतां मिथ्या-
त्याची निवृत्ति सुलभ आहे.

॥ विवरण ॥ (हेच 'जाणत नाही' याचें अनुवाद)

तोंतर अहंकर्तृत्व उपाधि स्वरूपही भ्रान्तीनेंच भासते असा अर्थ. म्हणून तत्त्वज्ञानाने उपाधीच्या निवृत्तीपुढे भेदाची
निवृत्ति होते असें सांगतात- म्हणून

पण अज्ञान जीवाच्या अवच्छेदक उपाधि आहे असें पूर्वी सांगितले. तर जीवाला अहंकारोपाधि ता कशी सांगितली जाते.
होत नाही. कारण चैतन्याला अवच्छेदक विकल्पाच्या तारतम्याने व्यवहार विकल्पाचे तारतम्य आहे. तें
असें- निर्विकल्पक चैतन्यमात्रैकरस अविद्येच्या संबंधामुळे सुषुप्त होतं थोड्या विकल्प व्यवहाराचे आश्रय होते. तदनंतर

॥ विवरण व्याख्यान ॥

'उपाधिस्वरूपही' असंग उदासीन स्वभावाने स्वतः कर्तृत्वादिकांचा असंभव असल्यामुळे भ्रान्तीनें ते भासणे आहे असा अर्थ.
पण उपाधीच्या निवृत्तीने मिथ्याभूताची निवृत्ति व्हावी पाहिजे. त्या रूपाचे ज्ञान असतां हें काय म्हटले जाते? अशी आशंका
असतां तत्त्वज्ञानाने उपाधीच्या निवृत्तीविषयी यत्न करून सांगितले आहे असें सांगतात- म्हणून तत्त्वज्ञानाने

अहंकाराला उपाधित्व असतां पूर्वापरविरोध येतो? अशी शंका घेतो- 'पण अज्ञान' अज्ञानोपहितावान् हु सन्या
उपाधीचे वर्णन असल्यामुळे विरोधाची शंका नाही असें सांगतात- 'हा दोष' पण एकाउपाधीने अपेक्षितार्थाची सिद्धि होत असतां
दुसऱ्या उपाधीने काय उपयोग? अशी आशंका असतां सांगतात 'कारण चैतन्याला' तारतम्याचा स्पष्ट करितात- 'तें असें'
पण आत्म्याला निर्विशेषत्व कसें? कारण त्याचा चैतन्य लक्षण संबंध विशेषाचा सद्भाव आहे? अशी आशंका असतां संबंध असिद्ध
आहे असें सांगतात- 'चैतन्यमात्र' चैतन्य स्वभाव असतांही धर्मान्तराच्या शंकेचा निरास करितात- 'एकरस' 'अनन्तरो
ऽबाह्यः कृत्स्नः प्रज्ञानघन:' (बृ. ४।५।१३) अशा श्रुतीपासून आर्थाची सिद्धि होते असा अर्थ. 'तदनंतर' स्वभावाला
उपस्थापक कर्माची अभिव्यक्ति झाली असतां असा अर्थ. वासना निवचन व्यवहार-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

।। विवरण ।।

अज्ञानोपादान अंतःकरणाच्या अवच्छेदामुळे तेंच स्वप्नांत स्थूलतर व्यवहाराचे आलंबन होतें. पुनः अंतःकरणानें संसृष्ट स्थूल शरीराच्या उपरागामुळें जागरणांत स्थूलतम होतें. उपाधिभेदामुळे जीवभेद प्रसंगही येत नाहीं कारण पूर्वपूर्व उपाधीनें अवच्छिन्नालाच उत्तरोत्तरानें अवच्छेद होतो व निरपेक्ष उपाधींच्या भेद असतांतर जीवभेद होतो.

पण स्थूल शरीराचा उपादान अशा भूतांच्या सूक्ष्मरूपानें सहित अशा कि ऽ शरीरांच्या संस्कारानें उपरक्त अज्ञान सुषुप्तींत जीवाला अवच्छेद करण्यास योग्य आहे कारण तेथें भ्रान्तीचा अभाव आहे. व विभागाला तल्लक्षणत्व आहे; पण भ्रान्ति-ज्ञानाची अपेक्षा न करितांच अर्थगतत्व विभाग कल्पिल्या जातो? असें असेल तर तर तेथें विभागाला कार्यत्व असतां सुषुप्ति-

।। विवरणव्याख्यान ।।

'स्थूलतर' शब्दाचा अर्थ आहे- जाग्रद्बोधाला हेतुभूत स्थापक कर्मे अभिव्यक्त झाली असतां, दुसऱ्या उपाधींच्या उपरागामुळें दुसरा व्यवहार होतो असें सांगतात- 'पुनः अंतःकरणानें'. पण उपाधींच्या भेदानें उपहित जीवाचा भेद होत असल्यामुळें स्वप्नादि-कांत अनुभूताचें जागरणांत अनुसंधान होणार नाहीं? अशी आशंका असतां सांगतात- 'उपाधिभेदामुळें'. काय दुसऱ्या उपाधीनें अप्राप्त भेदाला दुसऱ्या उपाधीच्या कल्पनेनें जीवभेद मानतोस? किंवा प्राप्त भेदाला? असा विकल्प करून पहिल्या पक्षीं दूषित करितात- 'कारण पूर्वपूर्व'. अज्ञानानें अवच्छिन्न अंतःकरणादि दुसऱ्या उपाधीचें वर्जन असल्यामुळें जीवभेदाचा प्रसंग नाहीं असा अर्थ. दुसऱ्या पक्षीचा निरास करितात- 'व निरपेक्ष उपाधींच्या'. दुसऱ्या उपाधीनें प्राप्त भेदाच्या अनपेक्षेनें उपाधिनिरूपण भेद असतां जीवभेदाची आपत्ति येते. परंतु येथें तसें [illegible] जात नसे असा भाव.

अज्ञानाच्या अवच्छेदकत्वाविषयीं आक्षेप घेतो- 'पण स्थूलशरीराचा'. स्थूल शरीराचा उपादान असे जे पंचीकृत पंच (महा)भूत त्यांचें जे सूक्ष्मरूप- अपंचीकृत भूतलक्षण त्यानें सहित असा अर्थ. पण भ्रान्ति नसते त्यावर सांगतो- 'व विभागाला'. विभागाला (जीवाला) भ्रान्तीच्या आधीनत्व असल्यामुळें व भ्रान्तीचा सुषुप्तींत अभाव असल्यामुळें तेथें जीव असणार नाहीं असा अर्थ. भ्रान्तिलक्षणत्व असिद्ध आहे असें सांगतात- 'पण भ्रान्ति'. 'अर्थगतत्व' येथील 'च' काराचे व्यावर्त्य सांगतात- 'भ्रान्तिज्ञानाची'. भेदाला अविद्या-कार्यत्व नाहीं परंतु अविद्यातंत्रत्व आहे व त्यामुळें भ्रान्तीचा अभाव असतांही भेदाची उपपत्ति होते. आत्मा गुडादिकांमध्यें आदिमध्यें [illegible] जाणणारा पूर्ववादी बोलतो- 'तेथें विभागाला'. 'कार्य विभागाला कार्यत्व आहे? किंवा अकार्यत्व'? पहिल्या पक्षीं सुषुप्त्यादिकांत

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ विवरण ॥

प्रकाशादिकांत त्याचा अभाव आहे म्हणून ब्रह्मांतच अविद्यादिकांचे सांकर्य येईल. व विभागाला अकार्यत्व असतां अनादि त्यामुळे अविद्यानिवर्तितत्व येणार नाही? सांगतो - ब्रह्मांत अविद्यादिकांच्या सांकर्याच्या परिहाराकरितां शुद्धत्वादिकांतही जीव ब्रह्मविभाग अहेच असें कल्पिले जातें. पण मग अर्थगतच विभाग आहे विभ्रमगत नाही. खरें आहे. शुद्धत्वादि गत विभागाहून अन्यत्र जीव ब्रह्मविभाग विभ्रममात्रत्वेनें अविद्योपादान म्हटल्या जातो. मग (शुद्धतेंत) अर्थगत विभाग आहे. अविद्योपादान नाही. कारण त्याला अनादित्व आहे व अविभ्रमत्व आहे? खरें तथापि अनादित्व असतांही विभाग अविद्यातंत्र आहे असें आम्ही म्हणतो. जसा आत्मा व अविद्येचा संबंध अविद्यातंत्र आहे. अविद्योपादान नाही. कारण संबंध-

॥ विवरणव्याख्यान ॥

त्याला (कार्यत्वा) अभाव असल्यामुळे जीवाचा अभाव येतो. म्हणून ब्रह्मांत अविद्यादिक येतात. अन्यथा अविद्यादिकांच्या अभावामुळे पुनरुत्थानादि येणार नाही. अशा अर्थी दुसऱ्या पक्षांचा निरास करितो - 'व विभागाला' 'अनादित्व' प्रागभावशून्यत्व. त्यामुळे विभागाला जें अविद्यानिवर्तितत्व 'अनादिअविद्येनें अवच्छिन्न' या उदाहरणांत सांगितलें तें सिद्ध होत नाही असा अर्थ. विकल्पाला अ-हंकारांत न सल्यामुळे असें नाही असें सांगतो - 'सांगतो'. अज्ञान अवच्छेदक नाही असें म्हणण्याचा काय अभिप्राय? काय शुद्धतेंत अवच्छेदत्व नाही? किंवा तो अर्थगत आहे? पहिल्या पक्षाचा निरास करितात - 'ब्रह्मांत' दुसऱ्या पक्षाचा अ-नुवाद करितो 'पण मग' अर्थगत = प्रत्यक् ब्रह्मगत? अशी शंका येईल त्याकरितां सांगतो 'विभ्रमगत नाही' भ्रांत्यात्मक नाही असा अर्थ. विभ्रमगतत्वाच्या अभावाचा अंगीकार करितात - 'खरें आहे' मग अविद्याकार्यत्व कसें सांगितलें? अशी आशंका असतां सांगतात - 'शुद्धत्वादिगत' 'जीव ब्रह्मविभाग' शब्दानें 'मी ईश्वराहून भिन्न आहे' इत्यादि स्वरूपानें स्पष्ट व्यवहारिक प्रमाणभेद सांगितला जातो. मग शुद्धत्वादिगत भेदाचे अविद्योपादानत्वाभावामुळे त्याची निवृत्ति असतांही अवस्थान होईल? अशी शंका येतो. 'मग अर्थगत' त्याला अविद्येचें अनुपादानत्व अंगीकार करितात - 'खरें' मग अविद्येचा अभाव असतांही त्याचें अवस्थान होईल? अशी आशंका असतां अविद्यातंत्रत्वामुळे तिची निवृत्ति असतां त्याची निवृत्ति युक्त आहे असें सांगतात - 'तथापि' पण त्याला अविद्येचें अकार्यत्व असतां अविद्यातंत्रत्व कसें? अशी आशंका असतां सांगतात 'जसा' दृष्टान्ताच्या असंगतीची आशंका असतां सांगतात. 'कारणसंबंध' संबंधाला अज्ञानकार्यत्व असतां त्याच्यापूर्वी अज्ञानाला स्वातंत्र्य राहील परंतु ते जडत्वामुळे उपपन्न होत नाही.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ विवरण ॥

जननान्तरापूर्वी अज्ञानाच्या स्वातंत्र्याचे अवस्थानाची अनुपपत्ति आहे. अनादित्वामुळेही आत्मा व अविद्येच्या संबंधाला अविद्योपाधिकता नाही.

पण जीवब्रह्मांच्या विभाग अविद्यातंत्र कसा असणार? सांगतो - अनादि अविद्याविशिष्ट चैतन्य अनादि जीवभावाने काल्पनिक अनादि भेदाचे आश्रय आहे. स्वरूपाने नाही. कारण त्याला एकत्व आहे. म्हणून विशेष्याश्रय विभाग स्वरूपाशीही उपरज्यमान, विशेषण असा अविद्येच्या तंत्राने असलेला, विशिष्ट आहे म्हणून अविद्याकृत विभाग म्हटला जातो.

॥ विवरणव्याख्या ॥

असा अर्थ. यापुढे कारणामुळे संबंधाला अविद्याकारित्व नाही असे सांगतात - 'अनादित्वामुळेही' प्रागभावाला कार्यत्व दृष्ट आहे. इतर प्रागभाववान् आहे. कारण अज्ञानाच्या अनादित्वाने संबंधालाही अनादित्व आहे असा अर्थ (तसेच आचार्यांचे कथन आहे - "जीव ईशो विशुद्धा चित्तथा जीवेशयोर्भिदा । अविद्या तच्चितोर्योगः षडस्माकमनादयः ॥" असे.)

दुसऱ्या प्रकाराने अविद्यातंत्रत्वाविषयी आक्षेप घेतो 'पण जीव' कारण भेदाचा धर्मी प्रतियोगी तंत्रत्व आहे. असा अर्थ. विकल्पाच्या असहत्वामुळे असे सांगतात 'सांगतो' काय जीव ब्रह्म शब्दांच्या योगाने विशिष्ट चैतन्य विवक्षित आहे. किंवा चिन्मात्र असा विकल्प करून पहिल्याच्या अनुवाद करितात - 'अनादि' चैतन्य जीवभावाने भेदाच्या आश्रय आहे. असा संबंध. पण जीवभावाच्या आगंतुकत्वामुळे त्याला अनादि भेदाचे आश्रयत्व कसे? त्यावर सांगतात 'अनादि जीव' अकृताभ्यागमादि प्रसंगामुळे जीवभावाला आगंतुकत्व नाही असा अर्थ. पण असंगादि रूप चैतन्याला जीवभाव कसा? त्यावर सांगतात 'अविद्याविशिष्ट' मिथ्याज्ञानाचा अनादिकृत करितात 'अनादि' पण भेदाला परमार्थत्व असतां त्याला जीवाश्रयत्व नाही. अशी आशंका असतां हेतूची अपेक्षा आहे असे सांगतात 'काल्पनिक' अंतःकरणविशिष्टाश्रयत्व शंकेचा निरास करितात - 'अनादि भेदाचे' भेदाला सादित्व असतां अकृताभ्यागमादि प्रसंग येतो असा अर्थ. चिन्मात्र या दुसऱ्या पक्षाच्या निरास करितात - 'स्वरूपाने नाही' म्हणून परिशेषपक्ष अवशेष राहतो असे सांगतात 'म्हणून' चिन्मात्र तंत्रत्वाच्या अभावामुळे विभाग विशिष्टाश्रय आहे असा संबंध. पण विशिष्टनिष्ठ भेदाचा तेथून स्वरूपाच्या अनुषंगामुळे अविद्यानिवृत्ति झाली असतां निवृत्ति कशी? त्यावर सांगतात 'स्वरूपाशीही' स्वरूपात उपरज्यमानही विभाग अविद्याकृत म्हटला जातो असा संबंध. 'अविद्याकृत' शब्दाने अविद्यातंत्रत्व विवक्षित आहे त्या विषयी हेतु सांगतात - 'विशेषण असा' पण विभागाला अविद्यातंत्रत्व असल्यामुळे घटादिकाप्रमाणे कार्यत्व आहे. अकार्यत्व असतां ज्ञाननिवर्त्यत्व असणार नाही. त्याला

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ विवरण ॥

अविद्यातंत्रां नाहि अविद्यासंबंधाप्रमाणे अनिर्वचनीयत्व व अनादित्व विरुद्ध येत नाही. लोकांतही दर्पण घटादि विशिष्ट मुख व आकाश असतां मिथ्या भेदावभास होतो स्वरूपाने नाही. म्हणून उपाधिसंयुक्ता भेदाचा बोलली जाते. म्हणून अनादि अविद्या प्रतिबिंबकृत विभाग अशा जीवाला त्या अविद्येपासून उत्पन्न झालेल्या अहंकारादि विशेषणांत स्थूल प्रतिबिंबाच्या अपेक्षेने सर्वांना उपाधित्व विरुद्ध येत नाही.

येथें भास्करवादी प्रतिबिंबाला अवस्तुत्व मानले असल्यामुळे जीव प्रतिबिंब नाही असो जल्पना करितो. तेथें मुख व चित् स्वरूपांना प्रतिबिंबांना अवस्तुत्व आपादता येणार नाही. भेदविपर्यासादिकांना अवस्तुत्व मानले असले तरी मुख व चित् स्वरूपांत कोणताच कमी झाले येत नाही. प्रतिबिंबातील मुख व चित् स्वरूपांनाही मिथ्यांशाच्या पर्युदासाने (= त्यागाने) बिंबात्मता आम्ही प्रमाणाने मानतो. तसेच मिथ्यांशाला बंधमोक्ष नाहीत

॥ विवरणव्याख्यान ॥

अविद्येहून अधिकत्व असून अनादित्व असल्यामुळे आत्माप्रमाणे अशी आशंका असतां दोन्ही ठिकाणी व्यभिचार सांगतात- 'अविद्यातंत्रां नाहि' ज्ञाननिवर्त्यत्व अनिर्वचनीय शब्दाचा अर्थ आहे. उपहित संबंधाला स्वरूपमात्राने (~~भेदाशी~~) असंबंधाविषयी दृष्टांत सांगतात- 'लोकांतही' एकाच पदार्थाने विच्छेदाला दुसऱ्याच्या उपाधीशी संबंधाच्या भ्रम येतो याचा उपसंहार करितात 'म्हणून'

भास्कराच्या मताचा अनुवाद करितात- 'येथें' जीवालाही अवस्तुत्व असतां बंधमोक्ष झाले त्याचा अनन्वय (प्रतिबिंबाच्या) प्राप्त होईल. म्हणून वस्तुत्व इष्ट आहे. म्हणून जीवाला प्रतिबिंबत्व नाही. भावार्थ. काय स्वरूपमात्राला अवस्तुत्व आहे किंवा उपाधिविशिष्टाला? पहिल्या पक्षी अवस्तुत्वाची असिद्धि आहे असे सांगतात 'तथें', दुसऱ्या पक्षाचा अंगीकार करितात- 'भेदविपर्यासादिकांना'. स्वरूपमात्राच्या सत्याविषयी हेतु सांगतात 'मुख व चित्स्वरूपांनाही'. येथें हें मुख अशा प्रत्यभिज्ञेने (प्रतिबिंबातील) मुखाला बिंबात्मता आहे "अयमात्मा ब्रह्म" [मां. २ बृ. २।५।१९] या वाक्याच्या करून जीवात्म्याला ब्रह्मात्मत्व आहे. असा अर्थ. पण विरोधामुळे एकत्व ज्ञान युक्त नाही अशी आशंका असतां सांगतात 'मिथ्यांशाच्या' चित्स्वरूपांतर्गत अंश असल्यामुळे विशिष्टांत बंधाचा अन्वय सांगितला पाहिजे. व तसें असतां त्याला मोक्षान्वयित्व होईल. परंतु तें उपपन्न होत नाही कारण विघ्यांशाची तेथें निवृत्ति होते. म्हणून बंधमोक्षांना हें अधिकरण आहे? अशी आशंका असतां सांगतात- 'तसेंच'. ज्यामुळे

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥

पण तेथें बिंबमाला प्राग्ग्रहणात्मकाच्या बिंबमालोहेतु दर्पणजपाकुसुमादि परमार्थ वस्तु संं.

॥ विवरण ॥

परंतु स्वरूपाकार आहेत. स्वरूपगतत्व्याही सांकर्याच्या परिहाराकरितां उपाधिभेद दाखविला. म्हणून पर सिद्धान्ताच्या अ-ज्ञानाने विवक्षित हा, अव स्थूल मानले असल्यामुळे असा, सर्वसंकर वाद्याच्या विभ्रम आहे.

अहंकारोपाधि निमित्तक जीवब्रह्म विभाग आहे व अनात्माध्यास आहे असे दृष्टान्तद्वयाने सिद्ध आहे. तेथें वेदान्त विहित रज्जुसर्प उदाहरणाने काय? अशी आशंका असतां त्याचे प्रयोजन दुसऱ्या शंकेची निवृत्ति आहे असें सांगतात पण तेथें? निरुपाधिक अध्यासाने परिनिष्पन्न अहंकारोपाधिक कर्तृत्वादि अध्यास आहे असें सांगण्या-

॥ विवरण व्याख्यान ॥

पुढील अनन्वयित्वामुळे असा अर्थ. पण सिद्धांशाप्रमाणे चैतन्यांत ही बंधमोक्ष अनुपपन्न आहेत? अशी आशंका असता सांगतात परंतु? केवळाचा बंधमोक्ष असिद्ध असल्याने त्या उपाधीच्या द्वारा बंधांत अन्वय होत असल्यामुळे मुक्तीची उपपत्ति होत असा अर्थ. स्वरूपगतत्वाने सांकर्याच्या प्रलापही अयुक्त आहे असें सांगतात- स्वरूपगतत्वाही? परमताच्या निरासाचा उपसंहार करितात- म्हणून? स्फटिकादि कान्हा दृष्टान्ताने अपेक्षितार्थ सिद्धि होत असतां रज्जुसर्पाचे उदाहरण वृथा आहे? अशी आशंका असतां शंके-तील्या निराकरणपरत्वाने व्याख्यानांत त्याचे अर्थवत्व सांगितले. तेथें रज्जुसर्प उदाहरणाचे वैयर्थ्य अशी अशी आशंका असतां संकीर्तनपुरःसर तात्पर्य सांगतात- अहंकारोपाधि निमित्तक? दर्पण दृष्टान्ताने जीवब्रह्म विभागाचा औपाधिक कार्य सिद्ध होते. स्फटिक दृष्टान्ताने कर्तृत्वादि कार्याचे मिथ्यात्व सिद्ध होते असा विभाग आहे. वेदान्तविहित? याने विशेषण करून वैयर्थ्य अर्थ गाने निरास केला जातो. पण वेदान्तविहित उदाहरणाचे समर्थन येथें अप्रस्तुत आहे? अशी आशंका असता स्फटिक-लौहित्यादि प्रतिभासांत उपाधि प्रमाणे येथे उपाधीच्या अभाव असल्यामुळे प्रमाण्या संभव नाही? अशी आशंका असतां निरुपाधिक रज्जुसर्पाच्या उदाहरणाचे समर्थन युक्त आहे असा भाव. पण जपाकुसुमोपाधि निमित्तक लौहित्याप्रमाणे कर्तृत्वादि सही उपाधि निमित्तक आहे असें सांगितले. येथें तर रज्जुसर्प दृष्टान्ताने निरुपाधिकत्व सांगितले जाते? अशा विरोधाचे आशंका असतां- तात्पर्य सांगतात्- निरुपाधिक? येथें अहंकाराचा निरुपाधिक अध्यास परिनिष्पन्नत्व सांगितले जाते. पूर्वी.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥

सिद्ध असते. तशी येथें कोणी सर्वत्र सिद्ध असंमात विभ्रमाच्या विलास आहे असा अभिमान धा-
रण करणाऱ्यास नाही? अशी शंका येऊं नये म्हणून रज्जुसर्पाचे उदाहरण दिलें जातें. पण तें येथें जरी
सांप्रत सर्प असन्निहित आहे. तथापि पूर्वी सिद्ध झाळेला त्याचा अनुभवसंस्कार आहेच. ? खरें.

॥ विवरण ॥

जेव्हां असा अर्थ. पण सर्वत्र अधिष्ठान व अध्यस्यमानाहून व्यतिरिक्त (सत्य) उपाधि निमित्तकत्व अध्यास असतो. निरुपा-
धिक असतो? अशी शंका घेत - 'पण तें येथें ही? पूर्वानुभव संस्कारमात्र उपाधि मात्र येथें ही आहे. स्वतंत्र उपाधीच
निराकरण केल्या जातो. असा परिहार करितात - 'खरें येथें ही? पूर्वानुभव संस्कारजन्य भावाचा हेतु आहे. पूर्वभ्रमसं-

॥ विवरणव्याख्यान ॥

कर्तृत्वादि आहे त्याच उपाधीनें औपाधिकत्व सांगितलें म्हणून अविशेष आहे. असा अर्थ. पण सर्प भ्रांत संस्कार उपाधि
आहे येथें तर तसा नाहीं. असे वैषम्य 'पण तें येथें ही? या व्याख्यानांत सांगितलें तें अनुपपन्न आहे कारण प्रकृतांत ही संस्कार
उपाधीचा संभव आहे? अशी आशंका असतां साहचर्य सांगतो - 'पण सर्वत्र' = सर्पभ्रमादिकांत. आत्मव्यतिरिक्त सर्वांच्या अ-
ध्यस्यमानाचें येथें अंतर्भाव असल्यामुळे अधिष्ठान व अध्यस्यमानाहून व्यतिरिक्त (सत्य) उपाधीचें निमित्तत्व ग्रहण करा-
व्याची अनुपपन्न आहे असा अर्थ. पण आधिष्ठानाकडे ही निमित्तत्व असल्यामुळे अवधारणाची अनुपपत्ति आहे? अशी आ-
शंका असतां सांगतो - 'निरुपाधिक? पण निरुपाधिक अध्यासाविषयी रज्जुसर्पाचें उदाहरण सांगून त्याळ औपाधिकत्व
सांगणाऱ्या अन्य ग्रंथावर कसा असणार? अशी आशंका असतां साहचर्य सांगतात - 'पूर्वानुभवसंस्कारमात्र'. 'उपाधिमात्र'
येथील मात्र शब्दाचा अर्थ सांगतात - 'स्वतंत्र' अध्यस्यमान धर्मी शीसमज अशा लौहित्य धर्माच्या आश्रय संस्कारव्यति-
रिक्त उपाधी स्फटिकाप्रमाणे येथें उपाधि नाहीं म्हणून व्याघात नाहीं असा अर्थ. तथापि तेथें प्रमाणानुभव संस्काराला उपाधि
त्व आहे येथें तर तशा प्रकारचा उपाधि नाहीं. असें वैषम्य आहे. अशा शंकेचें निराकरण करण्याकरितां 'पूर्वानुभवसंस्कारमात्र'
हें विशेषण आहे. दृष्टान्त व दार्ष्टान्तिकांत सर्व सामान्याची अपेक्षा असल्यामुळे संस्कारमात्र विवक्षित आहे. असा अर्थ. पण सं-
स्काराला ही अध्यस्तत्व असल्यामुळे अध्यासाचें निमित्तत्व नाहीं कारण अन्योन्याश्रय प्रसंग येतो? असें ही सांगतां येणार नाहीं

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

येथेही बीजांकुराप्रमाणे अहंकारवृत्ति व तिच्या संस्कार यांच्या अनादि कार्यकारणभाव पुढें सांगावया-चा असल्यामुळे संस्कारांविषयी भ्रमाला हेतु आहे.

॥ विवरण ॥

कारण ही असा नियम नाहीं. असा भाव.

पण आत्म्यांत सोपाधिक व निरुपाधिक अध्यास उदाहरण म्हणून सिद्ध असल्यामुळे वेदान्ताविषयींल यथा-र्थाम उदाहरणाची कांही कल्पना नाहीं? अशी आशंका असतां दुसऱ्या शंकेच्या निराकरणाने असंगत्वाची सिद्धि प्रदर्शन

॥ विवरणव्याख्यान ॥

कारण प्राक्तन अहंकारानुभव संस्कारापासून सांप्रतकालीन भ्रमोद्भव संभवतो. तरी दुसऱ्या संस्कारापासून स्मरणाचे बोध नाहीं अशा आशयाने 'पूर्व' असे म्हटले. पण प्रमाणानुभव संस्काराचा भ्रमहेतुत्व प्रसिद्ध असल्यामुळे तशा प्रकारचा संस्कार इष्ट आहे. इतरथा भ्रमाचा अनुद्भव प्राप्त होतो? अशी आशंका असतां सांगतात- 'पूर्वभ्रमसंस्कार नाहीं' प्रतीति अनुभव असल्याचा अर्थ आहे. प्रमाण संस्कारांना केवळ व्यतिरेकरहितत्वामुळे अप्रयोजकत्व आहे असा अर्थ.

दोन प्रकारच्या अध्यास उदाहरणाने सिद्ध होत असल्यामुळे उत्तर भाष्याचे स्पष्टीकरण करावे. येथें असं-गत्व प्रतिपादक 'तेथ जरी' इत्यादि ग्रंथाशी काय कृत्य? अशी आशंका असतां तात्पर्य सांगतात- 'पण आत्म्यांत' सोपाधिक अ-ध्यासाची दर्पण व स्फटिक उदाहरणद्वारा सिद्धि होते. निरुपाधिक अध्यासाची रज्जुसर्प उदाहरणाने होते. अशा विभाग-पण यथाक्रमाने उदाहरण वेदान्तविहित असले तरी येथें त्याचे स्थैर्य वत्व भाषण उचित नाहीं? कारण येथे त्याचा उपक्रम नाहीं. अशी आशंका असतां सांगतात- 'दुसऱ्या शंकेच्या' आत्म्याचा असंगित्वबोध असतां कर्तृत्वादिकांचे अध्यस्तत्व सिद्ध होते परंतु प्रमाणाभावामुळे त्याची सिद्धि नाहीं. 'असंगः' [बृ ४।३।१५] इत्यादि वाक्यही प्रमाण नाहीं. कारण असंगत्वाच्या संभाव-नेला हेतु अशा दृष्टान्ताचा अभाव आहे. स्फटिकादिकांनाही दृष्टान्तत्व नाहीं कारण त्यांनाही संगित्व आहे. अशा प्रकारच्या शंकेच्या निरासद्वारा घटाकाशोदाहरणाने श्रुतीने प्रदर्शित असंगिता संभावित केली असतां-कर्तृत्वादिकांच्या अध्यस्तत्वाची सिद्धि होते. असा अभिप्राय. 'अनिर्वचनीयतेनेच तादात्म्याचा योग्य हो' अशा प्रत्ययाची शंका येईल. त्याकरितां सांगतात-

टिप्पणी

१. 'केवलव्यतिरेकी'- ज्या हेतु विषयी व्यतिरेक व्याप्ति असते तो केवल व्यतिरेकी असावा यदि अन्वय दृष्टान्त नसतो.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥

तेथें जरी अनिर्वचनीयतेनेंच- सावयवत्वानें अरुणादिकांशी तादात्म्याला अयोग्य ही स्फटिका-
दिकांच्या- अतादात्म्यावभास सिद्ध आहे. तथापि तेव्हां स्फटिकांतील प्रतिबिंब स्फटिकाशी सं-
गी असल्यासारखें भासते. रज्जूंत तर सर्पबुद्धीच होते. रज्जूशी त्याचें ऐक्य किंवा अनेकत्व भा-
सत नाही. शेवटी त्यानें "असङ्गो नहि सज्जते" (बृ ३।९।२६) "असंगो ह्ययं पुरुषः" [बृ ४।३।१५]
इत्यादि श्रुतींनी समर्पित आत्म्याची असंगता स्पष्ट दाखविली नाही. म्हणून त्याकरिता घटाकाशोदाहरण
आहे. तेथें तर घटादिकांच्या परामर्शाकल्पनेवाचून भेदरूप, कार्य, समाख्या व्यपगतादि संभवत नाहीत.

॥ विवरण ॥

आहे असें सांगतात- 'तेथें जरी' गुणगुणित्वानें अरुणादिकांशी तादात्म्याला योग्य ही स्फटिकादिकांचा अनिर्वचनीय-
तेनेंच अरुणादिकांशी अतादात्म्यावभास सिद्ध आहे असा अन्वय. 'सावयवत्वानें' यानें धर्मी मात्र सांगितलें. तरी
'रक्तस्फटिक' अशा प्रतिभासावरून स्फटिकाचें लालीशीं तादात्म्य भासतें असा 'तथापि तेव्हा स्फटिकांतील' याचा
अर्थ. पण घटाकाशोदाहरणानें आत्म्याच्या असंगत्वाची सिद्धि कशी? त्यावर सांगतात- 'तेथें तर' भेदरूप आणि
समाख्या. याचा हा अर्थ- घटाकाशाच्या कुडाकाशाहून भेद, अल्पत्वादि परिमाण विशेषरूप, अन्नघृतादि पदा-
र्थांच्या स्थितीकरिता अवकाश देणें इत्यादि कार्य. घटाकाश इत्यादि संज्ञा समाख्या- असा. पण उदाहरणांनीच आ-

॥ विवरणव्याख्यान ॥

'गुणगुणित्वानें' पण घटाकाश दृष्टान्तानेंही असंगित्वाची सिद्धि होत नाही. कारण घटादिकांचे आकाशाशी भेद कथा-
दिकांचा संबंध होतोच. अशी आशंका येते- 'पण घटाकाशोदाहरणानें' उपाधीच्या परामर्शावाचून तेथें स्वतः भेदादिकांची
प्रसिद्धि नाही. असें सांगतात- 'त्यावर सांगतात' काय हें उदाहरण असंगित्वादि सिद्ध करण्याकरिता समर्थ आहेत किंवा नाहीत?
असा विकल्प करून पहिल्या पक्षीं दूषित करितात- 'पण उदाहरणांनीच' स्फटिक व रज्जुसर्प दृष्टान्तांनीं अविकारित्वाची
सिद्धि, दर्पणदृष्टान्तानें ऐकत्वाची, घटाकाशदृष्टान्तानें असंगित्वाची. असा विभाग. द्रुमन्यायानें दृष्टान्तांच्या वैयर्थ्या-
ची प्राप्ति होते. असा अर्थ. असंभावनाबुद्धीच्या निवर्तनानें उपयोगामुळे वैयर्थ्य नाही असें सांगतात—

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥

हे सर्व उदाहरणजात तर, श्रुति स्मृति न्याय व अनुभवानें सिद्धान्त्याच्या असंभावनेच्या परिहाराकरितां व बुद्धिसाम्यत्ते करितां आहे; वस्तुतः च साक्षात् सिद्धीकरितां नाहीं. (अध्यासाच्या पुढे)

म्हणून अध्यासरीतीने जरी चैतन्यैकरस, अहंप्रत्ययापासून पृथक्, अविषय असला तथापि अहंकारात व्यवहाराला योग्य असतो म्हणून गौणवृत्तीनें तो 'अस्मत्प्रत्ययविषय' म्हटला जातो.

॥ विवरण ॥

आत्म्या अविकारित्व, एकत्व, असंगत्वाची सिद्धि होत असल्यामुळे आगमाशी कृत्य नाही? त्यावर नाही असें सांगतात - 'हे सर्व उदाहरणजात' प्रमाणावाचून उदाहरणमात्रावरून अर्थाच्या सिद्धीचा असंभव असल्यामुळे प्रत्युदाहरणाचा संभव आहे असा भाव.

'अस्मत्प्रत्ययविषयत्वात्' हें भाष्य आत्म्यांत अध्यासाच्या उपपत्तीकरिता आहे. त्यांत अस्मत्प्रत्ययवत्याभिधानाने अध्यास दाखविला आतां विषय शब्दाचा अर्थ सांगतात - 'म्हणून' पण गौणवृत्तीने विषय शब्दाच्या

॥ विवरणव्याख्यान ॥

'त्यावर नाही असें सांगतात' त्यांना असंभावनानिवृत्तिकार्यकरणामुळे अर्थसाधकत्वच कां असणार नाही? अशी आशंका असतां सांगतात - 'प्रमाणावाचून' निरपेक्ष आगम प्रमाण शब्दाचा अर्थ आहे. असंभावनेच्या निरासार्थ जे उदाहरण ते 'प्रत्युदाहरण'.

'म्हणून अध्यासरीतीने' याने विषयत्वाचे उपपादन केले जात नसल्यामुळे कारणत्वाची प्रकृताशी असंगति आहे? अशी आशंका असतां सांगतात - 'अस्मत्प्रत्ययविषयत्वात् हें भाष्य' 'अस्मत्प्रत्यय' शब्दाने अहंकार अभिप्रेत असून त्याच्या निमित्ताने कर्तृत्वादि अध्यास दाखविला असा अर्थ. आतां आत्म्यांत अनात्म्याच्या अध्यासाच्या उपपत्तीकरिता विषयशब्दाचा अर्थ सांगतात - अर्थ असा 'पण मग व्यवहारयोग्यत्व' येथे व्यवहारयोग्यतेने आत्म्याच्या विषयत्वाची सिद्धि असतां अध्यासाची सिद्धि. व अध्यासाची सिद्धि असतां अध्यस्त अहंप्रत्ययावरून त्याच्या व्यवहारयोग्यतेची सिद्धि असें इतरेतराश्रयत्व सांगितल्यास ते संभवत नाही. कारण निर्विकल्पक चैतन्यांत अज्ञानाचा अध्यास दिसतो.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥

कारण प्रमेयाला व्यवहारयोग्यत्वाचा अव्यभिचार असतो. पण मग व्यवहारयोग्यत्व असतां अध्यास होणार व अध्यासाने परिनिष्पन्न अहंप्रत्ययवृत्तिवरून व्यवहारयोग्यत्व येणार असें इतरेतराश्रयत्व प्राप्त झालें? नाहि कारण अनादित्वाने त्याचा निरास केला आहे.

॥ विवरण ॥

प्रयोगांत कोणते गुणसाम्य आहे? त्यावर सांगतात- 'कारणप्रमेयाला' पण सविकल्पक अध्यासाला सविकल्पक अधिष्ठान सांगितले पाहिजे. कारण तसें दिसते. निर्विकल्पक चिन्मात्र नव्हे. तेथें अहंकारादिकांच्या अध्यासाने सविकल्प आत्म्यांत अहंकारादिकांचा अध्यास कसा? अशी शंका घेतो- 'पण मग व्यवहार' निर्विकल्पांतही सविकल्पाचा अध्यास दिसत नसल्यामुळे, किंवा अज्ञानाच्या अध्यासाने सविकल्पांत, किंवा पूर्वीच्या अहंकाराध्यासाने सविकल्पक चिदाभासांत उत्तरोत्तर अहंकाराचा अध्यास संभवतोच असें सांगतात- 'नाहि कारण'

॥ विवरणव्याख्यान ॥ जो अध्यास त्याला असा अर्थ.

अशी आशंका असतां सांगतो- 'पण सविकल्पक' 'सविकल्पकाचा' परिच्छिन्नाच्या अहंकाराध्यासाने सविकल्पक (=व्यवहाराला योग्य) परिच्छिन्न किंवा चैतन्यांत अहंकाराचा अध्यास आहे? अशी आशंका असतां इतरेतराश्रयत्वामुळे तसें नाही असें सांगतो- 'तेथे अहंकारादिकांचा' पण व्यवहारयोग्यतेचें अध्यासाला आगाऊ कल्पन असल्यामुळे 'अनादित्वाने त्याचा निरास केला' असें जे म्हटले ते असंगत आहे? अशी आशंका असतां प्रथम व्याख्यानाहून निराळे व्याख्यान सांगतात 'निर्विकल्पांतही' कारण अपरिच्छिन्न अशा गगनादिकांत सविकल्प नीलकटाहादिकांचा अध्यास दिसतो असा अर्थ. सविकल्पकत्व असतांच अधिष्ठानत्व असते असा आग्रह निरर्थक अस्से तर तोहि सुसंपाद आहे असें सांगतात- 'किंवा अज्ञानाच्या' अज्ञानाच्या अध्यासाने सविकल्पांत अहंकाराचा अध्यास होतो व अज्ञानाध्यासाला अनादित्व असल्यामुळे इतरेतराश्रयत्व येत नाही. प्रकारान्तराने इतरेतराश्रयत्वाचा निरास करितात- 'किंवा पूर्वीच्या'

पण आत्म्याच्या अधिष्ठानतेच्या उपपादनानंतर आत्म्याची व्याख्या सोडून प्रतिकर्मव्यवस्थेच्या उपपादनाचा प्रसंग आल्यासारखे दिसत नाही? अशी आशंका असतां सिद्धान्तींच्या मतांत प्रमातृत्वादि व्यवस्था असंभव असल्यामुळे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ विवरण ॥

पण अधिकारी चैतन्यैकतान निष्कळंक स्वभाव आनंदस्वरूप असंग आत्म्याला प्रमातृत्व उपपन्न होत नाही कारण त्याला प्रीतिक्रिया परिणामाचा अयोग आहे. व प्रमातृहीनाला कर्तृत्व भोक्तृत्व संभवत नाहीत. म्हणून प्रमातृप्रमाणप्रमेय, कर्तृकर्मकार्य, भोक्तृभोगभोक्तव्य, संसर्गलक्षण व्यवहाराचा आत्म्यांत असंभव असल्यामुळे व अहंकाराला अचेतन असल्याने त्या सामर्थ्याचा अयोग असल्यामुळे हे जगत उच्छिन्न व्यवहार होईल असें प्राप्त झाले ? आतां जर स्वभावसिद्ध चैतन्यप्रकाशानेच विषयाला प्रकाशित करील तर अविशेषामुळे व सर्वगतत्वामुळे सर्वाला प्रकाशित करील. अशा रीतीनें अव्यवस्था प्राप्त होते. म्हणून विकार समर्थन आला आहे ?

॥ विवरणव्याख्यान ॥

इत्यादिक विकाराद्य आक्षेपणीय आहेत. व त्यामुळे अध्यासाची अनुपपत्ति आहे. अशा उत्तर ग्रंथानें निवर्त्य शंकेला सांगतात - 'पण' पु-न्हा मतांत काय आत्म्याला प्रमातृत्व आहे ? किंवा अहंकाराला ? पहिल्यांत काय प्रमेयगत कर्तृत्व प्रमातृत्व आहे किंवा स्वनिष्ठ प्रमातृत्व ? पहिला पक्ष नाही असें सांगतो - 'अधिकारी' बोधाला स्वरूपामुळे साध्यत्व नाही असें सांगतो - 'चैतन्यैकतान'. प्रयोजनाच्या अभावामुळेही परिणाम नाही तो असा - काय दुःखाचा परिहार करावयाचा आहे ? किंवा सुखप्राप्ती ? नित्यदुःख स्वभावत्वामुळे पहिला पक्ष नाही असें सांगतो - 'निष्कळंक स्वभाव'. दुसऱ्या पक्षाचा निरास करितो - 'आनंदस्वरूप'. हेतूच्या संबंधाच्या अभावामुळेही परिणाम नाही असें सांगतो 'असंग'. अविकारी पदानें सिद्ध हेतूला स्पष्ट करितो - 'कारण त्याला प्रीतिक्रिया'. प्रमातृत्वाच्या अभाव असतां कर्तृत्वादिकांचा संभव असल्यामुळे प्रमातृत्व मानले पाहिजे ? अशी आशंका असतां कर्तृत्वादिकांचा असंभव होईल आहे. अशी आशंका असतां सांगतो 'व प्रमातृहीनाला'. ~~(व कर्तृत्वहीनाला भोक्तृत्व संभवत नाही)~~ मग कर्तृत्वादिक नसोत. अशी आशंका असतां सांगतो - 'म्हणून प्रमातृप्रमाण'. अहंकाराला प्रमातृत्व आहे या (पहिल्या कल्पातील) दुसऱ्या कल्पाचा निरास करितो 'व अहंकाराला'. आत्म्याला अपरिणामित्व असतांही स्वरूपचैतन्यामुळेच प्रमातृत्व आहे. अशी शंका घेतात - 'आतां जर'. अतिप्रसंगानें दूषित करितो - 'तर अविशेषामुळे'. चित्त्वाच्या अविशेष असतांही संबंधाच्या अभावामुळे सर्वांचे प्रकाशत्व नाही असेंही म्हणतां येणार नाही असें सांगतो - 'व सर्वगतत्वामुळे'. पूर्वपक्षाच्या उपसंहार करितो - 'म्हणून विकार समर्थन' आला आहे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ विवरण ॥ ६९/१

यावर दुसरा बोलतो - (द्वैती अशा) सर्वगत आत्मवाद्यांचा हा आक्षेप संभवत नाही. कसा? जर आत्मा, विषय इंद्रिय व मन या चतुष्टयाच्या सन्निकर्षादिकाने उत्पन्न होणारे ज्ञान, क्रिया किंवा गुण असो, निरवयवांत प्रदेशाश्रयत्वाच्या अनुपपत्तीमुळे संपूर्ण आत्मसमवायीच उत्पन्न होईल. तेव्हां सर्वगताला एकाकाळी सर्व मूर्त द्रव्याच्या संयोग असण्यामुळे विज्ञानाश्रय आत्मसंयुक्त सर्व वस्तूंना भासविणारे विज्ञान होईल. कारण प्रदीपादिकातील क्रिया व प्रकाशगुणांना स्वाश्रय संयुक्त वस्तूंत अनुरूप प्रकाशादि अतिशय हेतुत्व आहे. पण अदृष्टाने कांहीच विषयांत ज्ञान नियमित होते? असे असेल तर नाही कारण जितक्या वस्तूशी संबंधित होईल तितक्या वस्तूला भासविणाऱ्या प्रदीपादिकांत अदृष्टाने वस्तु-

॥ विवरणव्याख्यान ॥

पण कोणाच्याही मतांत व्यवहाराची उपपत्ति होत नाही? असावे तांत्रिक आक्षेप घेतो 'यावर दुसरा' काय प्रमातृत्वादि व्यवस्था संभवत नाही असा हा (द्वैती) सर्वगत आत्मवाद्यांचा आक्षेप आहे? किंवा अणुपरिमाण आत्मवाद्यांचा? किंवा देह-परिमाण आत्मवाद्यांचा? असा विकल्प करून पहिल्याला दूषित करितो - 'सर्वगत' कारण त्यांच्या मतांतही व्यवस्थेची अनुपपत्ति समान आहे. असा अर्थ. द्वैतीमतांत आत्म्याला सर्वगतत्व असतांही विकारित्वामुळे स्वसमवेत ज्ञानाने प्रमातृत्व संभवते? अशी (सर्वगतवादी) शंका घेतो - 'कसा?' काय ज्ञानाला क्रियात्व आहे? किंवा गुणत्व? दोन्ही पक्षी काय ते संपूर्ण आत्मसमवायी आहे? किंवा प्रदेश समवायी? असा विकल्प करून पहिल्याचा अनुवाद करितो - 'जर आत्मा' पक्षान्तराची निरसनाचे सांगितले त्या अर्थांतही दुसरा मां-गतो - 'निरवयवांत' त्यामुळे काय? त्यावर सांगतो - 'तेव्हां' सर्वांच्या आत्मसंयुक्तत्वाविषयी हेतु सांगतो - 'सर्वगताला' पण क्रमाने सर्वांच्या संसर्गाचा आपल्या मतांतही संभव आहे? त्यावर सांगतो - 'एकेकाळी' सर्वांना स्वाश्रया (आत्मा) शी संयुक्तत्व असतां कांहीं विज्ञानाला विषयांशी संसर्ग नाही? त्यावर सांगतो - 'कारण प्रदीपादिकांतील' याचा आदि शब्दाचा अर्थ आहे. कारण प्रदीपादिकांतील प्रकाशगुणाला व बाणांतील क्रियेला स्वाश्रयसंयुक्त वस्तूच्या प्रकाशन व भेदनलक्षण अतिशयहेतुत्व आहे; असा अर्थ. संबंधाचा अविशेष असतांही अदृष्टामुळे नियम आहे? अशी शंका घेतो 'पण अदृष्टाने' अदृष्टाहून अतिरिक्त पुरेसे कारण असतां अदृष्टाच्या अभावाने कार्याचा अभाव दिसत नसल्यामुळे असे नाही असे सांगतो 'नाही कारण' संयुक्ताचे बोधकत्व 'वस्तु सामर्थ्य' शब्दाचा अर्थ आहे. याहीकारणामुळे अदृष्टाला नियामकत्व

॥ विवरण ॥

सामर्थ्याचा अतिक्रमण करवून कोणी नियम दिसत नाही. सुख दुःखादिकांविषयी असेल त्या तृणादि उपेक्षणीय सर्व विषया-
च्या भासविण्याने ही असणार ने यमाची अनुपपत्ति आहे. पण जनक ~~[illegible]~~ वरून ज्ञान प्रकाशित करितें सर्वांचा नाही.
असें असेल तर नाही कारण चक्षुरादिकांतही प्रकाशाचा प्रसंग येतो. विषयाचा निरूप्यमाणत्व असल्यामुळे 'विषयतेने
जनक असा विशेषणाच्या अयोगव्यावृत्तिः' प्रदीपादिकांतील प्रकाश गुणाला स्वाश्रय संयुक्त अजनकविषयाचे ही ~~प्रकाशकत्व~~ प्रकाशकत्व
दिसते. विज्ञान क्रियारूप असतां हें समान आहे. कारणवाणादिकांच्या व्यापारांना अनुद्दिष्ट विषयांत स्वाश्रय याशी सं-
योग असतां अतिशय हेतुत्व दिसते. पण निरवयवत्वामुळे आत्म्याच्या सर्वांशी संयोग होत नाही. मग कितीतरी

॥ विवरणव्याख्यान ॥

नाही असें सांगतो- 'सुख दुःखादि' इत्यादि आदिशब्दाचा अर्थ आहे. पुण्यादुष्टकारक अदृष्टाचा सुख दुःखाचा साधन स्रक्चंदन कंटकादि-
कांचें नियामकत्व असेल तरी उपेक्षणीयाच्या ज्ञानाचे हेतुत्व त्याचा अनुपपन्न आहे. म्हणून त्याचा नियम नाही असा अर्थ. ज्याचे ज्ञाना
जनक असेल ते त्याच्याकडून भासविले जाते अशा नियमामुळे अतिप्रसंग नाही. अशी शंका घेतो- 'पण जनकत्वाच' त्याचे अतिप्रस-
गत्वानियामकता अशी आशंका असतां सर्वाचा अजनकत्व असल्यामुळे असें सांगतो- 'सर्वांचा नाही'. काय ज्ञानाचा जनक असावा भास
कत्व स्वभाव आहे किंवा विषयतेने जनकाचा भासकत्व? असा विकल्प करून पहिल्याचा अतिप्रसंगाने दूषित करितो- 'नाही कारण'
दुसऱ्याला दूषित करितो- 'विषयाचा' अजनकाचाही विषयत्व दिसत असल्यामुळे जनकत्वाच्या भासकत्वाचा अशा नियमाची अनुपपत्ति आहे
असें सांगतो- 'प्रदीपादिकांतही' ज्ञानाचा गुणत्व आहे या पक्षातील जनकाचाच ~~[illegible]~~ भासकत्वाचे निराकरण क्रियाप-
क्षांतही असे दोष दाखवितो- 'विज्ञान क्रियारूप'. ज्ञानाचा उद्दिष्ट विषयांत अतिशयाधायकत्व असल्यामुळे सर्वाला अनुद्दिष्टत्व
असल्यामुळे सर्वांचे ग्रहण नाही? अशी आशंका असतां व्याभिचाराने दूषित करितो- 'कारणवाणादिकांच्या' आत्म्याचा मनाच्या संयोगाची
अनुपपत्ति असल्यामुळे त्याच्या द्वारा सर्व तज्ज्ञानाचा सर्वांचें भासकत्व नाही? अशी शंका घेतो- 'पण निरवयवत्वामुळे' अन्याय्य
(=एकेका) वृत्ति संबंधाचा संयोगत्व असल्यामुळे व आत्म्याला निरवयवत्व असल्यामुळे संयोगाचा संभव नाही असा अर्थ मग अणु-
मात्रही असणार नाही कारण संयोगाच्या असंभवाचा अविशेष आहे असें सांगतो- 'मग कितीतरी' आत्म्याला संयोगाचा
असंभव असला तरी ज्ञानाचा स्वसंसृष्ट विषयाचे बोधित्व आहे? अशी आशंका असतां सांगतो ——

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ विवरण ॥

प्रकाशित होणार नाही. कारण क्रियावद्गुणाच्या - स्वाश्रयाला उल्लंघन करून - अन्यत्र संसर्गाचा अयोग असल्यामुळे सर्वां शी असंसर्ग आहे. व असंसृष्टांत अतिशयाचा अयोग आहे. आतां शरीरावच्छिन्न आत्मप्रदेशसमवायीच ज्ञान आहे संपूर्ण आत्म समवायी नाही. असें मत असेल तर मग आत्म्याला सर्वगतत्वच येत व व्यवहित विषयाचा अवभास ही होणार नाही. कारण आत्माश्रय प्रकाशाचा विषयाशी असंसर्ग आहे. व क्रियादिकाला आश्रयाचे उल्लंघन नसतें हें वर सांगितलें. आश्रय नस लेल्या आत्मप्रदेशासंबंधामुळे तर अवभास होणार नाही. कारण सर्वांच्या अवभासाचा प्रसंग येतो. पण आदित्यादिकांचे त्या त्या आत्मप्रदेशाशी असंयुक्त पुरुषान्तरांत अनर्थोत्पादकत्व दिसतें त्याप्रमाणें येथे ही अवभास होईल? यांचें सारं नाही. कारण

॥ विवरणव्याख्यान ॥

क्षणिकत्व असतां असें कसें असल्यामुळे अभेद संबंध मानावा; असा समुदायार्थ. वर्णसंविदांमध्ये प्रतिक्षणी भेदाचा अनुभव येत नसल्यामुळे क्षणिकत्व नाही असें कसें म्हणता येतें (व्याख्यानांत) कारण आनुमानिक भेदसंभवच नाही अशी आशंका असतां विकल्पोत्तरानें व्याख्यान करण्याकरितां विकल्प करीतात— 'काय प्रत्यक्षानें'. व्यापक विशेषाभावाचा (संवेदनाभावाचा) क्षणिकत्वाचा व्याप्यभिन्नत्व असल्यामुळे त्याचें निराकरण केलें असतां व्यापक विशेषाभाव सिद्ध होतो आहे. अशा आशयानें क्षणिकत्वाचा विकल्प आहे असें जाणावें. क्षणिकत्वाचा [illegible] अप्रत्यक्षत्व असल्यामुळे विकल्पाचा असंभव आहे. अशी आशंका असतां प्रत्यक्षाचे सामर्थ्य नक्कीसी— 'पण प्रत्यक्षानें'. नीलाकार ज्ञानाला नीलाभावाहून व्यवच्छेदानें (निरासानें) त्याच्याहून पृथक् न संवेदन करीत क्रियेच्या व्यवच्छेदकाच्या प्रमाणें वर्तमानमात्र (आकार) ज्ञानाला अवर्तमानाहून (तेथ्या) व्यावृत्ति (निवृत्ति) ग्राहकत्वामुळे क्षणिकत्वाला प्रत्यक्षत्व आहे असा आशयानें प्रत्यक्षाच्या निराकरणपरत्वानें व्याख्यानाला प्रवृत्ति करितात— 'प्रत्यक्षानें'. पण येथें प्रत्यक्षत्व मानलें असें—

---

५ * घटकस्वरूप पदेकूळ १७९ वर आला असे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥

स्वलक्षणभेदाने असले पाहिजे. ते सिद्धांत आहे किंवा नाही. हे आपल्या संविद्धानरूप-विज्ञानानें म सांगितले पाहिजे. पण अत्यन्त सादृश्यामुळे भेद भासत नाही. मग संवित

॥ विवरण ॥

असूनही अतिसादृश्यामुळे तो स्पष्ट भासत नाही अशी शंका घेतो- 'पण अत्यन्त' तुझा काय अभिप्राय? जर संवेदनाहून अभिन्न आहे व ज्ञानान्तराने गम्य आहे, सादृश्य दोषामुळे स्पष्ट भासत नाही असे आहे तर धर्मी व प्रतियोगी स-वितांना दुसऱ्या संवित्तीचे अविषयत्व असल्यामुळे त्यांच्या भेदाचे ग्रहण होणार नाही. किंवा विषयत्व अ-सतां धर्मी प्रतियोगि भेद स्वरूप त्रितय ही भेद संवेदनांत कल्पित होईल. किंवा त्याच्याहून अभिन्न होईल. पण

॥ विवरणव्याख्यान ॥

त्यामुळे 'भेद भासत नाही' असें कसें म्हणता? अशी आशंका असतां विद्यमान ही भेद ज्याप्रमाणे (ज्याकडील भेदाप्रमाणे) उपलब्ध होत नाही अशी शंका घेतो- 'पण भेद असूनही भासत नाही' भेदाच्या अप्रतिभासाविषयी शंका घेतली असतां संवित्तच्या स्वरूपाच्या अनवभासामुळे जगताचा आंध्य प्राप्त होईल हे अनवसराने पराहत आहे. अशी आशंका असतां सांगतात- 'तुझा काय अभिप्राय?' काय भेद संविदांहून व्यतिरिक्त असून ज्ञानान्तराने गम्य आहे किंवा स्वतःच ज्ञान व त्याचे ज्ञान आहे? असा (अन्य स्वरूप असून) 'काय' शब्दाचा अर्थ. पहिल्या पक्षाचा अनुवाद करितात- 'जर संविदांहून' काय ज्ञानान्तर भेदमात्राचे ग्रहण करिते? किंवा धर्म्यादिकांनी विशेषित भेदाचे? असा विकल्प करून पहिल्या कल्पी (धर्मिप्रतियोगी वगळून) संवित्तीचा भेद सिद्ध होत नाही (इष्ट ज्ञाता) असें सांगतात- 'तर' तेव्हां त्यांच्या भेदत्वे ग्रहण होणार नाही (तोल) असा संबंध. दुसऱ्या कल्पावर दूषण देतात- 'धर्मी व प्रतियोगी' (संवित्ति) धर्मि प्रतियोगींच्या प्रतिपत्तीवाचून त्यांनी (तर) विशेषित भेद कळणे शक्य नाही. धर्मी व प्रतियोगी यांची तर प्रतिपत्ति नाही. कारण स्वप्रकाशत्वाने त्यांना दुसऱ्या संवित्तीचे अविषयत्व आहे. म्हणून धर्म्यादिविशेषित भेदाचेही ग्रहण होणे शक्य नाही. असा अर्थ. विपक्षांत बाधक सांगतात- 'किंवा विषयत्व' 'किंवा त्रितय भेद संवेदनांत कल्पित आहे' त्याला त्यांचे विषयत्व असल्यामुळे (बौद्धमताने) ज्याला विषय असतो तो त्यांत कल्पित असतो जसा घट' असा अर्थ. (भेदसंवेदनांत = भेदाला विषय करणाऱ्या संवेदनांत). धर्मी दिकांना संवित्तीहून अभिन्नत्व ही येईल. कारण विषय विषयींत अभेदाचा अंगीकार केलेला आहे. असें सांगतात- 'किंवा त्याच्याहून'

[illegible]

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥

येही जर स्वरूप भासत नाही तर अशेष जगताला आंध्य आले. पुनः संवित्तीचे (एक) रूप भासत असतां सादृश्य कल्पना प्रमाण विरुद्ध आहे व निष्प्रमाणिक आहे. (पण) संवित्त्या (एक) रूप प्रती-

॥ विवरण ॥

संवित् स्वरूपत भेद आहे व संवेदनरूप त्याचे ज्ञान आहे. त्यावर सांगतात - 'मग संवित्तीचेही जर' पुनः ऐक्याचा प्रती-भास असतां सादृश्याची कल्पना प्रमाणविरुद्ध आहे व भिन्नांच्या ऐक्य भ्रम सादृश्यकल्पनेत प्रमाण आहे. त्याच्या अ-भावामुळे तर सादृश्याची सिद्धि होत नाही असे सांगतात - 'पुनः संवित्तीचे' रूप - एकरूप. पण ऐक्याचा भास होत असल्यामुळे सादृश्य कल्पना प्रमाणाच्या विरुद्ध नाही व भिन्नांत ऐक्य भ्रम तर सादृश्यावाचून अनुपपन्न आहे. अशा अर्थापत्तीमुळे सादृश्य कल्पना आहे म्हणून सादृश्य सिद्ध होते असे पूर्ववादी म्हणतो - '(पण) संवित्त्या (एक) रूप'. असे

॥ विवरण व्याख्यान ॥

पहिल्या पक्षातील युक्त्या कल्पनांचा अनुवाद करितो - 'पण संवित्' संवित् बोध्य व भेद बोधाला एकत्व असल्यामुळे भ-यांचे ज्ञान नसतां संवित्त्या बोधही होणार नसल्यामुळे जगदांध्य प्राप्त होते असे सांगतात - 'त्यावर सांगतात' सादृश्याच्या अंगीकाराने दूषण सांगून त्यांचीच असिद्धि 'पुनः संवित्तीचे रूप' या ग्रंथाने सांगितली जाते. परंतु तेथे विद्रूपतेमुळे सादृश्याचा विरुद्ध नाहीच व सादृश्याचे अप्रामाणिकत्वही असिद्ध आहे अशी आशंका असतां सांगतात - 'पुनः ऐक्याच्या'
(व्याख्यानात) (त्यामुळे)
आशंकेचा परिहार करितात - 'व भिन्नांच्या ऐक्य भ्रम' पण संवित्रूप प्रतिभासाला त्यामुळे असल्याने सादृश्याला प्रामाणिकत्व सांगितले ते बरोबर
नाही कारण भ्रांतीला सादृश्याच्या दोघांचा सहकार आहे अशी आशंका असतां सांगतात - 'पण ऐक्याचा भासाला' पूर्वी ऐक्या-
रूप
भासाचा विरोध सांगितल्यामुळे येथे हे 'संवित्' शब्दाने संवित्त्या ऐक्याचे ग्रहण जाणावे. भ्रांति मात्राला
सादृश्याच्या दोघांच्या सहकार असला तरी भ्रान्तिविशेषाला तो आहे असे सांगतात - 'भिन्नांत ऐक्य भ्रम'. भिन्नांत ऐक्य भ्रम
भेदाच्या तिरोधानावाचून संभवत नाही व तिरोधान सादृश्यावाचून संभवत नाही. म्हणून त्याची सिद्धि होते असा अर्थ. 'कारण
इतरेतराश्रयत्व येते' येथील अपेक्षित पूर्ण करीत सांगतात - 'असे नाही' त्या मोहपक्षांत सांगितलेले इतरेतराश्रयत्व अन्याया-
रपक्षांतही समान आहे असे 'पण तेही असा' येथे सांगितले ते अनुपपन्न आहे. कारण ऐक्य प्रतिभासाला स्वतः प्रामाण्य आहे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥

(सादृश्याला)
त्याला व्यामोहत्व असल्यामुळे प्रमाणाशी विरुद्धता नाही व अप्रामाणिकताही नाही कारण निर्बीज भ्रा-
न्तीचा असंभव आहे. असे म्हणणे असेल तर तें बरोबर नाही कारण इतरेतराश्रयत्व येते. तें असे-
(भिन्नाल एकत्वाच्या)
व्यामोहसिद्ध असतां सादृश्याची सिद्धि व प्रमाणाच्या विरोधाभावामुळे व प्रमाणाच्या सद्भावामुळे
(पक्ष)
सादृश्य सिद्ध असतां त्याच्या निमित्ताने व्यामोहाची सिद्धि. ~~(पक्ष)~~ हें असो अव्यामोह पक्षातही
हें तुल्य आहे. सादृश्य कल्पनेला अप्रामाणिकत्व सिद्ध असतां व प्रमाणाचा विरोध असतां तर ऐक्य
प्रतीतीचा अव्यामोहत्व नसला अव्यामोहत्व असतां या सादृश्यकल्पनेला निष्प्रमाणकत्व व प्रमाणाचा

॥ विवरण ॥ इतरेतराश्रयत्व.

नाही कारण ऐक्यभ्रम व सादृश्य सिद्धीला इतरेतराश्रयत्व येते असा परिहार करितात- 'नाहीं कारण' पण ऐक्य प्रतिभा-
साचे प्रामाण्य स्वतः सिद्ध होत नाही. परंतु सादृश्याच्या निर्मूलत्व व प्रमाण विरुद्धत्वाच्या अपेक्षेने होते व सादृश्याचे नि-
र्मूलत्व व प्रमाण विरुद्धत्व ऐक्य प्रतिभासाच्या प्रामाण्यापेक्षेने होते. असें तुझ्या वादीही इतरेतराश्रयत्व तुल्य आहे? अशी
(पण)
शंका घेतो- 'नाहीं असो' ऐक्य प्रतिभास सादृश्याभावाच्या अपेक्षेने नाही. परंतु स्वतः प्रमाण आहे. असा परिहार

॥ विवरणव्याख्यान ॥

अशी आशंका असतां सांगतो- 'पण ऐक्य प्रतिभासाचे' कारण ज्या वेळच्या ऐक्य प्रतिभासालाही स्वतःस्व प्राप्त होते. असा अर्थ
मग कशाने युक्त प्रामाण्य आहे? असे विचारले असतां सांगतो- 'परंतु सादृश्याच्या' सादृश्याच्या अविरुद्धत्व व समूलत्वा
(अ)
दिकाची सिद्धि होत असतां ऐक्य प्रतिभासाच्या प्रामाण्याची सिद्धि होत असल्यामुळे ते (=ऐक्य प्रतिभासाचे प्रामाण्य) त्याच्या
निर्मूलत्वादिकाच्या अपेक्षेने आहे व सादृश्याचे निर्मूलत्वादि ऐक्याच्या प्रामाणिकत्वाच्या अपेक्षेने आहे असे इतरेतराश्रयत्व असा
अर्थ. पण हें बरोबर नाहीं येथे प्रतीतीचे प्रामाण्य अनपेक्ष्य आहे असे जें सांगितले तें अयुक्त आहे. कारण हेतु विषयी अपेक्षा असते?
(हून अतिरिक्त)
अशी आशंका असतां विज्ञान सामग्रीहून दुसऱ्या अपेक्षा निरसित केली जाते असें सांगतात- 'ऐक्य प्रतिभास' विज्ञानाच्या प्रयोजकाने
(हेतूने) प्रयोजयत्व (हेतुमत्व) संभवत असतां अतिरिक्ताच्या अपेक्षेत गौरव आहे असा अर्थ. मग ज्या वेळच्या ऐक्य प्रतिभासाला
ही स्वतःस्त्व प्रसंग येतो? अशीही शंका घेता येणार नाही कारण ज्या वेळच्या भेदाग्रहाही प्रमाणाच्या विरोधाने त्याच्या स्वतः

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥

(स्वतः आहे) (ऐकण्याच्या) (ऐक्याच्या)

विरोध हें बरोबर नाहीं कारण प्रतीतीचें प्रामाण्य स्वाभाविक (कारणनिरपेक्ष) अनपेक्ष्य आहे. उलट असें अप्र-
माणामुळे त्याच्या प्रामाण्यामुळे सादृश्य कल्पना निष्प्रामाणिक व प्रमाणविरुद्ध आहे. सादृश्य कल्पनांतर
स्वतःसिद्ध नाहीं. कीं ज्यानें तो प्रामाण्याचा धारण करील तरतीं अप्रामाण्यपूर्वकच आहे —

॥ विवरण ॥

कथितात 'हें बरोबर आहे', पण सादृश्य ही स्वतःच सिद्ध आहे? अशी आशंका असतां सांगतात- 'सादृश्य कल्पनांतर' मग सा-
दृश्याची सिद्धि कशानें करणार? त्यावर सांगतात- 'तरतीं' ऐक्याच्या अप्रामाण्य (पश्चिल्लाम) सादृश्याला कल्पित करितो असा भाव.

पण ही प्रत्यभिज्ञा नामक कोणती कीं जिच्या सामर्थ्यावरून संनिकर्षेण एकप्रतीतीसारखी

॥ विवरणव्याख्यान ॥

प्रामाण्याची अनुपपत्ति आहे असा अर्थ. पण सादृश्य कल्पनेविषयीं स्वतः स्वत्व संभवत असल्यामुळे आमच्या मतांतही इतरेतराश्रयत्व येत
नाहीं असें सांगतो 'पण सादृश्य हें'. 'स्वतःच' ऐक्यप्रतिभासाच्या व्यामोहत्वाच्या अपेक्षेवाचून असा अर्थ. सादृश्य कल्पनेला
स्वाभाविकत्व असतां स्वरूपवर्ती एकादा अभाव असतां जे ऐक्यप्रतिभान होतें तें सिद्ध होतें. सादृश्य निमित्तक होईल असा परिहार
त्या अभिप्रायानें सांगतात- 'सांगतात सादृश्य', 'गोसदृशो गवयः' इत्यादिकांत ऐक्यभ्रमावाचून ही सादृश्याची सिद्धि होते अ-
सल्यामुळे त्याच्या अपेक्षेनें सादृश्य नाहीं. असें दाखवितो 'मग सादृश्याची सिद्धि'. गोगवयांत ऐक्याचें प्रतिभान न अस-
ल्यामुळे हें त्याच्या भ्रान्तीच्या अपेक्षेनें सादृश्य नाहीं. येथें तर ऐक्याच्या प्रतिभानामुळे त्याच्या भ्रान्तीवाचून सादृश्य नाहीं.
अशा आशयानें सांगतात- 'त्यावर सांगतात', 'अप्रामाण्यपूर्वकच' असें कशानें अप्रामाण्य? अशी जिज्ञासा असतां सांगतात-
'ऐक्याच्या भ्रमाच्या', ऐक्याचें अप्रामाण्य असा अर्थ.

प्रत्यभिज्ञा प्रत्यक्षाच्या विरोधामुळे सादृश्याची असिद्धि असतां त्याच्या अभिप्रेताचें भेदाचें अज्ञान नाहीं. असें सांगि-
तलें असतां प्रत्यभिज्ञेच्या संगतीविषयीं बोलणार- 'पण ही'. प्रत्यभिज्ञेच्या निरूपणाची प्रकृताशीं संगति सांगतो
'कीं जिच्या'. काय पूर्वानुभव संस्कारापासून प्रत्यभिज्ञा उत्पन्न होते? किंवा इंद्रियसंयोगापासून? किंवा दोन्हीं-
पासून? पहिला पक्ष नाहीं. कारण संस्काराला अनुभूतमात्र ग्राहित्व असल्यामुळे या देशानें वैशिष्ट्य ग्राहित्वाचा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ विवरण ॥

पूर्वानुभव संस्कारसहित सांप्रतकालीन वस्तूच्या प्रमितिकारणापासून उत्पन्न झालेले एकाचे कालद्वयसंबंध-विषयक प्रत्यक्ष ज्ञान प्रत्यभिज्ञा होय? असे म्हणणे असेल तर मग आत्म्यांत ती संभवत नाही? कशी? विज्ञान स्वभाव आत्म्याला स्थायित्व असतां स्वयंप्रकाशमानाला ज्ञानान्तराने अगम्यत्वामुळे त्यात्या विनाश·

॥ विवरण समाप्त ॥

प्रयोगआहे· दुसऱ्यापक्षही नाही कारण इंद्रियाला वर्तमानग्राहित्वाने त्या देशादि वैशिष्ट्य ग्राहि त्याला असंभव आहे·

प्रत्यभिज्ञेला (संस्कार)

मिथ्यापक्षी माधुर्यादि यापासून प्रसूतत्वामुळे अनुभवत्व व स्मरणत्व येईल व असे असल्यामुळे त्या देश काल-विशिष्ट वस्तूच्या ऐक्य लक्षण विषयाचा असंभव आहे· बोधवासत्याने व अपरोक्षत्वाने ज्ञानस्वरूपाचे निरूपण करितां येत नसल्यामुळे प्रत्यभिज्ञेचे प्रामाण्य असंभवनीय आहे असा अर्थ· येथे कारणाचे दुर्निरूपत्व असिद्ध आहे असे सांगतात- 'पूर्वानुभव' पूर्वानुभव संस्कारसहित सांप्रतकालीन प्रमितिकारण (इंद्रियसंयोग) प्रत्यभिज्ञेचे साधुत्व आहे, असा अर्थ· आतां जे म्हटले कीं- प्रत्यभिज्ञेला स्मृतित्व व अनुभूतित्व (= अनुभवत्व) येईल त्याविषयी हे सांगतात कीं- स्मृतित्वाला व्यापक असलेले संस्कारमात्र जन्यत्व निवृत्त होत असलेले स्मृतित्वाला ही ग्रहण करता येत होते· पण अनुभवत्व असतां त्या देशादि वैशिष्ट्य ग्राहित्व असणार नाही? अशी ही शंका घेतां येणार नाही कारण संस्कार सहकृत इंद्रियाला तत्ता ग्राहित्वाची उपपत्ति होते· असे जाणावे· विषयाच्या असंभवत्वाचे निरसन करितात- 'एकाचे' त्या व या देशकालाने उपलक्षित स्वरूप असलेला प्रत्यभिज्ञेचा विषय होय असा अर्थ· प्रत्यभिज्ञेचे स्वरूप सांगतात- 'प्रत्यक्षज्ञान' सांगितलेल्या प्रत्यभिज्ञेला अनात्म्याचा ग्रहण करून आत्म्यांत ती उपपन्न होत नाही असे सांगतो- 'आत्म्यांत' 'ती' अशी प्रत्यभिज्ञा अनुभवाने सिद्ध असल्यामुळे तिचा अपलापक कसा? अशी शंका घेतात 'कशी' सामग्रीच्या असंभव असल्यामुळे येथे प्रत्यभिज्ञानुभव भ्रम आहे असे सांगतो- 'विज्ञानस्वभाव' आत्म्याला स्थायित्व असतां आत्म्यांत प्रत्यभिज्ञेचे कारण संभवत नाही असा संबंध· संस्कार कारण आहे? असे म्हणणाऱ्यास विचारतो कीं- काय आगंतुक ज्ञानसंस्कार कारण आहे? किंवा स्वरूपज्ञानसंस्कार? पहिला पक्ष बरोबर नाही असे सांगतो- 'स्वयंप्रकाशमानाला' स्वयंप्रकाशत्वाचे उपपादन करितो· 'विज्ञानस्वभाव' दुसऱ्या पक्षाचे निराकरण करितो-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ विवरण ॥

संस्काराचा अभाव आहे म्हणून, व स्वरूपाच्या अविनाशामुळे हो अविनाशी ह्या संस्काराचा अभाव आहे व स्वयंप्रकाशमानाचा सांप्रतकालीन स्वरूपाहून व्यतिरिक्त प्रमाण कारणाचा अभाव आहे म्हणून प्रत्यभिज्ञेचे कारण आत्म्यात संभवत नाही. स्वरूपज्ञान तर प्रत्यभिज्ञान नव्हे कारण ते सतत प्रकाशी असल्याने प्रदीप प्रभे प्रमाणे पूर्वापर परामर्शक [illegible] आहे व तो मी या विषयाकाराचे ग्रहण केले असता तो स्वभाव मी अशा आकाराच्या भेदाने विषयांच्या भेदामुळे ज्ञानाच्या भेदाची सिद्धि होते. म्हणून आत्म्यात प्रत्यभिज्ञा नाही. म्हणून मुळीच ऐक्याच्या अभावाने स्थायित्वाची सिद्धि होते

यावर सांगितले जाते- अंतःकरण विशिष्ट आत्म्यात प्रत्यभिज्ञान आहे. असे आम्ही म्हणतो. निष्कलंक आत्मस्वरूप मात्रांत नाही कारण मोक्षावस्थेत [illegible] शास्त्रैकगम्यत्व आहे. व संसारावस्थेत अंतःकरण विशिष्ट रूपाचा अपाय होत

॥ विवरण व्याख्यान ॥

'व स्वरूपाच्या' अविनाशाच्या कारणाचा अभाव सांगतो- 'व स्वयंप्रकाशमानाचा'. दुसऱ्या ज्ञानाने ज्याचे स्थायित्व सांगितले त्या प्रत्यभिज्ञानाने सिद्ध होते. आत्म्याचे स्वरूपज्ञान प्रत्यभिज्ञा आहे. त्यामुळे स्थायित्वाची सिद्धि होते ही आशंका घेऊन सांगतो - 'स्वरूपज्ञान तर'. प्रत्यभिज्ञेचा विषय ही दुर्लभ आहे असे सांगतो 'सोऽहं'. काय ज्ञानाहून व्यतिरिक्त विषयाचे ग्रहण केल्याने किंवा नाही? पहिल्या पक्षी आकाराच्या भेदाने विषयांच्या भेदामुळे ज्ञानाचा भेद होतो (व एकरूप ज्ञान व विषय सिद्ध होत नाही) दुसऱ्या पक्षी ज्ञानाहून अतिरिक्त विषयाचा अभावामुळे स्थायित्व विषयक प्रत्यभिज्ञा असणार नाही. असा अर्थ प्रत्यभिज्ञेच्या निराकरणाचा उपसंहार करितो- 'म्हणून आत्म्यात'

सिद्धांती ... हे ... असे सांगतात- 'यावर सांगितले जाते'. काय विशिष्टांत प्रत्यभिज्ञेचा विषय आहे? किंवा केवळात? असा विकल्प करून पहिला पक्ष अनुपपन्न आहे असे सांगतात- 'अंतःकरण विशिष्ट'. दुसऱ्या पक्षाचा अंगीकार करितात- 'निष्कलंक'. मग त्याचे स्थायित्व कसे? त्यावर सांगतात 'कारण मोक्षावस्थेत'. "अजो नित्यः शाश्वतः" [क० १।२।१८] इत्यादि आगमशास्त्र शब्दाचा अर्थ आहे. पण अंतःकरणाचा व संसाराचा विनाशित्व असल्यामुळे तद्विशिष्टाचा ही विनाशित्व आहे. म्हणून त्याला प्रत्यभिज्ञाविषयत्व नाही? त्यावर सांगतात- 'व संसारावस्थेत' विशिष्टाच्या अनपायाविषयी सिद्धांताचा विरोध ही नाही. कारण "तद्यावदात्मभावित्वात् संसारव्यपदेशात्" [ब्र० सू० २।३।३०] येथे ~~बाह्य... पुरुषांनी सूक्ष्म...~~

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ विवरण ॥

नाही. तत्राऽपि च प्रत्यभिज्ञेने स्थायित्व सांगितले जाते. तस्या अवस्थेतच विशिष्ट आत्म्याच्या अभिव्यक्तीला अंतःकरणापासून उत्पन्न झालेल्या अहं प्रत्ययाचे नित्यत्व आहे. पूर्वकालाने विशिष्ट आत्मानुभवाला निमित्त असलेल्या त्या संस्काराने सहित अंतःकरणच मांगतल्यावीन(?) आत्माभिव्यक्तीला निमित्त होत असल्याने पूर्वापरकालाने विशिष्ट आत्मविषयक प्रत्यभिज्ञानाला उत्पन्न करिते. पण पूर्वापर अभिज्ञेत अविषयतेने अभिव्यक्त आत्म्याला प्रत्यभिज्ञाविषयत्व कसे? हा दोष येत नाही. जसें स्वसंविद्रूपही स्वसंवेदनाला कालान्तरी स्वसंस्कारजनित स्मृतिविषयत्व आहे त्याप्रमाणे इथेंही अभिज्ञेत अविषयावा(?) ही प्रत्यभिज्ञा विषयत्व विरुद्ध होत नाही. पण स्वयंप्रकाशाला विषयताच अनुपपन्न आहे. असेंनाही कारण देशकाल अंतःकरण विशिष्टतेने विषयतेची उपपत्ति होते. व्यापकाला आगमानेच कल्पनाऱ्या धर्माला सांप्रत

॥ विवरणव्याख्यान ॥

येथें वेदान्ताचे हृदय जाणणाऱ्या वाचस्पतिमिश्रांनी सुषुप्त्यादि अवस्थेतही सूक्ष्म शरीराने सूक्ष्मरूपाने अवस्थान सांगितले आहे. अशरीरीतीने प्रत्यभिज्ञेच्या विशिष्ट विषयत्वाला उपपादन करून तिच्या सामग्रीला दाखवितात — 'तस्या अवस्थेतच' विशिष्टात्मविषयक = पूर्वापर कालाने उपलक्षित स्वरूप विषयक असतांही. पूर्वानुभव संस्काराने सहित अंतःकरणाला पूर्वोत्तरकालाने उपलक्षित आत्मविषयक प्रत्यभिज्ञाजनकत्व सांगितले. तेथें आत्म्याला अविषयत्व असल्यामुळे अंतःकरणाला तद्विषयक प्रत्यभिज्ञाजनकत्व अनुपपन्न आहे? असें सांगतो - 'पण पूर्वापर'. तेथें हें वक्तव्य आहे कीं - काय अभिज्ञेच्या विषयत्वाच्या अभावामुळे त्याला प्रत्यभिज्ञानाचे अविषयत्व आहे? किंवा स्वप्रकाशत्वामुळे? पहिला पक्ष अयुक्त आहे असें सांगतात - 'हा दोष'. कारण विशिष्ट विषयक प्रत्यभिज्ञा आहे व तेथें दोन्ही प्रकारचे ही विषयत्व उपपन्न होत असल्यामुळे. 'अविषयाचेही' येथील ही शब्दाने त्याप्रवृत्तिरूप अभिज्ञाविषयत्व आहे असें सुचवितात. दुसऱ्या पक्षाचे उत्थापन करितो - 'पण स्वयंप्रकाशाला' काय स्वयंप्रकाशत्वामुळे निरुपाधिकाला अविषयत्व म्हणतोस? किंवा सोपाधिकाला? असा विकल्प करून पहिल्याच्या अंगीकाराने दुसऱ्याला दूषित करितात - 'असें नाही कारण'. स्वरूपाने प्रमाणान्तराचे अविषयत्व असतांही विशिष्टाला त्याच्या विषयत्वाविषयीं दृष्टान्त सांगतात - 'व्यापक आगमानेच' "चोदनालक्षणोऽर्थो धर्मः" [पू. मी. १।१।२] येथे धर्माला आगमानेच सदधिगम्यत्व प्रसिद्ध असतांही सुखादि लिङ्गाने फलोन्मुखत्व विशिष्ट आकाराने त्याचे अनुमान केले-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ विवरण ॥

काही फलदानाकरितां उन्मुखी आकारलक्षण धर्मविशिष्टतेने वर्तमान फलोदय किंवा दिगम्यत्व आहे त्याप्रमाणे. पण एका च आत्म्याच्या प्रत्यगिंद्रत कर्तृकर्मतेने एके काळी विरुद्ध रूपद्वयांत अन्वय कसा? पण सर्व वाद्यांना देहव्यतिरिक्ता दि अनुमानविषयतेनें त्याच्या कर्तृकर्मभाव शक्य आहे. तसें नाही कारण अनुमानांत विषयाळा कारकतेचा अभाव अ सल्यामुळे आकारमात्रतेने विषयत्व असल्यामुळे तेथें आत्म्याळा कर्तृत्वच आहे कर्मता नाही. प्रत्यक्षांत तर वि षयाळाही स्वविषय ज्ञानजनकतेने कर्मकारकत्व असल्यामुळे आत्म्याळा एका क्रियेंत एकेकाळी विरुद्ध रूपद्वया पत्ति प्राप्त होते. सांगतात – अंतःकरणविशिष्टतेनें आत्म्याळा ज्ञातृत्व असून पूर्वापरकालविशिष्टतेने ज्ञेयत्व आहे. अशारीतीनें उपाधिभेदामुळे अविरोध आहे. 'तोमी' याप्रत्यभिज्ञेचा अनुभवसिद्धत्व असल्यामुळे तर कोणाही रीतीने तेंच —

॥ विवरणव्याख्यान ॥

नातेंत्याप्रमाणे येथें होजाणार असा अर्थ. दुसऱ्याप्रकारानें विषयत्वाविषयी आक्षेप घेतात – 'पण एकाच.' कर्तृत्वाळा क्रियेंत गौणत्व अ सून कर्मत्वाळा प्राधान्य आहे. गुणप्रधानभावाळा भिन्नव्यक्तिनिष्ठत्व असल्यामुळे एकांत त्याचा संभव नाही असा अर्थ. गुणप्रधानभावा च्या भिन्नव्यक्तिनिष्ठत्व नियम असिद्ध आहे असे सांगतात – 'पण सर्व वाद्यांना' इत्यादि व्यतिरेक आदिशब्दाचा अर्थ आहे अनु मानविषयत्व म्हणजे काय? स्वकर्तृतेने त्याचे जनकत्व? किंवा त्याच्या (त्वविषयाच्या) आकाराने प्रदत्व? असे विकल्प करून पहिल्या पक्षीं असिद्धि सांगता – 'तसें नाही.' अविव्यदाहिकाळा अमत्व असल्यामुळे अनुमानांत विषयाळा ज्ञानजनकतेने विषयत्व नाही असा अर्थ. दुसऱ्या पक्षी विरोध नाही असें सांगतो – 'आकारमात्रतेने' = आकारवत्व मात्राने असा अर्थ. प्रत्यक्ष विषयाळा तर ज्ञान जनकतेने कर्मकारकत्वामुळे तेथें विरोध दुर्वार आहे असें सांगतो – 'प्रत्यक्षांत तर' म्हणून कर्तृकर्म विरोधामुळे आत्म्याळा विषयत्व नाही असा अर्थ. एकावस्तूंत उपाधिभेदामुळे कर्तृकर्मभाव युक्त आहे असें सांगतात – 'सांगतो' 'कालविशिष्टतेने' = त्यानें उपळक्षिततेनें असा अर्थ. पण उपाधिभेद कल्पनेने विरोधाचे निराकरण करण्यापेक्षा प्रत्यभिज्ञेचे अनंगीकरण श्रेष्ठ आहे. अशी आशंका असतां सांगतात – 'तोमी' 'तर' शब्द शंकेच्या निराकरणाकरितां आहे. 'कोणाही रीतीने' = उपाधीच्या संबंधावाचून ज्ञा तृज्ञेयभावाचा असंभव असतांही उपाधिभेदामुळे त्याचा संभव आहे. असा अर्थ. किंवा पण उपाधीमुळे विरोधाचा निरास कराव याचा असल्यास कोठेही कर्तृकर्म विरोध येणार नाही? अशी आशंका असतां सांगतात – 'तोमी.' जसे येथे अनन्यथासिद्ध

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ विवरण ॥

निमित्ताची कल्पना केली पाहिजे. कारण व्यवहाराच्या अविरोधामुळे भ्रान्तित्वाच्या अयोग आहे 'सोऽपि' याआकार भेदा-
मुळे अर्थभेदाने ज्ञानभेद ही युक्त नाही. कारण विज्ञान क्षणिक आहे अशा आकारभेदाने अर्थभेदामुळे ज्ञानाक्षणिक-
त्वाच्या अभावाचा प्रसंग येतो. खरें [आहे] विज्ञानांत क्षणिकत्वादि धर्मांचा उपराग विकल्प व्यवहार मात्र आहे. वस्तुतः नाही
असे म्हणणे असेल तर तसे स्थायित्वादि व्यवहारही कालादि धर्मांपाधित्वामुळे विज्ञानांत विकल्प व्यवहार आहे तसा
अविशेष आहे.. एवढाच तर विशेष आहे कीं - काल असतांना स्थायित्वादि विकल्प प्रत्यय 'सोऽयं' इत्यादि अनुभवाने
सिद्ध व्यवहाराशी अविरोधी व अर्थक्रिया समर्थ ही असतात. तसे क्षणिकत्वादि व्यवहार नाहीत.

॥ विवरणव्याख्यान ॥

कल्पक आहे तसेंच त्याच्या नाही असा अर्थ. ज्याला प्रत्यभिज्ञेप्रमाणें भ्रान्तित्वाची आशंका असतां सांगतात - 'कारण व्यवहाराच्या'
भेदग्राही प्रमाणाच्या अविरोधामुळे ज्याला प्रत्यभिज्ञेत भ्रान्तित्व आहे. तसें येथें बाधक नाही असा अर्थ. आकारभेदामुळे ज्ञानभेद आहे
असें जें सांगितलें त्याचा निरास करितात - 'सोऽपीया आकारभेदामुळे' काय परमार्थतः ज्ञानाला क्षणिकत्वाचा अभाव सांगतां ? किंवा व्यव-
[मात्र शब्दाच्या अर्थाला सांगतात - 'सत्यतेने']
हार तरी. पहिल्या पक्षाचा अंगीकार करितो - 'खरें [आहे]' अंगीभूत अंशाला सांगतो - 'विज्ञानांत' धर्मांचे धर्मीहून भिन्नत्वादि रूपाने
निरूपण करितां येत नसल्यामुळे वस्तुतः ज्ञान निर्धर्मी आहे असा अर्थ. दुसरा पक्ष बरोबर नाही. कारण क्षणिकत्वाला प्रामाणिकत्व
आहे असे येथे (पूर्वपक्षांत) जाणावे. तुल्य उत्तर आहे असें सांगतात - 'तसे स्थायित्वादि' 'जन्यत्वादि' आदि शब्दाचा अर्थ
आहे. 'कालादि' येथील आदि शब्दाने अंतःकरण वृत्ति ग्रहण केली जाते. कालाला स्थायित्व धर्मित्व असल्यामुळे त्याच्या अनु-
रोधाने ज्ञानांतही स्थायित्व व्यवहार आहे. वृत्तीला जन्यादि धर्मित्व असल्यामुळे मिथ्यासंबंधामुळे ज्ञानातही तसा व्यवहार होतो. व-
स्तुतः तर ते निर्धर्मक आहे असा अर्थ. या दोन्ही मतांत अंतर काय ? त्याला सांगतात - 'एवढाच' विकल्प प्रत्यया विषयी प्रमाण
सांगतात - 'सोऽयं' इत्यादि अनुभवतः पूर्वपक्षाच्या मतांतही आहे. त्याला सांगतात - 'व्यवहाराशी अविरोधी' केवळ व्यवहा-
राच्या विरोधाचा अभावच नाही परंतु त्याला संवादही आहे असें सांगतात - 'अर्थक्रियासमर्थ'.

आत्म्याचें प्रत्यभिज्ञाविषयत्वाने स्थायित्वसाधन सबळ करून तें सहन न करणारा प्राभाकर अवर शंका

शा विवरण

येथें प्राभाकर मानतात कीं — अशा रीतीनें प्रत्यभिज्ञेत विषयत्वानें हा आत्मा सिद्ध होत नाहीं, परंतु आश्रयत्वानें. तें अयुक्त आहे. कारण पूर्वापर काल विशिष्ट आत्म्याला ग्रहण करणाऱ्या प्रत्यभिज्ञेच्या आश्रयत्वाचा अयोग असल्यामुळे त्याच्या आश्रयत्वानें स्थायित्वाच्या सिद्धीचा अभाव आहे. पण सांप्रत अनुभवाप्रमाणे पूर्वकाल विशिष्ट संवेदन स्वाश्रय अशा त्याकाळच्या आत्म्याला साधितें व स्मृति स्वाश्रयत्वानें सांप्रतकालीन आत्म्याला साधिते. अशा रीतीनें कालद्वय विशिष्ट आत्म्याची सिद्धि होईल? यांत सार नाहीं. कारण स्मृति व पूर्वानुभव अभिज्ञा प्रत्यक्ष द्वयाप्रमाणे त्याच्या कालविशिष्ट आत्म्याला साधतील. एका कालद्वयाशीं संबंध कोणीकडून सिद्ध होतो हें सांगितलें पाहिजे? पूर्वापर

॥ विवरणव्याख्यान ॥

शंका घेतात असें सांगतात — 'येथें प्राभाकर' कारण आत्म्याला विषयत्व असतां अनात्मत्व प्राप्त होईल असा अर्थ. संविदच्या योगानें जो आत्मा प्रकाशित होतो ते कर्म असतें अशी व्याप्ति असल्यामुळे त्याची आश्रयतेनें सिद्धि नाहीं असें सांगतात 'तें अयुक्त आहे' आश्रयतेनें सिद्धि होत असली तरी स्थायित्व तु साध्य आहे असें सांगतात — 'कारण पूर्वापर' ज्ञानाला क्षणिकत्व असल्यामुळे त्याच्या आश्रयत्वानें एक क्षणवर्ति स्वरूप सिद्ध होईल पूर्वकाल संबंधी नाहीं कारण त्याला त्याचें आश्रयत्व नाहीं म्हणून स्थायित्वाची सिद्धि होत नाहीं असा अर्थ. प्रत्यभिज्ञेवाचूनही स्थायित्व सिद्ध होतें? अशी शंका घेतात — 'पण सांप्रत' समयमात्र ज्ञानाला निराश्रयत्वाचा अयोग असल्यामुळे त्याच्या आश्रयत्वानें त्या कालविशिष्ट रूप सिद्ध होतें. वर्तमान स्मृतीच्या आश्रयत्वानें वर्तमानरूप. अशा रीतीनें कालद्वय वैशिष्ट्याची सिद्धि होईल असा अर्थ. विकल्पाला सहन करीत नसल्यामुळे ही शंका बरोबर नाहीं असें सांगतात 'यांत सार नाहीं' कालद्वय विशिष्टांचें जें ऐक्य तें काय स्मृतीनें सिद्ध होतें? किंवा पूर्वानुभवानें? किंवा दुसरीकडून? असा विकल्प करून पहिल्या दोन्ही पक्षांचा निरास करितात — 'कारण स्मृति' स्मृतीला वर्तमानकालीन आत्मसाधनानें उपक्षय होत असल्यामुळे व पूर्वानुभवाचा तत्कालीन आत्मसाधनानें, म्हणून विवक्षिताची सिद्धि होत नाहीं. असा अर्थ. तिसरा पक्षही नाहीं कारण त्याला उत्पन्न प्रत्ययाचें निरूपण करितां येत नाहीं. असा आक्षेप घेतात. 'कोणीकडून' या आक्षेपाचें आर्षीं मानून शंका घेतात — 'पूर्वापर संवित् द्वयत्व' पूर्वानुभव व स्मृति पूर्वापर संवित् द्वय शब्दानें घ्यावयाचें आहे. काय सर्वत्र संवित् द्वयत्व एकाच्या कालद्वय संबंधाला साधक आहे? किंवा आत्म्यांत? असा विकल्प करून पहिल्या पक्षाला अपसिद्धान्तानें दूषित करितात —

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ विवरण ॥

संवित् द्वयच साध्यतील असें म्हणणे असेल तर नाही कारण यद्यपि इत्यादिकांत अभिज्ञाद्वयाहून निराळी प्रत्यभिज्ञा ग्रहण केली आहे
पुनः स्वतःच संवित् द्वय साधीत नाही. कारण एकैक संवित्‌ला कालद्वयवत् आत्माश्रयत्वाचा अभाव आहे. वगैरेवरून पूर्वापर
संवित् द्वयही कालद्वय संबंधवान् आत्म्याला साधीत नाही कारण दुसऱ्या दुसऱ्या संवित्‌ला दुसऱ्या दुसऱ्या संवित् विशिष्ट आ-
त्माश्रयत्वाचा अभाव आहे. पण संवित् द्वयच पूर्वापर संवित् द्वयाला आश्रय अशा आत्म्याच्या एकत्वविषयक दुसऱ्या संवित्‌ला
उत्पन्न करिते? मग आत्मविषयक प्रत्यभिज्ञान सिद्ध झाले? पुनः 'मी अनुभव घेतला' अशा रीतीने आश्रयविशिष्ट पूर्व संवित्
च्या अनुस्मृतीला स्वानुभव सिद्धत्व असल्यामुळे स्मरण करणारे सांप्रतकाळी पूर्वानुभूत आत्म्याची सिद्धि होते. पूर्व संवेदनाच्या
आश्रयतेने नव्हे. कारण अविद्यमान अशा त्याला सांप्रत आश्रयत्वाची असाधकता आहे. स्वयंप्रकाशमानत्व संवेदन आ-

॥ विवरणव्याख्यान ॥

'नहि कारण यद्यपि इत्यादिकांत' दुसऱ्या पक्षांतही हें विकल्पनीय आहे की — ~~संविद्द्वय~~ संवेदनद्वय एकैक ~~संवित् द्वय~~ साधते? किंवा मिळून? किंवा दुस-
ऱ्या संवित्‌च्या उत्पादनाने? असा विकल्प करून पहिल्या पक्षाला दूषित करितात — 'पुनः स्वतःच', एकैक असामर्थ्य दुसऱ्याला दूषित करितात
'वगैरेवरून' स्मृति समयी पूर्वानुभवाचा अभाव असल्यामुळे व त्याच्या समयी स्मृतीचा अभाव असल्यामुळे त्यांच्याकडून मिळून दुस-
ऱ्या दुसऱ्या संवित् विशिष्ट आश्रयतेने आत्म्याच्या स्थायित्वाची सिद्धि होत नाही असा अर्थ. तिसऱ्याने उत्थापन करितो — 'पण
संवित् द्वयच' या कल्पांत आमच्या इष्टाची सिद्धि होते असें सांगतात — 'मग आत्मविषयक' याही कारणामुळे आत्म्याचे विष-
यत्व ग्रहण केले पाहिजे असें सांगतात — 'पुनः मी' 'पूर्वानुभूत' = पूर्वी संवेदनाच्या आश्रयतेने अनुभूत. त्याविशिष्ट स्मरणाच्या
अनुपपत्तीनें विशिष्ट आत्म्याला स्मर्यमाणत्व नाही. कारण संवित् मात्राला स्मर्यमाणत्व आहे व त्याच्या आश्रयत्वाने आत्म्याची प्रसिद्धि
होत असते? अशी आशंका असतां सांगतात — 'पूर्वसंवेदनाच्या' पण पूर्वानुभवाला सांप्रत अविद्यमानत्व असतांही प्रकाशमानत्व मा-
त्राने साधकत्व आहे. जसे वहुळ मेघानुमित वृष्टीला वर्तमानकाळी सत्तेचा अभाव असतांही शेतकऱ्यांच्या प्रवृत्तीला हे-
तुत्व दिसते. अशी आशंका असतां सांगतात — 'स्वयंप्रकाशमानत्व' अविद्यमानही वृष्ट्यादिकाला ज्ञानद्वारा साधकत्व आहे. सं-
वेदन तर स्वतः प्रकाशमान असतां अन्याला भासते व स्वतः प्रकाशमानत्व स्वसत्तेंत असते. म्हणून अप्रतीत अशा अविद्यमानाला

॥ व्याख्यान ॥

पण अंती क्षय दिसत असल्यामुळे आरंभी क्षयाचे अनुमान होते. म्हणून भिन्नत्वामुळे सादृश्या

॥ विवरण ॥

ल्याश्रमाचा साध्यते स्मृति विषयतेन परप्रकाश्य नव्हे. अन्यथा दुसरीकडून सिद्ध होणाऱ्या धर्मादिकांनाही स्वाश्रय आत्म्या-

च्या साधकत्वाचा प्रसंग येतो. म्हणून आत्म्यांत प्रत्यभिज्ञानसिद्ध स्थिरते.

मग अनुमानावरून क्षणिकत्व असो. म्हणून परपक्षातले साधते - 'पण अंती' इत्यादि विना-

शाच्या पूर्वीक्षेवरच्या क्षणविशिष्ट सत्व अंत शब्दाने सांगितले जाते. त्याच्या स्वसत्ताक्षणाहून उत्तरक्षणी विनाशद्वारे

अश्मसत्वे

॥ विवरणव्याख्यान ॥

आश्रयाचे साधकत्व नाही. अवर्तमान असा स्मर्यमाण प्रदीपाश्रयत्वाने तर संदेहाचे प्रसिद्धिद्वार नाही असा अर्थ. प्रकाशत्व

मात्राने आश्रयाचे साधकत्व असतां तर अतिप्रसक्ति सांगतात - 'अन्यथा' प्रत्यभिज्ञेच्या समर्थनाचा उपसंहार करितात - 'म्हणून' कारण

वविषयादिकांच्या अनुपपत्तीचा अभाव म्हणून शब्दाचा अर्थ. अशारीतीने प्रत्यभिज्ञेच्या विरोधामुळे सादृश्य कल्पनेचा असंभव

असल्यामुळे सादृश्याने प्रतिबद्ध संवित्तच्या भेद ज्ञान नाही. व स्वलक्षण भेदाच्या अदर्शनामुळे प्रत्यक्षाने क्षणिकत्वाला साक्षात क-

रण्याकरितां समर्थ नाही. असा (भागीळ संदर्भाचा) अर्थ.

क्षणिकत्वाच्या प्रत्यक्षत्वाच्या निरासकेला असतां त्याचे आनुमानिकत्व सांगितले पाहिजे. 'क्षयाचे अनुमान होते'

असे काय त्याने जाते आरंभी क्षयाचे अनुमान त्याचे अनुमान होय? अशीही शंका घेतां येणार नाही. कारण संवित्

च्या रूपाला क्षयाला आहे. म्हणून अंती क्षय दिसत असल्यामुळे मागच्या अनुपपत्ति आहे. अशी आशंका अ-

सतांना त्याचे सांगतो - 'मग' इत्यादिकांत क्षणिकत्वाला साधित करून त्या दृष्टान्तानेच संवित्तत्वी क्षणिकत्वाला असा

अनुसंधानाने इत्यादिकांचे क्षणिकत्वसाधले जाते असा अर्थ. अंतवक्षय शब्दांना पर्याय त्वाने वैयर्थ्य आहे अशी आकांक्षा

असतां सांगतात 'क्षयाचे' ज्याक्षणी विनाश प्रसिद्ध आहे त्याहून अव्यवहित पूर्वक्षणावच्छेदेन जें सत्व तें अंतशब्दाने ग्रहण

केलें जाते. व त्याचा सत्ताक्षणामध्यें अंतिम शब्दवाच्यत्व घ्यावे असें जाणावे. पण अंत शब्दाने सत्ताक्षणाची विवक्षा असतां अं-

तीक्षय दिसत असल्यामुळे असें सांगितलेले अयुक्त आहे. त्यावर सांगतो - 'त्याच्या स्वसत्ता' सत्ताक्षणाच्या धर्मीनें

॥ टीप ॥

२ हेतुमेरा विलक्षण पृष्ठ २६७ पं. ७ वरील.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥

ची कल्पना आहे. मग आरंभी सत्ता दिसत असल्यामुळे अंतीं ही तिचें अनुमान कां केलें जात नाहीं?

॥ विवरण ॥

आहे. तसेंच अंत्यक्षणावच्छिन्न घटसत्त्वाहून पूर्वपूर्व क्षणावच्छिन्न घटसत्त्व 'आरंभी' शब्दानें सांगितलें जातात. 'तद्ध्वंस स्वसत्ताक्षणाहून उत्तरक्षणीं विनाशानें व्याप्त आहे, घटसत्त्व असल्यामुळें, अंत्यक्षणावच्छिन्न घटसत्त्वा प्रमाणे' असें येथें अनुमान जाणावें. वस्तुतः सत्ता या अनंतर विनाश होत असल्यामुळें क्षणिकत्वाची सिद्धि होते म्हणून आणि कांत ऐक्य सादृश्यात्याचें विवेचन नसणें आहे असा भाव. यावर प्रतिअनुमान सांगतात — 'मग आरंभी'. आरंभ शब्दानें सत्तावच्छेदक क्षण सांगितले जातात — 'अंत' शब्दानें विनाशावच्छेदकत्वानें अभिमत क्षण सा-

॥ विवरणव्याख्यान ॥

त्तावच्छेदक क्षणाहून अव्यवहित उत्तरकालीं विनाश दिसत असल्यामुळें असा अर्थ. 'स्वसत्ताक्षणाहून उत्तरक्षणीं विनाशादिम त्त्व असल्यामुळें' असें सांगून आरंभी क्षयाचें अनुमान होतें असें सांगितलें असतां अंतिमक्षणाला आदि शब्दानें ग्रहण केलें असें शंका येते. वस्तुविरोधामुळें तें उपपन्न होत नाहीं अशी आशंका असतां सांगतो 'तसेंच अंत्य'. त्याला आदिक्षणत्व असो, यापेक्षां क्षयाचें अनुमान व्हावें हे आहे? अशी आशंका असतां अनुमान सांगतो — 'तद्ध्वंस'. विनाशानें व्याप्त आहे असें सांगितलें असतां सिद्धसाध्यता येते कारण तो अव्यवहित विनाशानें व्याप्त मानलेला आहे? त्यावर सांगतो — 'उत्तरक्षणीं'. येथें अव्यवहित असें विशेषण जाणावें. त्यापेक्षां क्षणिकत्वाची सिद्धि कशी? त्यावर सांगतो — 'वस्तुतः'. स्वसत्ताक्षणाहून अव्यवहित उत्तरकालीं विनाशीत्व क्षणिकत्व होय असें मानलें असल्यामुळें क्षणिकत्वाची सिद्धि होते असा अर्थ. पण भिन्नत्वामुळें सादृश्याची कल्पना आहे? असें का? कारण भिन्नही घटपट्यांत सादृश्य उपलब्ध होत नाहीं अशी आशंका असतां भिन्नत्व असतां ऐक्यानें प्रतीय मानत्व सादृश्याला कल्पक आहे असें सांगतो 'म्हणून क्षणिकांत' म्हणून तें सादृश्याला कल्पक आहे असा अर्थ. अंतीं (शेवटच्या सत्ताक्षणीं) सत्त्वाचें अनुमान अनिष्ट नाहीं? अशी आशंका असतां सांगतात 'त्यावर प्रतिअनुमान'. पण पूर्वी व्याख्यांत आरंभ व अंत शब्दार्थांच्या अंगीकार असतां त्याच्या सत्त्वाचें अनुमान प्रतिअनुमान कसें? अशी आशंका असतां, आरंभ शब्दाचा अर्थ पूर्वीं प्रमाणें असून अंत शब्दाचा अर्थ अन्य आहे असें सांगतात 'आरंभशब्दानें' असा अर्थ सांगून समुदायार्थ सांगतात ~~असें~~

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥

क्षयानुभवाच्या विरोधामुळे असें अस्से कतर येथेंही सद्रूप (प्रत्यभिज्ञारूप) ~~सद्रूप (एकत्वरूप)~~ सत्वानुभवाचा विरोध आहे व दोन्ही अनुभवांत कोणी विशेष नाही.

॥ विवरण ॥

मिळेजातात. तेथें सर्व संत्यक्षणाधरसत्तेनें व्याप्त आहेस असें साधवे जाते. त्यांना कावत्व असल्यामुळे धरसत्तावच्छेदकत्वाप्रमाणें असे प्रति अनुमान आहे. पण अंती सत्तेचें अनुमान क्षयानुभवाशी विरुद्ध आहे. अशी शंका घेता- 'क्षयानुभवाच्या'. मग अंत्यक्षणाहून पूर्वक्षणावच्छिन्न धरसत्वांना पुढील क्षणी क्षयाचें अनुमान प्रत्यभिज्ञेशी विरुद्ध आहे असा परिहार करितात- 'येथेंही'. पण क्षयानुभव अधिक असल्यामुळे तो अनुमानाला बाधित करितें प्रत्यभिज्ञा नाही. कारण ती अनुमानाहून दुर्बळ आहे. अवर नाही असें सांगतात- 'व दोन्ही अनुभवांत'.

॥ विवरणव्याख्यान ॥

'येथें'. 'क्षयानुभवाच्या विरोधामुळे' यानें पूर्वोक्तांत हेतु सांगितला असें भासते परंतु वैयधिकरण्यामुळे तें उपपन्न होत नाही. अशी आशंका असतां सांगतात- 'पण अंती'. पण सत्ताविनाश दिसत असल्यामुळें त्याच्या विरुद्ध सत्वानुभव सांगितला जातो. अशी शंका असतां तात्पर्य सांगतात- 'मग'. क्षयाचा अनुभव जसा सत्तेच्या अनुमानाला बाधित करितो तसा प्रत्यभिज्ञेचा अनुभव क्षणिकत्वाच्या अनुमानाला बाधक आहे. असें सांगितले त्यावर विशेषाची शंका करितो- 'पण क्षयानुभव'. अधिक एक देशकालावच्छिन्न अर्थाचें बोधकतेनें लौकर उत्पत्ति होत असल्यामुळे व अनुमानाची व्याप्ति दर्शन व्याप्तिस्मरणादिद्वारानें विलंबानें उत्पत्ति होत असल्यामुळे अधिक अनुमानाचें बाधकत्व घडते. प्रत्यभिज्ञेला त्याचा देशकालाच्या प्रतिपत्तिपूर्वक उत्पद्यमानत्व असल्यामुळे व क्षयानुमानाला अविलंबत्वानें उत्पत्तिकत्व असल्यामुळे विशेषाची बाधकता नाही. अभिप्राय. प्रत्यभिज्ञेला बाध्यत्व व अनुमानाला बाधकत्व ज्याप्रमाणें इष्ट आहे तसेंच असतां प्रकृतांतही त्याप्रमाणें बरोबर केलें प्रत्यभिज्ञेला बाधकत्व नाही असा आशय मनें सांगतो- 'कारण ती'. क्षयानुभवाचाही धर्मिप्रतियोगीच्या प्रतिपत्तिसापेक्षतेनें विलंबानें उत्पत्तिकत्व असल्यामुळे प्रत्यभिज्ञानुभवाशी त्याचा अविशेष आहे, असा परिहार करितात- 'अवर नाही'. ज्याप्रमाणें प्रत्यभिज्ञेला बाध्यत्व शंका असतां अभिज्ञात्व अविशेषामुळे दोन्ही सादृश्याप्रमाणें क्षयानुभवाला बाध्यत्व शंका दुर्वार आहे असें तात्पर्य.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥

आतां असे म्हणणे असेल कीं — जो स्थिरत्वाने अभिमत असमुच्चय तो कांहीं अर्थक्रिया (व्यवहार) करितो किंवा नाहीं? जर करीत नसेल तर असल्लक्षण प्राप्तीमुळे परमार्थवस्तु असणार नाही. जर करीत असेल तर स्थायी असणार नाही. कारण स्थायीला अर्थक्रिये (व्यवहारा) चा अयोग आहे. कसा अयोग? असा अयोग — काय तो तेव्हा करीत असतां क्रमाने करितो? किंवा योग-

॥ विवरण ॥

'सर्वभाव क्षणिक आहेत त्याला अर्थक्रियाकारित्व असल्यामुळे जे क्षणिक नसते ते अर्थक्रियाकारी नसते जसें मशाचे शिंग' असें दुसरें अनुमान दाखविण्याकरितां स्थायीला अर्थक्रियेची अनुपपत्ति सांगतो- 'जो स्थिरत्वानें अभिमत' पण स्थिराला त्या निमित्ताच्या संयोगामुळे अन्यथाभूताला क्रियापूर्वक कार्याचा उत्पादन करण्याचे सामर्थ्य असते. क्षणिकाला नाहीं असा सिद्धान्ती आक्षेप घेतात - 'कसा अयोग', 'असा अयोग' इत्यादि परिहार आहे. 'क्रमानें' - अनेक कार्ये सारखी एकामागून एक असा अर्थ. एक किंवा अनेक कार्ये एकदा करून उपरमाला प्राप्त होतो

॥ विवरणव्याख्यान ॥

पण 'जो स्थिरत्वानें अभिमत' येथें स्थायीला अर्थक्रियाकारित्वाचा निरास केला एवढ्यानेंच क्षणिकता सिद्ध होत नाहीं कारण अर्थक्रियाकारित्वाला क्षणिकत्वाच्या व्याप्तीचा अभाव आहे? अशी आशंका असतां सांगतो 'सर्वभाव' 'अर्थक्रियेची अनुपपत्ति' - (जें क्षणिक नसतें तें अर्थक्रियाकारी नसतें असें) व्यतिरेक व्याप्ति 'कसा अयोग' या आक्षेपरूपी अर्थ सांगतात - 'पण स्थिराला काय' क्षणिकपक्षांत अर्थक्रिया ही संभवत नाही असें सांगतात - 'क्षणिकाला नाहीं' क्षणिकाला सहकारी संबंध्यानंतर कालीं क्रियेनंतर अनंतर कार्य आधारीतीने अनेक क्षण स्थायित्वाचा अभाव असल्यामुळे अर्थक्रियाहेतुत्व नाही. असा अर्थ. विपर्ययांत (= क्षणिकपक्षांत) पर्यवसायित्वाचा अभाव असल्यामुळे परिहाराला आभासत्व आहे? अशी आशंका असतां सांगतो- 'असा अयोग इत्यादि' अंकुरोत्पत्तीच्या पूर्वक्षणाला अव्यवहित समर्थक्षणत्व असल्यामुळे त्याला क्रमाची अपेक्षा नसल्यामुळे विपर्ययांत पर्यवसायित्व आहे असा अर्थ. पण तेव्हा एकवचन प्रयोगामुळे अर्थक्रियेला एकत्व आहे त्यामुळे क्रम व यौगपद्य विकल्पांचा असंभव आहे अशी आशंका असतां सांगतो - 'क्रमानें' जातिरूपानें एकवचन प्रयोग आहे असा अर्थ. विच्छेद करून करण्याच्या आशंकेला व्यावृत्त करितो - 'सारखी' एकदा करून पुनः एकदा करितो असें यौगपद्य शब्दानें सांगितले जातें. अशी आशंका

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥

गपद्याने। क्रमानेतर नाही कारण पूर्वोत्तर कालीं त्यादविशेषाच्या अभाव असतांही पूर्वकालीन उत्तरकाल भाविनीहि क्रिया कांकरणार नाही? यौगपद्यानेही नाही. कारण यावज्जीव कृत्य एकाच क्षणांत केल्यामुळे उत्तरकाली त्याच्या विरहहोत असल्यामुळे असत्त्व क्षणाची प्राप्ति होते म्हणून अर्थक्रियाकारित्वामुळे स्थायी नाही. त्याने प्रतिक्षणी भिन्न असा अहंबुद्धिनेंच स्थायी बुद्धि

॥ विवरण ॥

काय? असें विचारतो - 'किंवा यौगपद्याने?' क्रमपक्षाला दूषित करितो - 'क्रमानेतर?' अनेक कार्यें करण्यास जर समर्थ आहे तर पुष्कळ कारणाच्या अभाव असल्यामुळे व एकाला अनेक कार्यें दिसतात म्हणून एकदांच करील असा भाव. दुसऱ्या पक्षाला दूषित करितो - 'यौगपद्यानेंही नाही?' कारण सत्वाचें अर्थक्रियाकारित्व लक्षण आहे असा भाव. म्हणून एकदा करण्यापासून कालान्तरी पुनः कर्तृत्वाच्या निमित्ताचा अभाव असल्यामुळे व अकर्तृत्व असतां असत्वा-मुळे एकदांच सत्व आहे, असा उपसंहार करितो - 'म्हणून अर्थक्रिया' सिद्ध नाहीतर एकदाच कार्य करून क्षणिक भूत

॥ विवरणव्याख्यान ॥

येईल व तसें असतां असत्वाची प्रसक्ति होणार नाही? अशी आशंका असतां सांगतो 'एक किंवा अनेक' जसें एक कार्य एकदा करून उपरमाला प्राप्त होतो तसें अनेक ही असा अर्थ. पण काला न्तरतां अर्थ नाही कारण क्रियाजननसामर्थ्याच्या पूर्वक्षणी अभाव आहे. तसें कार्य करणें कसें अशी आशंका असतां सामर्थ्य व असामर्थ्य लक्षण विरुद्ध धर्मांचा एकांत असंभव असल्यामुळे दु-सऱ्या कालीं अर्थक्रियासामर्थ्य तसेंच ग्रहण केलें पाहिजे. वस्तुमुळे अतिप्रसक्ति आहे असें सांगतो - 'अनेक कार्यें कु-र्वाणस्य' पण एकाला युगपत् बहु कार्यें करत दिसत असल्यामुळे एकाक्षणी बहु कार्यें करत कसें? अशी ही शंका येणार नाही असें सांगतो - 'व एकाला' भूमज्जावादि अनेककार्यकारित्व एकाव होत दिसत एकाकाली दिसत असल्यामुळे असा अर्थ. अर्थक्रियेच्या अभाव असतांही सत्व कां असणार नाही? अशी आशंका असतां सांगतो - 'कारणसत्वाचें' पण सर्वांचे एकदांच करणे शक्य असतांही पुनः करण कां असणार नाही? अशी आशंका असतां सांगतो - 'म्हणून एकदा' अनिष्पन्नतर नि-ष्पादनीय असते. यावज्जीव कृत्याचा तर एकदांच एका क्षणांत केले असल्यामुळे पुनः करण नाही. असा अर्थ. 'असा उप-संहार' = अशा अनुसंधानाने उपसंहार करितो असा अर्थ. स्थायीवादि मतांत ही अर्थक्रियेचा संभव असल्यामुळे तिचें निराकरण कसें?

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥

सादृश्याच्या निबंधनीस आहे? त्यावर सांगतो:– पण कोणती ही अर्थक्रिया की जिच्या अ-
भावामुळे असत्त्वक्षण [illegible] प्राप्ति होते? स्वविषयक ज्ञानाचे जनन असल्यास मग सर्वच सं-
विदांना स्वसंविदित रूपत्वाने स्वविषयक ज्ञानाच्या अजननामुळे असत्त्वक्षणत्व प्राप्त झाले.
(तिला)
पुरुषान्तर संतानातही त्याचे (स्वविषयक ज्ञानाचे) जनन नाही. कारण पुरुषान्तर संवित्-

॥ विवरण ॥

ही स्थायीला असत्त्वप्राप्ति नाही म्हणून सत्त्वाला अर्थक्रियाकारित्व लक्षणाचा अभाव आहे असे उपपादन करीता-
त– 'पण कोणती?' काय स्वविषयक ज्ञानजनन अर्थक्रिया होय? किंवा दुसऱ्या क्षणाचे उत्पादन? असा कोणती
शब्दाचा अर्थ. त्यावर पूर्ववादी सांगतो– 'स्वविषयकज्ञानजनन', बाह्यार्थांना अशाप्रकारचे सत् युक्त आहे
युक्त
विज्ञानांना तर स्वविषयक ज्ञानाचे अजनकत्व असल्यामुळे हे सत्व लक्षण नाही. अशा रीतीने दूषित करीत
तात– 'मग सर्वच संविदांना' पण एक संतान ज्ञानांना अन्योन्य विषय विषयितेचा अभाव असला ही पुरुषान्तर
ज्ञानाला विषय केले पुरुषान्तर ज्ञानजनक आहे, अशा संविदांना अर्थक्रियेचा लाभ होतो. खरे नाही असे सांगतात–
'पुरुषान्तर संतानातही' कारण पुरुषान्तर ज्ञानामध्ये पुरुषान्तर ज्ञानाला अप्रत्यक्षत्व असल्यामुळे अनुमेयत्व

॥ विवरणव्याख्यान ॥

अशी शंका असतां तात्पर्य सांगतात– 'मिथ्यान्तीतर', पहिल्या पक्षाचे उत्थापन करितो असे सांगतात– 'खर पूर्ववादी', संविद् मध्ये
अर्थक्रिया लक्षणाचे निरसन कशामुळे? अशी आशंका असतां सांगतात– 'बाह्यार्थांना', काय संवित्ला स्वसंतानांत ज्ञानाचे जनन आहे?
किंवा दुसऱ्या संतानांत? पहिला पक्ष नाही कारण तिला स्वप्रकाशत्वामुळे स्वविषयक ज्ञानजनकत्वाचा असंभव आहे. दुसऱ्या
पक्षाचा अनुवाद करितो– 'पण एक संतान' विषयत्व असतां स्वप्रकाशत्वाचा भंगही होत नाही कारण स्वतःचे ज्ञान स्वप्रकाश आहे असे
मानलेले आहे असा अर्थ. काय पुरुषान्तर संतान शब्दाने अन्य संतान विवक्षित आहे? किंवा इतर? असा विकल्प करून पहिला पक्ष
अयुक्त आहे असे सांगतात– 'खरे नाही', तेथेही काय त्याला स्वविषयक प्रत्यक्ष ज्ञानाचे जनकत्व आहे? किंवा अनुमान ज्ञानाचे जनकत्व?
असा विकल्प करून पहिल्याचा निरास करितात– 'कारण पुरुषान्तर संवित् (= ज्ञानाला) अतीन्द्रियकत्व आहे' असे व्याख्यानांत सांगितले-
ते अप्रसिद्ध आहे कारण स्वतःच्या ज्ञानाला अपरोक्षत्व आहे. मग आशंका असतां सांगतात– 'कारण पुरुषान्तर ज्ञानामध्ये'

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

१ भाष्याचे उत्थापन पृष्ठ २८८ पंक्ती ३२ असे.

॥ व्याख्यान ॥

(पुरुषान्तराचे)
ते अनैन्द्रियकत्व आहे. अनुमानांतही नाही कारण त्याचा (=अनुमान ज्ञानाचा) अर्थजन्य
त्वाचा अभाव आहे. सर्वज्ञांतही सर्व संवेदनजात साक्षात स्वसंवित्(ला) उत्पन्न करीत नाही.

॥ विवरण ॥

आहे असा भाव. 'अनैन्द्रियकत्व' वगैरे पूर्वी 'पुरुषान्तराचे' असा शेष. मग अनुमान ज्ञानाच्या विषयत्वामुळे संताना-
न्तरज्ञानाला संतानान्तर ज्ञान जनक आहे? यावर नाही असे सांगतात. 'अनुमानांतही' प्रत्यक्ष ज्ञानच अर्थजन्य
आहे. अनुमानादि नव्हे असे तुझे मत आहे असा अर्थ. पण सर्व संवेदनजात सर्वज्ञाच्या ज्ञानाला विषयतेने जनक होते
कारण त्याला सर्व विषयांचे प्रत्यक्षत्व आहे? यावर सांगतात 'सर्वज्ञांतही' 'साक्षात्' = विज्ञानोपप्लवाशी सह किंवा अव्य
वधानाने = सर्वज्ञ ज्ञानाशी उपरक्तत्वाने त्याच्या अभेदाने असा अर्थ. त्याविषयी हेतुला सांगतात—

॥ विवरणव्याख्यान ॥

२८३।२३
मग त्याची प्रसिद्धि कशी? अशी आशंका असता चेष्टादि लिंगाने असे सांगतात- 'अनुमेयत्व आहे' पुरुषान्तराच्या अनुवाद करीत- करून
मग 'अनुमान ज्ञानाच्या' हेतूच्या असिद्धीची आशंका असता सांगतात- 'प्रत्यक्षज्ञानच' 'आदि' शब्दाने आगमादि ज्ञानांचे ग्रह-
ण आहे कारण सर्व संवेदनाचा जनकत्व अस्पष्ट आहे असा अर्थ. येथे युक्ती ही विचारांमध्ये कारणते पुरुषाकडून अंगीकृत आहे
असे सांगतात- 'असे तुझे मत आहे' संमोहसं ज्ञानाहून उत्तर संतानांचे उत्पादन करतो. 'पण सर्व संवेदनजात' पण पुरु-
षान्तरांत पुरुषान्तर ज्ञानाला स्वविषयक प्रत्यक्ष ज्ञान जनकत्वाचा निरास असल्यामुळे कल्पान्तराचे उत्पादन करतो? त्यावर
सांगतात- 'कारण त्याला' ईश्वराला आपल्याहून विलक्षणत्व असल्यामुळे सर्व अपरोक्ष आहे असा अर्थ. सर्वांना ईश्वराच्या प्रत्यक्षत्वाने
२८३।१२
साक्षात् संवित् जनकत्व असल्यामुळे 'साक्षात्' हे विशेषण व्यर्थ आहे? अशी आशंका असता सांगतात- 'साक्षात्' काय उपप्लुत ज्ञानाने त्याचा
विषय आहे? किंवा ज्ञानमात्राने? असा विकल्प करून पहिल्याच्या निरासाकरिता 'साक्षात्' विशेषणाचे उपादान युक्त आहे असा अर्थ. दुस-
-ऱ्याचा सांगतात- 'किंवा अव्यवधानाने' व्यवधानाचा स्पष्ट करीतात- 'सर्वज्ञ' उपरक्तत्व- संबंधमात्र अशा अर्थाच्या निरा-
साकरिता सांगतात- 'त्याच्या अभेदाने' वाक्यांत विशेषण व्यर्थ आहे? अशी शंका घेता येणार नाही कारण त्यांच्यांत अभेद आहे? किंवा भेद?
२८३।१५
असा विकल्प करून पहिल्याचा निरासाकरिता आहे असा अर्थ. पण 'संवित्संसर्गी सत्व' = संवित्संसर्गी समान स्वभावत्व, त्यावर इष्ट
त्व असल्यामुळे हेतूला असाधारणत्व आहे? अशी आशंका असता सांगतात- 'त्याविषयी हेतुला' हेतुत्वाला स्पष्ट करीतात-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

प्रथमवर्णक

७८

॥ व्याख्यान ॥

स्मरणसंसारसंविदांशी एकरूपत्वाच्या प्रसंगमेतो· तद्रूपत्व नसतां तर त्रैरूप्यमतांचा प्रयोग आहे·

(interlinear: त्यांच्याशी एकरूपत्व — त्यांच्या विषयत्वाचा)

॥ विवरण ॥

'स्मरणसंसारसंविदांशी' संवित् व विषयांच्या अभेद मानला असल्यामुळे सोपप्लव सांसारिक ज्ञानांनी सर्वज्ञज्ञान दूषित होईल असा भाव· पण ते सर्व उपप्लवांनी उपरक्त असले तरी तत्वज्ञानाने बाधित झाल्यामुळे दोषाला धारण करीत नाही· मग ते ज्ञानांतर सोपप्लवांना बाध करीत नाही· कारण प्रतिबिंबाच्या एकाक्षणांत अनुपपत्ति आहे दुसऱ्या ज्ञानाच्यातर पूर्व ज्ञानातील उपप्लव विषय नाही· तर ज्ञानाने त्यांच्या अनुवादाने बाध होईल· न विषयत्व असतां बाध करणार नाही उपप्लवांच्या अभेद होईल· मग उपप्लवावांचून सर्वज्ञ ज्ञानांत विज्ञाने उपरागाला प्राप्त होतात· यावर नाही असें सांगतात- 'तद्रूपत्व नसतां तर'

(interlinear: उपप्लवांनी मुक्त)

॥ विवरणव्याख्या ॥

'संवित् व विषयांच्या' एकरूपत्व= अभिन्नत्व व त्यामुळे हेतुत्व युक्त आहे असा अर्थ· 'दूषित होईल'= त्यामुळे त्याज्य होईल असा अर्थ· पण जसे ब्रह्म अभिन्न असूनही आपल्याहून अभिन्न जीवांना पसरत नाही असूनही त्याच्या ब्रह्मत्व असल्यामुळे त्यांच्या दोषाने दूषित होत नाही त्याप्रमाणे येथेही जाणावे· अशी शंका घेतो- 'पण ते सर्व' काय ज्या ज्ञानांत उपप्लव आहे ते त्याला बाधित करीते· किंवा दुसरे असा विकल्प करून पहिल्याला दूषित करीतात- 'मग ते ज्ञानांतर' काय ज्या क्षणीं उपप्लवांची प्रसक्ति आहे त्या क्षणी बाध होतो· किंवा दुसऱ्या क्षणी· पहिला पक्ष बरोबर नाही असें सांगतात- 'कारण प्रतिबिंबाच्या' प्रांशाचा बाध करणारे एकाक्षणी तरले असणार नाहीत असा अर्थ· दुसऱ्या पक्षीं क्षणिकत्वाची हानि होईल असा अर्थ· (किंवा दुसरे·) दुसऱ्या पक्षीही पूर्व ज्ञानातील उपप्लव काय त्याचा विषय आहे किंवा नाही· पहिला पक्ष बरोबर नाही असें सांगतात- 'दुसऱ्या ज्ञानाच्या' पूर्वज्ञानाच्या ग्रहणावांचून तरल्यातील उपप्लव ग्रहण करणे शक्य नाही· तर ग्रहणाला योग्य नाही· कारण एक संततीत असलेल्यांनाच विषयविषयिभाव मानलेला आहे असा अर्थ· दुसऱ्या पक्षाच्या निरास करीतात- 'तर ज्ञानाने' उपप्लवांचे ज्ञान असतां त्यांच्या अनुवादाने बाध युक्त होतो· अन्यथा नाही· विषयत्वाची अनुपपत्ति आहे असा अर्थ· विषयत्वाचा अंगीकार करून दूषण सांगतात- 'न विषयत्व' विषय व विषयीत अभेद मानला असल्यामुळे उपप्लवाला ज्ञानाच्या अभिन्नत्वाने बाधत नाही· कारण ज्ञानाच्याही बाध प्राप्त होतो असा अर्थ· सर्वज्ञज्ञानाने विज्ञानमात्र विषय केले जाते· अशा दुसऱ्या कल्पनेने उत्पादन करीतो· 'मग उपप्लवावांचून' त्याचा निरास करीतात- 'यावर नाही' 'तद्रूपत्वाचा प्रयोग आहे' येथे काय ज्ञानमात्राला विषयत्वाच्या

(interlinear: (उपप्लवाला))

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

४६१।२६५ २६५।२३

॥ व्याख्यान ॥

पण क्षणान्तराला उत्पन्न करणे अर्थक्रिया आहे? मग शेवटीं क्षणाला असत्त्व क्षणत्व प्रसंग येतो.

॥ विवरण ॥

मग सर्वज्ञाला लौकिकोपप्लवांचा अनवभास असल्यामुळे उपदेशाचा असंभव येतो असा भाव. पण स्वविषयक ज्ञान जनन अर्थक्रिया नव्हे. परंतु सजातीय दुसऱ्या क्षणाचें उत्पादन अर्थक्रिया आहे? अशी शंका येते - 'पण क्षणान्तराला' उत्तर सांगतात - 'मग शेवटीं'. हा अर्थ - अहं या संतानांत पडलेली विज्ञानें स्थायित्व व अनुसंधान कल्पनांनीं व रागा-

७६।१९

दिदोषांनीं व विषयांनीं उपप्लुत अशी पूर्वपूर्व सजातीय विषम विज्ञान लक्षण संस्कारापासून उत्तरोत्तर उत्पन्न होतात. नंतर 'सर्व हें क्षणिक आहे' अशा भावनेनें अनादित्व कल्पना निवृत्त होते, स्वलक्षण भावनेने द्रव्य गुण शब्द कर्म-विशेषण विशेष्य कल्पना नाश होते. दुःख या भावनेने रागादि दोषापासून उत्पन्न होणारी प्रवृत्ति वा त्यापासून उत्पन्न होणारे सुख-दुःखोपप्लव क्षीण होतात. शून्य या भावनेने विषयाचा उपप्लव नाहीसा होतो. व त्यामुळे चतुर्विध संस्काराचा निरोध कर

॥ विवरण व्याख्यान ॥

असे सांगितल्या जातो किंवा विशिष्ट ज्ञानाला पहिल्या पक्षाबरोबर नाही कारण उपप्लवाचा विषयत्वाचा अभाव असतांही ज्ञानाचा अविषयत्व संभवते. दुसऱ्या पक्षी दुष्टापत्ति आहे? अशी आशंका असतां तात्पर्य सांगतात - 'सर्वज्ञाला उप-प्लवानीं दूषित ज्ञाला पाहून उपदेश करणे योग्य आहे अन्यथा कुणाला उपदेश होईल. असा अर्थ. 'क्षणान्तर' = ज्ञानान्तर त्या-

२८४।१७ २८४।१८

चा तर निरास केला. तेव्हां पुनः ही आशंका करीत? त्याचा सांगतो - 'पण स्वविषयक'. पण शेवटच्या क्षणाला ही क्षणत्व असल्या-मुळे क्षणान्तराचे उत्पादकत्व आहे. त्यामुळे असत्त्व प्रसंग कसा? अशी आशंका असतां क्षणान्तराचा उत्पादक असलेला चरमत्व नाहीसे होते असे सांगतात - 'उत्तर सांगतात'. सजातीय पूर्व क्षणाला उत्तर क्षणाचे उत्पादकत्वाचा नियम असल्यामुळे चरम = शेवटचे क्षणच नाही. अशा तऱ्हेच्या शंकेचा निरास करीतात - 'हा अर्थ'. 'अनुसंधान कल्पना' ज्ञान ज्ञाता ज्ञेय संबंध रूप कल्पना. तथापि चरम क्षणाचा उदय कसा? अशी आशंका असतां चार प्रकारच्या भावना प्रभेदापासून त्याचा उदय होतो असें सांगण्याकरितां भावनांचा उपयोग सांगतात - 'ते हे' स्वतःचे असाधारण लक्षण = स्वरूप ज्याचे आहे ते स्वलक्षण - अशा भावनेने असा अर्थ. 'दुःख भावनेने' - ज्ञानव्यतिरिक्त सर्व दुःख आहे आणि ते त्याला हेतु आहे अशा भावनेने असा अर्थ. उपप्लुत ज्ञानाला विरोधी चा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ [illegible] ॥

सर्वज्ञाच्या ज्ञानाच्या जनकानेही अभेदत्व नाही. कारण चरमत्वाच्या अनुपपत्तीमुळे मुक्तीच्या।

॥ विवरण ॥

